१९६७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १६,१७

# पद्यसर्वस्व

संपादक :
रामदास डांगे
प्रभाकर मांडे

REFBK-0014081
REFBK-0014081

भारतीय ग्रंथ भवन

# पद्य सर्वस्व

# पद्यसर्वस्व

ग्रंथालय
दा. क्र. १४०८९

संपादक :

रामदास डांगे

प्रभाकर मांडे

REFBK-0014081

REFBK-0014081

भारतीय ग्रंथ भवन

© भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४

प्रथम प्रकाशन : जानेवारी १९६४

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिन्टिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
ग. वा. नेवाळकर
संचालक, प्रकाशन विभाग
भारतीय ग्रंथ भवन
मुंबई १४

मूल्य रु. ३·००

# मनोगत

*हा संग्रह तयार करताना*
*गुरुवर्य डॉ. माधव गोपाळ देशमुख*
*यांची प्रेरणा कारणीभूत झाली*
*हे नमूद करणे*
*आवश्यक ठरते.*
*त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल*
*आम्ही कृतज्ञ राहू.*

—संपादक

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| | १ | मराठी काव्यदर्शन |
| *ज्ञानेश्वर* | १९ | देशिकारें बांधों गीता |
| *नरेंद्र* | २१ | भीमकीवर्णन |
| *एकनाथ* | २५ | दोन भारुडे |
| *मुक्तेश्वर* | २७ | द्रौपदीचा धावा |
| *तुकाराम* | ३१ | अभंगठेवा |
| *रामदास* | ३४ | म्हणौनि सद्गुरु वर्णवेना |
| *रघुनाथ पंडित* | ३७ | नलदमयंती संवाद |
| *मोरोपंत* | ४० | गंगास्तव |
| *मध्वमुनीश्वर* | ४४ | उद्धवा शांतवन कर जा |
| *होनाजी बाळा* | ४६ | घनश्याम सुंदरा |
| *कृष्णशास्त्री चिपळूणकर* | ४८ | अन्योक्ती |
| *केशवसुत* | ५० | स्फूर्ती |
| *ना. वा. टिळक* | ५२ | वनवासी फूल |
| *चंद्रशेखर* | ५५ | गोदागौरव |
| *गोविंदाग्रज* | ५८ | ओसाड आडातील एक फूल |
| *बालकवी* | ६१ | फुलराणी |
| *‘बी’* | ६४ | चाफा |
| *भा. रा. तांबे* | ६६ | राजकन्या आणि तिची दासी |
| *वि. दा. सावरकर* | ६८ | स्वतंत्रतेचे स्तोत्र |

| | | |
|---|---|---|
| *माधव ज्यूलियन* | ७० | दग्धपक्ष पतंग |
| *यशवंत* | ७२ | सावध ! सावध !! |
| *केशवकुमार* | ७५ | चाफा |
| *कुसुमाग्रज* | ७७ | कोलंबसाचे गर्वगीत |
| *अनिल* | ७९ | धडकी |
| *वा. रा. कांत* | ८६ | अग्निपंख नभिं फडफडुं दे |
| *बा. भ. बोरकर* | ८८ | चित्रवीणा |
| *वी. रघुनाथ* | ९० | तें न तिनें कधिं ओळखलें— |
| *बा. सी. मर्ढेकर* | ९२ | दवांत आलिस भल्या पहाटीं |
| *इंदिरा संत* | ९४ | उभी तुळस वेल्हाळ |
| *विंदा करंदीकर* | ९६ | माझ्या मना बन दगड |
| | ९९ | कविदर्शन |

१४०८९
३८८८८.
१६१५.
२५.८.६४.

# मराठी काव्यदर्शन

मराठी भाषेची निर्मिती आठव्या शतकात झाली असली तरी बाराव्या शतकापूर्वी मराठीत ग्रंथरचना झाल्याचा पुरावा मात्र अजून उपलब्ध नाही. मुकुंदराजकृत 'विवेकसिंधू' हा ग्रंथ मराठीचा आद्य ग्रंथ मानण्यात येतो. परंतु विवेकसिंधूतील भाषेच्या स्वरूपामुळे तो ग्रंथ अलीकडील असावा असे काही विद्वानांचे मत आहे. तेराव्या शतकाच्या प्रारंभी मराठी भाषेत विपुल व वरच्या दर्जाची काव्यनिर्मिती झाली आहे. काव्यनिर्मिती तत्कालीन सामाजिक किंवा सांस्कृतिक गरजेतून निर्माण झाली आहे. बाराव्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे स्वरूप पाहिल्यावर मन उद्विग्न होते. त्या वेळची सामाजिक स्थिती एकंदरीने विचित्र झाली होती. समाजात शिथिलता, कर्तव्यविन्मुखता, दुराचरण, दंभाचरण इत्यादी दुर्गुणांचा बुजबुजाट झाला होता. महाराष्ट्रात सर्व वर्णांना सामाजिक समता नव्हती. सर्व ज्ञान संस्कृतमध्ये असल्यामुळे बहुजनसमाज अध्यात्मज्ञानाला पारखा झाला होता. धार्मिक वाङ्मयाच्या किल्ल्या ब्राह्मणांच्या हाती होत्या. सांस्कृतिक जीवनाची सर्व सूत्रे ब्राह्मणांच्या हाती केंद्रित झाल्यामुळे बहुजनसमाजाच्या नशिबी बौद्धिक आणि आध्यात्मिक दास्य तेवढे उरले होते. सनातन समजल्या जाणाऱ्या धर्मात अंतःकरणापेक्षा बाह्य उपचारांच्या थोतांडाना महत्त्व प्राप्त झाले होते. कर्मकांडाचा बडिवार माजून व्रतवैकल्ये, ब्राह्मणपूजा, यज्ञयाग, तीर्थयात्रा, अर्थ न कळता ग्रंथाचे पठन करणे इत्यादी गोष्टींनाच अवास्तव महत्त्व प्राप्त झाले होते. जातींची बंधने दृढ झाली होती. स्त्रिया आणि शूद्र यांना ज्ञानोत्तर मुक्तीचा मार्ग बंद होता. एकंदर धर्माला विकृत स्वरूप प्राप्त झाले होते.

समाजामध्ये अंतर्गत कलह माजून एक प्रकारची पोकळी निर्माण झाली होती. समाजात निर्माण झालेली ही पोकळी भरून काढण्यासाठी जैन, लिंगायत, नाथ, महानुभाव आणि भागवत या पंथांनी आपापल्या परींनी प्रयत्न केले. लिंगायत आणि महानुभाव हे दोन्ही पंथ अवैदिक समजले जात असून त्या पंथांना चातुर्वर्ण्य व चार आश्रम अमान्य आहेत. तेराव्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात महानुभाव धर्माचा चांगलाच प्रसार झाला होता. हिंदुधर्मातील असंतुष्ट बहुजनसमाजाने मोक्षप्राप्तीसाठी महानुभाव पंथाचा स्वीकार केला. महानुभावपंथात स्त्रियांनादेखील संन्यास घेण्याची सोय होती. या सर्व पंथांनी संस्कृत भाषेच्या वर्चस्वाचा त्याग करून सामान्य जनांपर्यंत विचारांचे लोण पोहचविण्याचे महाकार्य करण्यासाठी मराठी भाषेचा स्वीकार केला. नाथपंथीयांनी मराठी भाषेत रचना करून आपल्या पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. भागवत (वारकरी) सांप्रदायिकांनी मराठी भाषेवर वाङ्मयाचा साज चढविला. वारकरी पंथाने लिंगायत आणि महानुभाव पंथांप्रमाणे सनातन वैदिक धर्माविरुद्ध बंड केले नाही. तसली क्रांती त्यावेळचे समाजमन पचवू शकले नसते. समाजाची प्रकृती भागवत धर्माने नेमकी हेरली होती. त्यामुळेच सनातन धर्माच्या मूळ तत्त्वांना यत्किंचितही धक्का न लावता त्यांत सुधारणा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कर्मकांडाच्या आहारी गेलेल्या आणि खऱ्या कर्मापासून दूर गेलेल्या समाजाला ज्ञानेश्वरांनी गीतेचे रहस्य उकलवून दाखविले आणि कर्मयोगाचा पुरस्कार केला. समाजामधील धार्मिक अपप्रवृत्तींवर प्रहार करून आध्यात्मिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे हे त्यांचे खरे कार्य होते. वेदांचा अधिकार त्रैवर्णिकांनाच आहे म्हणून वेदांनाही 'कृपणु' असे दूषण देण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. ब्रह्मविद्येविषयी संस्कृतात अनेक ग्रंथ आहेत, परंतु जनसमाजाच्या दृष्टीने ते नसल्यासारखेच होते. ब्रह्मविद्येपासून मिळणाऱ्या आनंदाच्या अभावामुळे होणारे दुष्परिणाम समाज भोगीत आहे असे समजून प्रत्येकास ब्रह्मविद्या प्राप्त व्हावी या हेतूने गीता विशद करून सांगतो असे ते म्हणतात :

**तैसा वाग्विलासविस्तारु। गीतार्थे विश्व भरूं।**
**आनंदाचें आवारूं। मांडूं जगा ॥**

फिटो विवेकाची वाणी। हो कानामनाची जिणी।
देखों आवडे ते खाणी। ब्रह्मविद्येची ॥
दिसो परतत्त्व डोळां। पाहो सुखाचा सोहळा।
रिघो महाबोध सुकाळा। माजिं विश्व ॥

गीता-गंगेच्या काठावर संस्कृत भाषेचे जे अरण्य माजले आहे ते तोडून सर्वांना गंगेत स्नान करता यावे म्हणून घाट बांधला—

एथ श्रवणाचेनि द्वारें। तीर्थी रिघतां सोपारें।
ज्ञानदेव म्हणे दातारें। माझेनि केलें ॥
तीरें संस्कृताचीं गहनें। तोडोनि मऱ्हाठिया शब्दसोपानें।
रचिलीं धर्मनिधानें। निवृत्तिदेवें ॥
म्हणौनि भलतेणें येथ सद्भावे नाहावें।
प्रयागमाधव विश्वरूप पाहावें।
येतुलेनि संसारासी द्यावें। तिलोदक।

असे त्यांनी ज्ञानेश्वरीचे प्रयोजन सांगितले आहे. तत्त्वज्ञानासारखा महाकठीण व सर्वसामान्यांच्या आकलनापलीकडे असणारा विषय आपल्या अत्यंत गोड वाणीने, अनेक समर्पक दृष्टान्त देऊन त्यांनी विशद केला. हे कार्य करीत असताना त्यांना संस्कृत–पंडितांचा प्रखर विरोध सहन करावा लागला. यामुळे, मराठी भाषेचे सामर्थ्य पटवून देण्याची जबाबदारीही त्यांच्यावर पडली.

माझा मऱ्हाठाचि बोलु कवतिकें।
परि अमृतातेंही पैजा जिंके।
ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन ॥

असे आत्मविश्वासपूर्वक सांगून मराठी भाषेची थोरवी ज्ञानेशांनी प्रत्यक्ष त्या भाषेत रचना करून पटवून दिली. एवढेच नाही तर—

देशी कां हो मऱ्हाठी। परि उपनिषदाचीच रहाटी।
तरी हा अर्थु जीवाचिया गांठी। कां न बांधावा ॥

असा प्रश्न विचारला.

तत्त्वज्ञान सांगणे किंवा तत्त्व प्रतिपादन करणे ही जरी ज्ञानेश्वरी सांगताना त्यांची भूमिका असली तरी आपण वाङ्मय निर्माण करीत आहोत याची जाणीव त्यांना होती असे त्यांच्या—

तरि आतां येणें प्रसादें। विन्यासें विदग्धें।
मूळ शास्त्रपदें। वाखाणीन ॥
ते विदग्धा रसवृत्ती। म्हणिपैल कथा ॥

या उद्गारांवरून दिसते. ज्ञानेश्वरांनी 'सारस्वताचे गोड झाड लावून ते रसभावरूपी फुलांनी डवरून टाकले आहे.' ज्ञानेश्वरांचा पिंड कवीचा होता. त्यांनी काव्य निर्माण करण्याची भूमिका ज्ञानेश्वरी रचताना ठेवली होती असे काही विद्वानांना वाटते ते यामुळेच. ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, चांगदेवपासष्टी व अभंग यांची रचना करून पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या भागवतधर्माचा पाया त्यांनी दृढ केला. त्यामुळे भागवत धर्माचा 'ज्ञानदेवें रचिला पाया' असे म्हणण्याचा प्रघात आहे.

भागवतधर्माची प्रतिष्ठापना करून ज्ञानेश्वरांनी फार मोठे कार्य केले. बहुजनसमाजाला मोक्षाची पेठ खुली केली; त्याच्यात आध्यात्मिक अनुभव घेण्याची क्षमता निर्माण केली; नामसंकीर्तनाचा सोपा मार्ग त्यांना उपलब्ध करून दिला. या भागवतधर्माचा प्रसार करण्याचे मोलाचे कार्य नामदेवांनी केले. विसोबाखेचराकडून मंत्रोपदेश घेतलेल्या नामदेवाची स्थिती 'तहानभूक हारपली। छंद लागला विठ्ठलीं ॥ कन्यापुत्र बापमाय। त्याची आठवही न ये ॥ अशी झाली. विठ्ठलाचे सान्निध्य त्यास इतके गोड वाटू लागले की—

तूं चांद मी चांदणी। तूं नाग मी पद्मिणी।
तूं कृष्ण मी रुक्मिणी। स्वयें दोन्ही ॥
मी कुळी तूं आत्मा। स्वयें दोन्ही ॥

नामदेवांनी आपल्या रसाळ व भावपूर्ण वाणीने पांडुरंगाचे नामस्मरण केले. दासी जनीसह नामदेवाच्या कुटुंबातील सर्व माणसे विठ्ठलाची भक्ती करू लागली. त्यांना देखील कवित्वस्फूर्ती होऊन अभंगरचनेचे सामर्थ्य प्राप्त झाले. दासी जनी आपल्या मनाचे अनुभव 'अभंग' करू लागली. तेराव्या शतकात

वारकरी संप्रदायात विसा खेचर, परिसा भागवत, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, जोगा परमानंद, जगमित्र नागा, चोखामेळा असे किती संत निर्माण झाले. हे सर्व संत हीन समजल्या गेलेल्या जातींतून झाले हे विशेष होय. विठ्ठलाचे नामस्मरण करून आध्यात्मिक गूढ अनुभव घेण्याचे सामर्थ्य या सर्वांमध्ये ज्ञानेश्वरीच्या शिकवणीमुळे आले होते. या सर्व संतांनी निर्माण केलेले अभंग-वाङ्मय भक्तिरसाने ओथंबलेले आहे. त्यांच्या काव्यरचनेमागील त्यांची भूमिका पांडुरंगाची भक्ती करणे, नामसंकीर्तन करणे ही होती.

याच कालखंडात महानुभाव कवींनी कथाकाव्ये लिहिली आहेत. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात महानुभावांचा फार मोठा वाटा आहे. श्रीकृष्ण हे त्यांचे दैवत असून श्रीकृष्णचरित्र हाच खरा काव्यविषय असे या पंथातील कवींचे मत होते. श्रीकृष्णाच्या जीवनातील अनेक प्रसंगांवर महानुभाव कवींनी काव्ये रचिली आहेत. खरे काव्य हे भक्तियुक्त असावे अशी त्यांची श्रद्धा होती. पंथाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पूजावसर, सूत्रपाठ, दृष्टान्तपाठ इत्यादी ग्रंथ लिहिले गेले. परंतु नरेंद्राचे रुक्मिणीस्वयंवर निर्माण करताना, दामोदर पंडिताची वच्छाहरण काव्य रचताना व भास्करभट्ट बोरीकरांची शिशुपालवध हे काव्य लिहिताना पंथाचा प्रसार करणे ही भूमिका नव्हती. हे सर्व कवी विद्वान–पंडित असून प्रतिभावंत कवी होते.

**देखोनि महाकवींचा पंथु। मज होतुसे मनोरथु॥**
**वाणावेया यादवनाथु। श्रीकृष्णराउ॥**

यावरून भास्करभट्टासमोर संस्कृत महाकवींचा आदर्श होता हे स्पष्ट आहे. त्याचा शिशुपालवध हा ग्रंथ 'शृंगारिया प्रवृत्तांजोगा' झाला विरक्तायोग्य नव्हे असे तो ग्रंथ पाहून भावे व्यास यांनी म्हटले आहे. मात्र ग्रंथ 'निका' झाल्याबद्दल प्रशस्तिपत्र देखील देऊन ठेविले आहे. श्रीकृष्णाच्या गुणांनी माझा जीव उल्हसित झाला असून श्रीचक्रधराशी लीन झाला आहे त्याचाच आंतरिक आनंद माझ्या कवितेच्या रूपाने उचंबळून वाहत आहे असे रुक्मिणीस्वयंवर या ग्रंथाचा कर्ता नरेंद्र याने म्हटले आहे. वच्छाहरण या सुंदर आख्यानकाव्याचा कर्ता दामोदर पंडित याने—

उपमाश्लेषवर्णुक। एहीं रंजऊं सकळैकु लोक।
कीं पवाडे संसारमोचक। वाणौं मुकुंदाचे?
नागरीं बोलीं स्छल वाणिजे। सकल रसांतें पोखिजे।
कीं निरसां होऔनि श्रीकृष्णीं भजिजे। यां दों कवणु चांग॥

अशा तऱ्हेचे प्रश्न विचारले आहेत. याखेरीज 'ईशगुणानुवाद करणे' 'वाणी पवित्र करणे' वगैरे विविध प्रयोजने समोर ठेवून महानुभाव कवींनी काव्यरचना केली आहे.

महानुभाव कवींची ही आख्यानक कवितेची रचना पाहिल्यावर ती वारकरी संप्रदायातील कवींपेक्षा निराळी असल्याचे दिसते. नरेंद्र-भास्करादिकांना आपण काव्य निर्माण करीत आहो अशी जाणीव होती. त्यांच्या कवितांतील वर्णने, स्वभावरेखन इत्यादी गोष्टी पाहिल्यावर त्यांनी श्रेष्ठ काव्य निर्माण करणाऱ्या कवीची भूमिका जाणीवपूर्वक स्वीकारलेली दिसते. महानुभाव कवींनी देखील उद्धवगीतेसारख्या ग्रंथात तत्त्वविवेचन केले आहे, नाही असे नाही; मात्र आख्यानक कवितेचा विलास तेथे आढळत नाही. वारकरी संप्रदायातील कवी संत होते तर महानुभाव पंथातील कवी प्रामुख्याने काव्यरचनाकार होते.

आख्यानक कवितेची परंपरा एकनाथांपासून सुरू होते असे म्हटले जाते. परंतु महानुभावीय आख्यानक कवितेकडे पाहिल्यावर हे मत बरोबर नाही असे स्पष्ट दिसते. पंधराव्या शतकात झालेल्या थोर संत एकनाथांनी 'रुक्मिणी-स्वयंवर' या आख्यानक काव्याबरोबर 'चतुःश्लोकी भागवता'वर व्याख्यान लिहिले. त्यांचे गुरु जनार्दनस्वामी यांच्या आज्ञेने भागवताच्या एकादशस्कंधावर विस्तृत टीका लिहून त्यातील तत्त्वज्ञान त्यांनी विशद केले. एकनाथांचे श्रेष्ठपण भागवताच्या आधारे तत्त्वज्ञान सांगण्यापुरते किंवा रुक्मिणीस्वयंवर या आख्यानक काव्यापुरते मर्यादित नाही, तर गहन आध्यात्मिक तत्त्व समाजाच्या खालच्या थरापर्यंत लोकसाहित्याच्या स्वरूपात नेण्याचे कार्य त्यांनी अनेक भारुडे रचून केले आहे. मनोरंजन करताना शिकविणे हे त्यांचे ध्येय होते. भावार्थ रामायणाची रचना करून तत्कालीन समाजासमोर कर्तव्याच्या पूर्तीसाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या, वीरवृत्तीच्या रामाचा आदर्श त्यांनी समोर ठेवला. गाढवाला गंगाजळ पाजणे, महाराच्या पोराला उचलून घेणे, महाराच्या घरी

जेवावयास जाणे इत्यादी कृतींनी भागवतधर्माच्या तत्त्वांनुसार आचरण करण्याचे धाष्टर्य त्यांनी दाखविले. भागवतधर्माच्या तत्त्वांचा व आचारांचा सुरेख संगम एकनाथांच्या ठिकाणी झाला आहे हे त्यांच्या उक्ती आणि कृती यावरून दिसते.

एकनाथानंतर कथाकाव्यांना भर आलेला दिसतो. मुक्तेश्वर, वामनपंडित, रघुनाथपंडित आदी कवींनी मराठी कथाकाव्याचे दालन समृद्ध केले. एकनाथानंतरचे काव्य समाजापासून थोडे दूर गेले हे अमान्य करता येत नाही. काव्यलेखनामागील हेतूंमध्ये बदल झाला. रामायण–महाभारत यांमधील अनेक नाट्यपूर्ण प्रसंग निवडून त्यावर आख्याने रचण्यात येऊ लागली. या कवींचा काव्यशास्त्राचा व्यासंग होता. निर्भर आनंदाची प्राप्ती करून देणे हे मुक्तेश्वराच्या भारताच्या रचनेचे प्रयोजन होते.

**कथामृत परम सुस्वाद। ऐकतां आनंद उद्बोध।**
**पावती सज्जन स्वानंद। निजांगीं अतिवेगें॥**

भारतश्रवणाने 'भुक्ति मुक्ति आयती। स्वधर्मपत्नीसारखी.' असे तो म्हणतो. 'जेणें वाढे उत्कट भक्ति। तो तो विशेष लिहिला ग्रंथीं' असे सांगून तो मूळ कथेत पदरची वाढ करण्यास मागेपुढे पाहत नाही. आनंदप्राप्ती आणि भक्ती वाढविणे हे जरी मुक्तेश्वराचे ध्येय असले तरी मुक्तेश्वराचे भारत हे विदग्ध काव्य असल्याने कवीने अनेक प्रकारची कलाकुसर त्यात केली आहे. महाभारताचे हे लेणे भारतकथेचे सुवर्ण घेऊन साहित्यरत्नांनी सुजडित करण्याचा त्याचा उद्देश आहे. "काव्य रचावयाचे ते भक्ती किंवा अध्यात्म यांच्या विवेचनासाठी रचावयाचे हा काव्याचा परंपरागत पारमार्थिक हेतू बदलवून मुक्तेश्वराने आपल्या सगुण सालंकार वाणीने काव्यानंद चाखण्याची चटक आपल्यासारख्या रसिक वाचकांना लावली. इतकेच नव्हे तर भक्ती किंवा वेदान्त यांची बैठक न सोडता अनेक आख्यानोपख्यानकांवर आपली स्वतंत्र कल्पनाशक्ती चालवून मराठी भाषेची सेवा करण्याची स्फूर्ती त्याने अनेक कवींना दिली आहे." म्हणूनच मुक्तेश्वरास पहिला 'कलाकवी' असे संबोधिले जाते.

यापुढे कलाकवींची एक परंपराच सुरू झाली. वामनपंडिताने रसानुकूल नादवती व सहजानुप्रासात्मक वर्णरचना करून आपले काव्य नटविले आहे.

वामनाच्या श्लोकाच्या असाधारण माधुर्यामुळे 'सुश्लोक वामनाचा' अशी ख्याती झाली आहे. वामन पंडिताच्या काव्यात त्याचे संस्कृत व मराठी भाषांवर असलेले असामान्य प्रभुत्व दिसून येते. त्याच्या काव्यात अद्वैतभक्तिरसात घोळलेले पंडिती मन प्रतिबिंबित झाले आहे. त्यामुळे वामनपंडिताची सर्व प्रकरणे—आख्याने—रसभरित व नादमधुर उतरली आहेत. त्यांची भूमिका समकालीन पंडित कवींप्रमाणे कलाविलासात्मक नसून एकनाथाप्रमाणे अद्वैताचा तसेच भक्तीचा प्रसार करणाऱ्या पारमार्थिक ज्ञानी प्रवचनकाराची आहे. रघुनाथ पंडिताचे दमयंतीस्वयंवराख्यान मराठी कवितेचे एक अमोल भूषण आहे. हे आख्यान अनेक वृत्तांत रचिलेले असून नानाविध अलंकारांचे जणू भांडारच आहे. दमयंतीस्वयंवराख्यानाची रचना उत्स्फूर्त नाही. रघुनाथ-पंडिताने परिश्रमपूर्वक चातुर्यसर्वस्व खर्चून हे आख्यान कुशल कारागिरीने नटविलेले असल्यामुळे त्याचे स्वरूप मनोहर असे झाले आहे. कारागिरीचा अतिरेक झाला म्हणजे काव्य किती कृत्रिम व नीरस बनते याचें उदाहरण विठ्ठल बीडकर याच्या 'रुक्मिणीस्वयंवर' याचे देता येईल. आख्यानक कवींच्या परंपरेतील नागेश आणि सामराज या कवींचा उल्लेख यशस्वी आख्यानक कवी म्हणून करावयास हरकत नाही. श्रीधराचे 'पांडव-प्रताप', 'हरिविजय' 'शिवलीलामृत' 'जैमिनी-अश्वमेध' हे ग्रंथ महाराष्ट्रात आजही भक्तिभावाने वाचले जातात. श्रीधराच्या एकंदर रचनेवर मुक्तेश्वराची जरी छाप पडली असली तरी त्याची रचना रसाळ व ओघवती असून प्रसंग साक्षात डोळ्यांपुढे उभे करण्याचे त्याचे सामर्थ्य अवर्णनीय आहे.

भागवत संप्रदायाने आपले अधिराज्य महाराष्ट्रावर अधिक काळ चालविले. पंडिताची आख्यानक कविता निर्माण होत असतानाच भागवत संप्रदायातील संतांची रचना देखील होत होती. ज्ञानदेवांपासून प्रारंभ झालेल्या भागवत धर्माचा कळस तुकारामाच्या रूपाने झाला. यातीने शूद्र असलेल्या एका साधकाला 'वेदाचा तो अर्थ आम्हांसीच ठावा' किंवा 'धन्य म्हणवीन इहलोकींच्या लोका। भाग्यें आम्हीं तुका देखियेला' असे आत्मविश्वासपूर्वक म्हणण्याचा अधिकार प्राप्त झाला यात भागवतसंप्रदायाचे यश दिसून येते. तुकारामाच्या अभंगांकडे पाहता त्यांत भावसंपन्न व तरलतर अंतर्जीवन प्रतिबिंबित झाले आहे असे दिसते. तुकाराम हे अनुभवाशी कमालीचे

प्रामाणिक आहेत. त्यामुळे त्यांच्या अभंगांत अंतरंगाचा ठाव घेण्याचे सामर्थ्य आले आहे. 'अंतरीचे धावे स्वभावें बाहेरी' असे त्यांच्या अभंगांचे वर्णन करता येईल. तुकारामांची कविता हे त्यांच्या अंतर्मनाच्या विकासाचे चित्र आहे असे म्हटले असता चालेल. तुकोबांच्या अभंगांतून त्यांचे संपूर्ण जीवन डोळ्यापुढून सरकते. त्यांच्या मनाच्या निरनिराळ्या अवस्था अभंगांतून व्यक्त होत गेल्यामुळे अभंगाचे अंतरंगही विविध भावांनी विनटलेले आहे. तुकारामाची कविता ही खरी भावकविता आहे. त्यांनी उपदेश केला असला तरी आधी केले मग सांगितले असे त्याचे स्वरूप आहे.

तुकारामांच्याच काळातील त्यांच्यापेक्षा अगदी भिन्न प्रकृतीच्या रामदासांचे काव्य उपदेशपर आहे. दासबोधासारख्या प्रचंड ग्रंथाच्या अवलोकनाने त्यांची कवी म्हणून योग्यता सिद्ध होत असली तरी त्यांनी रचलेली अनेक स्फुट प्रकरणे वाचल्याशिवाय त्यांच्या कवित्वाची खरी कल्पना येत नाही. अवघ्या दोन कांडांचे रामायण पाहिल्यावर त्यांचे संपूर्ण रामायण किती सुंदर झाले असते याची कल्पना करता येते. रामदासाच्या मनातील प्रधान भावना समाजोद्बोधनाची, समाजोद्धाराची असल्यामुळे त्यांच्या ठायी कोमल भावनेला थारा नाही. रामदासांच्या काव्यातील सौंदर्य विचारांचे आहे. त्या विचारांच्या मागे प्रतीतीचे बळ असल्यामुळे तो विचारदेखील कवितेचा विषय होतो. त्यांच्या वाङ्मयातील आशय उत्कट आणि भव्य आहे. रामदासांची वाणी अनलंकृत, अर्थवाही व रोखठोक आहे. या त्यांच्या भाषेच्या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या वाणीला एक भरदार व्यक्तिमत्त्व लाभले आहे. रामदास आणि तुकाराम यांच्या वाङ्मयाकडे एकसमयावच्छेदेकरून पाहिले असता दोन्ही परस्परविरोधी वाटणारी मने त्यातून प्रगट झालेली दिसतात. रामदासांची वाणी ही हतप्रभ झालेल्या राष्ट्राला खणखणित गर्जनेने जागविणाऱ्या युगपुरुषाचा प्रेरक संजीवनी मंत्र ठरते तर तुकारामाची वाणी रंजल्यागांजल्याचे अश्रू पुसण्यासाठी आणि समाजातील दुष्ट प्रवृत्ती उपटून काढण्यासाठी अवतरून आत्मिक अनुभवामृताच्या साह्याने आध्यात्मिक संतृप्तीचा वर्षाव करते. समाजास त्याकाळी या दोन्ही वाणींची गरज होती.

पंडिती काव्याचे शेवटचे प्रतिनिधी कविवर्य मोरोपंताची रचना पाहिली की मन थक्क होते. इतर पंडित कवींप्रमाणे ते संस्कृत भाषेचे गाढे पंडित असून

त्यांचा काव्यशास्त्राचा व्यासंग सखोल होता. मोरोपंतांच्या प्रतिभेचा प्रत्यय आर्याभारतात येतो. संक्षेपाचे बंधन पाळून संपूर्ण महाभारत मुळातील वैशिष्ट्यांसह त्यांनी मराठीत आणले. त्यांतील संवादकौशल्य, टसटशीत व्यक्तिरेखा, रसवत्ता, अलंकारवैभव हे सर्व पाहिले म्हणजे आर्याभारत रचताना त्यांनी केलेल्या परिश्रमाची व त्यांच्या स्वयंभू प्रतिभेची कल्पना येते. आर्याभारतात यमकांच्या अतिरेकामुळे मधून मधून क्लीष्टता आढळत असली तरी धर्मावरील असीम श्रद्धा, परमेश्वरभक्तीचा जिव्हाळा त्यांच्या ठायी असल्यामुळे त्यांचे काव्य भक्तिरसपूर्ण झाले आहे. श्लोककेकावली व गंगास्तव या काव्यांत मनाचा निर्मळपणा, एकनिष्ठा, भक्ती इत्यादी गुण उत्कटत्वाने दिसून येतात. भक्ताने स्वोद्धारासाठी केलेला धावा म्हणजे ही काव्ये. तसे पाहिले तर मोरोपंताची सर्वच रचना–एकशे आठ रामायणांसह–'आपण कांहीं तरावया गावें' या भूमिकेतून निर्माण झाली आहे. मोरोपंत पंडित कवी असूनही संत होते, असे म्हणणे वावगे होणार नाही.

नरेंद्र–ज्ञानेश्वरांपासून मोरोपंत–श्रीधरापर्यंत निर्माण झालेल्या मराठी कवितेचे अवलोकन केले असता त्यात प्रामुख्याने दोन प्रवाह दिसतात. आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार करणे, भक्तिमार्गाची गोडी समाजामध्ये निर्माण करणे, नामसंकीर्तन करणे, लोकांना सन्मार्गावर आणण्यासाठी उपदेश करणे ही भागवतधर्मीय संतकवींची मुख्य भूमिका आहे. तत्त्वविचार सांगण्यासाठी किंवा लोकांसमोर आदर्श ठेवण्यासाठी रामायणासारख्या कथांचे निरूपण त्यांनी ओवी या छंदाचा आश्रय घेऊन केले. देवाचे गुणसंकीर्तन करणे तसेच आपल्या आंतर्जीवनातील भाववृत्तींना प्रकट करण्यासाठी अभंग या रचना-प्रकाराचा त्यांनी वापर केलेला दिसतो. अंतरंगातील उमाळा ज्या कवितेत त्यांनी प्रकट केला ती कविता अभंगस्वरूपी झाली आहे. ती सुंदर भावकाव्येच आहेत. नामदेव-जनाबाई-तुकारामादिकांच्या अभंगांची गोडी काय वर्णावी! ह्या सर्व संतांची भूमिका उपासकाची, मुमुक्षूची, उपदेशकाची होती. म्हणून त्यांचे काव्य एका विशिष्ट प्रकारचे झाले आहे. या संतकवींनी महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक जीवनांत फार मोलाची कामगिरी बजावली आहे.

मराठी कवितेतील दुसरा प्रवाह आख्यानक कवींचा. नरेंद्र-भास्करभट्टादिक महानुभाव कवी, तसेच मुक्तेश्वर-रघुनाथपंडितादिक कलाकवी यांनी मराठी भाषेत

उत्तमोत्तम आख्याने रचिली. आख्याने रचण्यामागील भूमिका ईशगुणगान, भक्ती, स्वोद्धार करण्याची असली तरी भाषेची जडणघडण, अलंकार, रसवत्ता याकडे त्यांनी अधिक लक्ष दिले आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यांत कलात्मकता आली आहे. परमेश्वरभक्ती आणि कलात्मक काव्यनिर्मिती अशी द्विविध प्रयोजने त्यांच्या काव्यरचनेच्या मुळाशी होती. महाकाव्यातील नायकांच्या उदात्त जीवनाचे चित्रण काव्यात करून त्यांचा आदर्श समाजासमोर ठेवावा हाही एक हेतू पंडिती कवींच्यासमोर होता. या कवींनी रचलेल्या काव्यांत आंतरिक भावजीवनाचा स्पर्श न झाल्यामुळे ही कविता संतांच्या कवितेप्रमाणे लोकांच्या अंतःकरणापर्यंत पोहचू शकली नाही. संस्कृत कवितेचा आदर्श समोर ठेवून या कवींनी काव्ये रचिली असली तरी आपल्या कलात्मक रचनेच्या साह्याने परमेश्वरभक्ती, सत्य, नीती, सहिष्णुता, भूतदया, आदी मूल्यांचा आविष्कार करून त्यांनी समाजजीवनाला निश्चित स्वरूपाचे मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला, हे विसरून चालणार नाही.

पेशवाईच्या उत्तरार्धात मराठी कवींचे मन रामायण-महाभारतांतील नायकांपेक्षा स्वकालीन श्रेष्ठ पुरुषांची जीवनचित्रे रेखाटण्यात धन्यता मानू लागले. शिवाजीच्या काळापासूनच अगिनदासासारखे शाहीर राजकीय घटनेवर पोवाडे रचू लागले होते. परंतु असे प्रयत्न अपवादस्वरूपच. पेशवाईच्या काळात शाहिरी कवितेला बहर आला. शाहिरी वाङ्मयाचे दोन महत्त्वाचे भाग आहेत. पोवाड्यात राजकीय घटनांचे रसपूर्ण वर्णन केलेले असते तर लावणीमधून लौकिक जीवनातील सुखदुःखाचे क्षण टिपलेले असतात. सर्वसाधारण मानवी जीवनातील भावभावनांचे चित्रण तीत केलेले असते. शाहिरी रचना स्वतंत्र आहे. म्हणूनच अ. ब. कोल्हटकरांनी या कवितेला 'मराठी काव्याची प्रभात' असे म्हटले आहे. मानवी जीवनाच्या चित्रणातील अपुरेपणा, एकांगीपणा, भडक वर्णने, शृंगाराला दिलेले अतिरिक्त महत्त्व हे दोष सोडले तर लावणी वाङ्मयातून तत्कालीन मराठी मन प्रतिबिंबित झाले यात शंका नाही.

**नाजुक बांधा, सडक आकृति ठेंगणी गोजरी ।**
**कंगणीदार पगडी शिरीं**

असे नायकाचे चित्र आणि—

बांधीव बुचड्याची लवक, पदर अति सुबक,
खोविला तिपदरी वेणिचा। चंदन डहाळीस जसा
लपेटा काळे नागिणीचा।

किंवा—

सुंदरा मनामध्ये भरली......

असे रामजोशी याने केलेले वर्णन, तसेच,

लटपट लटपट तुझं चालणं, मोठ्या नखऱ्याचं।
बोलणं ग मंजुळ मैनेचं।

असे नायिकेचे होनाजी बाळाने केलेले वर्णन तत्कालीन मराठा वीराची आणि मराठमोळा तरुणीची साक्षात मूर्ती आपणासमोर उभी करते. शाहिरी कवितेच्या आशयाप्रमाणेच तिची आविष्कारपद्धतीही संत आणि पंडित कवींच्या रचनेपेक्षा निराळी आहे. त्यातील वीररस आणि शृंगाररस त्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष जीवनातून आणला आहे. म्हणून त्यात जिवंतपणा आढळतो. अनुप्रासात्मक ठेक्यावरील वर्णांची जडणघडण शाहिरी काव्याचे सौंदर्य वाढविते. शाहिरांचा कल्पनाविलास थोड्या शब्दांच्या साहाय्याने व्यक्तिरेखा रेखाटणे, स्त्रियांच्या भावनांचा केलेला सहजसुलभ आविष्कार ही त्यांच्या कवितेची काही ठळक वैशिष्ट्ये होत. पौराणिक लावण्यांतून देखील ही वैशिष्ट्ये दृग्गोचर होतात. पोवाडे व शृंगारिक लावण्या रचून महाराष्ट्राची करमणूक करणाऱ्या शाहिरांच्या वाणीतून 'घनश्यामसुंदरा'सारखी अतीव सुंदर भूपाळीदेखील निर्माण झालेली दिसते.

याच काळात मराठी वाङ्मयात पदे कटाव इत्यादी स्फुट रचना होत होती. मध्वमुनीश्वर, अमृतराय वगैरे कवींची भक्तिरसपूर्ण पदे व उपदेशपर कटाव मराठी काव्याची भूषणे आहेत.

पेशवाईच्या अस्तानंतर काही काळ मराठी कवितेच्या दृष्टीने अंधकारमय गेला. स्वातंत्र्याबरोबरच जणू महाराष्ट्राची कवित्वशक्तीदेखील लोप पावली.

सारा समाज हतबल झाला, विकल झाला. मराठी शाहिरी ज्या डफाच्या साथीने निनादत होती ते डफ पारतंत्र्याच्या आघाताने फुटले. त्यातून नंतरही काही काळ बदसूर निघाला आणि थांबला. पारतंत्र्याचे जोखड झुगारून देण्याचे काही प्रयत्न झाले. त्यापैकी १८५७ सालचा प्रयत्न जोराचा होता. तो फसला आणि गुलामगिरीची पकड पक्की झाली. इंग्रजी अभ्यास सुरू झाला, छापखाने निघाले, त्या शिक्षणाने आम्ही शहाणे होऊन 'दर्पणा'त पाहू लागलो. 'ज्ञानोदय' होऊन 'ज्ञानप्रकाश' फाकू लागला. अव्वल इंग्रजी अमदानीत संस्कृत आणि इंग्रजी कवितांची भाषांतरे होऊ लागली. 'दैवसेनी' मराठीत अवतरली. 'इंदिरा' प्रगटली. चिंतामणी पेटकरांनी 'गंगावर्णन' केले. कुंट्यांनी 'राजा शिवाजी'चे चरित्र गाइले. ही काव्ये मराठीत निर्माण होत असतानाच 'मेघदूता'चा मराठी अवतार होत होता. अभंगपरंपरा तुटली असली तरी हरदासांच्या साह्याने कथनकाव्य मधूनमधून डोके वर काढीत होते. मराठीत वृत्तबद्ध रचना करून शास्त्रीपंडित मोरोपंताची पंडिती परंपरा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत होते.

विद्याधर वामन भिडे, लेंभे, परशुरामतात्या गोडबोले, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी जुन्या वळणाची कविता लिहिण्याचा प्रघात सुरू ठेवला होता. मोगरे यांच्या कवितांना आधुनिकतेचा स्पर्श झाला तर वि. मो. महाजनींना इंग्रजीतील भावकविता मराठीत आणण्याची स्फूर्ती झाली. या कवींच्या लेखनातील बदललेली दृष्टी पाहून काही टीकाकारांना काव्यामध्ये क्रांती न होता उत्क्रांती झाली आहे असे जरी वाटले असेल तरी केशवसुतांची कविता पाहिल्यानंतर मराठी कवितेत आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही बाबतीत आमूलाग्र बदल झालेला दिसतो; त्यामुळे त्यांनी मराठी कवितेत क्रांती घडवून आणली असे निर्विवादपणे म्हणता येते. इंग्रजी काव्याचा परिणाम त्यांच्यावर झाला आहे, परंतु त्यांची कविता संपूर्णपणे परभृत नाही. केशवसुतांनी सुरू केलेल्या आधुनिक मराठी कवितेचे अंतर्मुखता हे एक प्रमुख लक्षण आहे. इंग्रजीतील रोमँटिक कवींच्या अभ्यासाने मराठी कवितेत केशवसुतांनी रोमँटिक संप्रदाय सुरू केला. काव्यविषयक क्षेत्रात काही ठराविक विषयांची मिरासदारी होती ती मोडून साध्याही विषयात मोठा आशय पाहण्याचे सामर्थ्य कवितेला त्यांनी दिले. केशवसुतांच्या कविकाव्यप्रतिभाविषयक कविता

काव्याच्या स्वरूपाविषयी त्यांनी केलेल्या चिंतनाची साक्ष देतात. प्रतिभा ही 'अत्यद्भुत गूढ शक्ती' असून ती लाभलेले कवी 'देवाचे लाडके' असतात. अशा कवींना 'धोंड्यामधूनही दिसते:' तो 'दिक्कालांतून आरपार पाहू शकतो;' इतरेजन 'जीवनातील फोले' पाखडीत असले तरी कवी मात्र त्यातील 'सत्त्व' निवडीत असतात; असे त्यांनी म्हटले आहे. केशवसुतांनी मराठी कवितेत निसर्ग आणि प्रेमविषयक कवितांचे प्रवाह आणले, 'उज्ज्वल प्रीतीचे दर्शन म्हणजे केशवसुतांच्या सौंदर्यवादाचा नवा अवतार होता. त्यांच्या प्रेमकवितेमधून आत्मलेखन आले असले तरी त्या कवितेतील प्रेम कल्पनाजन्य होते असे दिसते. त्यांच्या निसर्गकवितांनी मराठीला नवी देणगीच दिली आहे. समाजातील ज्वलंत प्रश्नाचा स्फूर्तिदायक रीतीने प्रस्फोट करण्याचा प्रघात त्यांनी प्रथम पाडला. स्वप्राणाने तुतारी फुंकून रूढींवर त्यांनी आघात केले. 'जुनें जाऊ द्या मरणालागुनि' अशी तीव्रता व्यक्त करीत असताना या 'नव्या मनूच्या नव्या शिपायाला' 'जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत, सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसत आहेत' अशी उदात्त विश्वस्पर्शी जाणीवही झालेली दिसते. 'विश्वचि माझें मी विश्वाचा' अशी भावना झालेला हा कवी 'नरेंचि केला किती हीन नर' अशी स्थिती पाहून हळहळतो. सामाजिक जाणिवेच्या या कवितेव्यतिरिक्त केशवसुतांनी गूढगुंजनात्मक कविता लिहिण्याचा प्रघात सुरू केला. 'कोणीकडून कोणीकडे,' 'झपूर्झा', हरपलें श्रेय,' या त्यांच्या चिंतनिका प्रसिद्ध आहेत. कवितेच्या आशयाबरोबरच बहिरंगात देखील केशवसुतांनी बदल केला. अनेक मात्रावृत्ते योजून अक्षरगण-वृत्तांचे बंधन झुगारले. सुनीत हा रचनाप्रकार सुरू केला.

केशवसुतांच्या या कवितेचे प्रतिध्वनी टिळक, बालकवी, गोविंदाग्रज, बी, रेंदाळकर इत्यादींच्या काव्यांतही उमटले. या सर्वांची केशवसुतांच्या ठायी भक्ती होती. केशवसुतांनी मराठी कवितेत आणलेल्या विविध प्रवाहांना या कवींनी आपापल्या वैशिष्ट्यांसह समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. वयाने ज्येष्ठ असणाऱ्या रे. टिळकांनाही 'तुतारी मंडळा'त आपले नाव नोंदवून घ्यावेसे वाटले; तर गोविंदाग्रजांनी स्वतःला केशवसुतांचा 'सच्चा चेला' मानून घेण्यात धन्यता मानली.

आधुनिक कविता ही आत्मनिष्ठ असून व्यक्तींच्या वैयक्तिक अनुभूतींचे तीत चित्रण प्रामुख्याने झाले आहे. रे. टिळकांनी फुलामुलांच्या कवितेबरोबरच

'माझी भार्या' हे काव्यही लिहिले आहे. या कवितेत पत्नीविषयी असलेले गाढ प्रेम, आदर हे सर्व निःसंकोचपणे दिसून येतात. टिळकांची प्रकृती स्वभावतःच तत्त्वचिंतकाची. त्यांच्या प्रतिभेचे सर्व रमणीय विशेष 'वनवासी फुला'सारख्या तत्त्वचिंतनपर काव्यात दिसून येतात. टिळकांच्या कवितेतील उदात्त आणि सफल प्रेमाचा आविष्कार गोविंदाग्रजांच्या कवितेत मात्र दिसून येत नाही. त्यांची प्रेमकविता नैराश्याने भारलेली आहे. प्रेमाच्या या शाहिराने त्यावेळी तरुण महाराष्ट्रावर चांगलीच मोहिनी घातली होती. गोविंदाग्रजांची प्रेमविषय कविता केवळ कल्पनेचा खेळ आहे हे काही विद्वानांचे मत त्यांच्या कवितेतील उत्कटता पाहिल्यावर बरोबर वाटत नाही. कृत्रिमता, कारागिरी हे खऱ्या कवितेला मारक असलेले दोष गोविंदाग्रजांच्या कवितेत दिसतात. हे दोष असूनही त्यांच्या कल्पनावैभव, भाषाप्रभुत्व, इत्यादी गुणांमुळे त्यांची कविता लोकप्रिय झाली. गोविंदाग्रजांच्या प्रेमकवितेतील नैराश्य कविवर्य तांबे यांच्या कवितेत नाही. त्यांच्या कवितांना प्रेम हा एकच विषय आहे. केशवसुतांच्या प्रेमगीतांत आसक्ती आहे, टिळकांच्या पत्नीप्रेमात आदर आहे तर तांब्यांच्या प्रेमगीतांत आत्मसमर्पण आहे. प्रेमाच्या सर्व छटा तांब्यांच्या कवितेत उत्कटतेने दिसून येतात. क्वचित सांकेतिक शृंगारिक वर्णने आढळत असली तरी विविध भूमिकांशी समरसून गाइलेल्या गीतांत माधुर्य आले आहे. ही नाट्यगीते निर्माण करून तांब्यांनी मराठी कवितेतील नाट्यगीतांचे दालन समृद्ध केले आहे.

केशवसुतानंतर झालेल्या बालकवींनी निसर्गाचे वर्णन केले नसून निसर्गसौंदर्याचा त्यांच्या मनावर झालेला संस्कार कवितारूप केला आहे. बालकवी म्हणजे निर्भेळ निसर्गप्रीतीत रंगणारा कवी. 'कवि झाला सृष्टि, सारी सृष्टि झाली कवि' एवढी त्यांची निसर्गाशी तन्मयता. 'सुंदरतेच्या सुमनावरचें दंव चुंबुनि घ्यावें। चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावें' ही त्यांची प्रकृती होती. निसर्गाच्या साह्याने बोध करणे त्यांनी स्वीकारले नाही. सौंदर्यशोधासाठी ते निसर्गाशी तादात्म्य पावतात. बालकवींच्या शब्दांत रंगाची किमया आहे, सुरेल संगीत आहे. अंतःकरणाचा ओलावा आहे. 'बी' कवींनी बालकवींना 'रस' आणि गोविंदाग्रजांना 'रंग' म्हटले आहे ते अगदी यथार्थ आहे. सृष्टीवर मानवी भावनांचा त्यांनी आरोप केला आहे. निसर्गाशी समरस होऊन ते आपले स्वतंत्र कल्पनाविश्व निर्माण करतात.

बालकवींच्या कवितांना विचारांचे विशिष्ट असे अधिष्ठान नव्हते. 'बी' कवींची कविता विचारांचे अधिष्ठान लाभलेली आहे. त्यांचा जीवनविषयक स्वतंत्र असा दृष्टिकोण आहे. हे जग 'पूर्णापासून पूर्णाकडे' चाललेले आहे अशी त्यांची धारणा आहे. काव्य हे शब्दांचा नादमधुर खेळ नसून 'ऐश्वर्यात्मक सामर्थ्याची निर्माणक्षमता अंतरंग ओथंबुनी ओसंडे ती सुंदरता' 'केवळ सौंदर्याचीं स्फुरणें प्रस्फुरणें दिव्य, जिव्हार हेंच स्वानंदाचें, सौंदर्यचि काव्य,' असे त्यांचे मत आहे. बी कवींची प्रकृतीच तत्त्वचिंतकाची. त्यामुळे त्यांच्या सर्वत्र कवितांतून कमी–अधिक प्रमाणात तत्त्वचिंतन आले आहे. कमळा काव्य मात्र यास अपवादस्वरूप आहे.

१९२० पर्यंत केशवसुत संप्रदायातील प्रमुख कवी दिवंगत झाले. परंतु तांबे, बी यांचे काव्यलेखन चालूच होते. यानंतर रविकिरण मंडळ स्थापन झाले. माधव जूलियन, यशवंत, गिरीश, श्री व सौ. रानडे इत्यादी कवी रवि–किरणमंडळाचे सदस्य होते. केशवसुतांची परंपरा पुढे चालवून कविता कलापूर्ण, अधिक विविधतायुक्त, अधिक आकर्षक, अधिक लोकप्रिय करण्याचे कार्य रविकिरण मंडळाने केले असे एकमत आहे. ते काहीसे खरे आहे, असे म्हणता येईल. माधव जूलियनांच्या 'विरहतरंग' या काव्यावर जहरी टीका झाली असली तरी पण त्यातील अनुभूती उत्कट आहे. माधव जूलियनांच्या कविता त्यांच्या आंतर्जीवनाची स्पष्ट चित्रे आहे. आपल्या भावनेशी प्रामाणिक राहिल्यामुळे यशवंतांची कविता भावपूर्ण व सरस वठली आहे. यशवंत हे यशस्वी भावगीतकवी आहेत. त्यांची कविता दुःखाने, नैराश्याने डागळलेली आहे. त्यांच्या राष्ट्रीय आणि सामाजिक विषयांवरील कवितांतील आवेश जिवंत आहे. रविकिरण मंडळाने मराठी कविता लोकप्रिय केली असली तरी त्या कवितेतील स्थूलता, पसरटपणा, कारागिरी, कल्पना विस्तारात्मकता इत्यादी दोषांमुळे विपुल काव्यलेखन करून देखील मराठी कविता सखोल झाली आहे असे म्हणता येत नाही. रचनाविषयक अनेक दोषांचे विडंबन प्रल्हाद केशव अत्रे उर्फ केशवकुमार यांनी 'झेंडूची फुले' या संग्रहात केले आहे. आत्मकेंद्रिततेमुळे रविकिरणमंडळाच्या कवितेत वैयक्तिक सुखदुःखांची रडगाणी आली आहेत.

१९३० नंतरच्या काळात सामाजिक जीवनात प्रचंड वैचारिक वादळ निर्माण

झाले. समाजवादी क्रांतीचे पडसाद वाङ्मयात या काळात उमटलेले दिसतात. कुसुमाग्रज, बोरकर, अनिल या संस्कारक्षम कवींच्या काव्यात भूतदयावाद, मानवतावाद, क्रांतिवाद याचे प्रतिध्वनी उमटले आहेत. क्रांतीचे ध्येय समोर ठेवून काव्य रचणाऱ्या कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेला 'समिधा' असे म्हटले आहे. कुसुमाग्रज हे क्रांतिवादाचे प्रतिनिधी आहेत. "सामाजिक जीवनातल्या अश्रू, असंतोष, चीड, त्वेष इत्यादी साऱ्या गोष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेत आढळतात. पण या सर्वांचे चित्रण करून ते थांबत नाहीं, त्यांचे अश्रू दुबळे नाहीत." ते सूर्याच्या प्रखर तेजाचे उपासक असून अग्निसंप्रदायाचे प्रवर्तक आहेत. अनिलांच्या सुरुवातीच्या कवितेत प्रेमाची ओढ, हुरहुर, अधीरता आहे; परंतु नंतर वैयक्तिकतेतून त्यांचे कविमन समाजाच्या पातळीवर आले आहे. त्यांच्या कवितेतील मधूनमधून येणारी बोधवाक्ये मात्र खटकतात. कुसुमाग्रजांप्रमाणेच त्यांना नव्या सामाजिक जाणिवांनी भारले होते. 'रसरसून उजळवील जो मानवतेच्या प्रक्षोभास असा अखंड रस अनुभवीत आहो आम्ही पाखंडी' असे ते म्हणतात. मानवताविषयक त्यांचा दृष्टिकोण प्रसिद्ध आहे. कुसुमाग्रज—अनिल—कांत यांच्या काव्यात एक प्रकारची दाहकता दिसून येत असून उद्दाम आशावादाचे दर्शन घडते.

अशी दाहक कविता जन्मास येत असतानाच बोरकर, इंदिरा संत इत्यादी कवि—कवयित्री आपल्या प्रेमभावनेची सूक्ष्म आंदोलने शब्दांकित करीत होती. निसर्गविषयक अनुभूती ही बोरकरांच्या प्रेमानुभूतीचा एक अविभाज्य घटक असून प्रेमानुभूतीचा आविष्कार होत असतानाच निसर्गविषयक अनुभूती आपोआपच उमलतात.

'शिशिरागम' या कवितासंग्रहातील कविता पाहिल्यावर बालकवी आणि माधवजूलियन यांच्या कवितांचा प्रभाव मर्ढेकरांवर स्पष्ट दिसतो. परंतु त्यांच्या 'काही कविता' आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने संपूर्ण नवीन आहेत. यंत्रयुगामुळे संस्कारित झालेल्या जीवनातून जन्माला आलेल्या प्रतिमा वेगळ्या आहेत. जीवनातील विफलता आणि उगीचता त्यांच्या कवितेत प्रतिबिंबित झाली आहे. नव्या भावनानिष्ठ समतानतेमुळे त्यांची कविता 'नवीन' झाली.

महायुद्धानंतर मानवतेच्या झालेल्या विटंबनेचा उद्वेग कवीने शब्दबद्ध केला आहे. मर्ढेकरांच्या कवितेवर, नैराश्य, विफलता, अश्रद्धा, अश्लीलता इत्यादी

आरोप केले जातात. 'आणखी काही कविते'तील अभिव्यक्त झालेले मर्ढेकरांचे सौंदर्यपूजक व श्रद्धाशील मन पाहिले म्हणजे वरील आरोप पूर्णांशाने सत्य वाटत नाहीत.

केशवसुतांनी मराठी कवितेत केलेल्या आमूलाग्र क्रांतीनंतर रूढ झालेल्या मराठी कवितेत पुनः तशाच प्रकारची क्रांती मराठी कवितेत मर्ढेकरांनी केली. त्यामुळे मर्ढेकरांना 'दुसरे केशवसुत' असे संबोधण्यात येते. मर्ढेकरांपासून निर्माण झालेल्या कवितेचे स्वरूप भिन्न असल्यामुळे तिला 'नवकाव्य' असे म्हणतात. विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट वगैरे कवींनी नवकाव्याला स्थिरता प्राप्त करून दिली आहे. आशावाद, मानवी मूल्यांवरील श्रद्धा व्यक्त करून मराठी नवकाव्यात मर्ढेकरांबरोबर नवा प्रवाह शरच्चंद्र मुक्तिबोधादिकांनी निर्माण केला आहे.

आधुनिक मराठी कवितेचे एकंदर स्वरूप पाहता हे काव्य निर्माण करणाऱ्या कवींची भूमिका प्राचीन मराठी कवींपेक्षा सर्वस्वी भिन्न आहे असे दिसते. तत्त्वप्रतिपादन, भक्ती, स्वोद्धार ही प्रयोजने जाऊन केवळ कविता करणे हेच एक प्रयोजन अर्वाचीन मराठी कवींनी स्वीकारलेले दिसते. मधूनमधून सामाजिक सुधारणा, क्रांती इत्यादीसाठी आवाहन आले असले तरी तो काळाचा अपरिहार्य परिणाम आहे असे म्हणावे लागते. प्रयोजनभेदांमुळे प्राचीन कवी आणि अर्वाचीन कवी यांच्या काव्याच्या स्वरूपात भिन्नता निर्माण झालेली आहे. प्राचीन कवींच्या ठिकाणी असलेल्या अध्यात्मनिष्ठेची जागा अर्वाचीन युगात समाजनिष्ठा व भौतिकनिष्ठा यांनी घेतली आहे. त्यामुळे प्राचीन कवितेतील वर्णिलेली सुखदुःखे ही आध्यात्मिक स्वरूपाची होती तर ती आता आधिभौतिक स्वरूपाची झाली. अर्वाचीन कवितेचे आत्माविष्कार हे जरी मुख्य लक्षण समजले जाते तरी प्राचीन अभंग वाङ्मय हे देखील आत्माविष्कारात्मक आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

मराठी कवितेचे एकंदर परिशीलन केल्यास असे दिसून येते की जीवनाच्या प्रवाहाबरोबर काव्याचा प्रवाहदेखील बदलत आला आहे. यादवकालापासून आजपर्यंत महाराष्ट्राच्या समाजजीवनात झालेल्या स्थित्यंतरानुसार मराठी काव्याचे स्वरूपदेखील बदलत आले आहे.

—संपादक

ज्ञानेश्वर

# देशिकारें बांधों गीता

म्हणौनि व्यासाचा हा थोरु । विश्वा जाला उपकारु ।
श्रीकृष्णउक्ति आकारु । ग्रंथाचा केला ॥ १

आणि तो सियां हा आतां । व्यासाचिं पदें पाहातपाहातां ।
आणिला श्रवणपथा । मऱ्हाटिया ॥ २

व्यासादिकांचे उन्मेख । राहाटति जेथ साशंक ।
तेथ मी रंक एक । वाचाळे करीं ॥ ३

परि गीता ईश्वरु भोळा । ले व्यासोक्ति कुसुममाळा ।
परि माझेया दुर्वादळा । ना न ह्मणे ॥ ४

आणि जेया सिंधुतटा । पाणियां येंति गजघंटा ।
तरि काइ सुरकुटां । वारिजतसे ॥ ५

पांखिकुटें पांखिरुं । गगनीं नुडे तरि काइ करुं ।
नभ क्रमूनि थोरु । गरुडु देखैं ॥ ६

राजहंसाचें चालणें । भूतळिं चालावें कवणें ।
तरि आणिकि ही कुंटेपणें । चालावें लागे ॥ ७

जी आपुलेनि अवकाशें । अगाध घेपे कळशें ।
चूळु चूळु पाणी ऐसें । घेउनि निगे ॥ ८

दिवियेचां आंगिं थोरी । तरि ते बहुतां तेजातें करी ।
वाति आपुलिया परी । आणीकीं ना ॥ ९

जी समुद्राचेनि पैसें । समुद्रीं आकाशें आभासे ।
थिलरीं थिलरा ऐसें । बिंबे चि पैं ॥ १०

तेचि व्यासादिमहामती । वावरों ये इये ग्रंथीं ।
मां आह्मी ठाकों हें युगुति । निमले चि कीर ॥ ११

जिये सागरीं जळचरें । संचरति मंदराकारें ।
तेथ काइ सफरें । पव्हों न व्हांति ॥ १२

अरुणु आंगा जवळिके । ह्मणौनि सूर्यातें तो देखे ।
मा भूतळिं चि नेदखे । मुंगी काई ॥ १३

ह्यालागि आह्मां प्राकृतां । देशिकारें बांधों गीता ।
ह्मणणें हें अनुचिता । कारण नव्हे ॥ १४

आणि बापु पुढां जाये । देखां उचलतां पायें ।
आणि बाळक हळूहळू ये । तरि ते न पवों काइ ॥ १५

तैसा व्यासाचा मागोवा घेतू । भाष्यकारांतें पूसतु ।
अयोग्यु ही मी न पवतु । कें जाइन ॥ १६

आणि पृथ्वी जेया क्षेमा । सुभगे स्थावरजंगमा ।
जेयाचेनि अमृतें चंद्रमा । निववी जग ॥ १७

जेयाचें आंगें असिकें । तेज लाहूनि अर्कें ।
आंधाराचें सावाइकें । लोटिजतसे ॥ १८

समुद्रा जेयाचें तोए । तोया जेयाचें माधुर्य ।
माधूर्या सौंदर्य । जेयाचें होतें ॥ १९

पवना जेयाचें बळ । आकाश जेणें पघळ ।
ज्ञान जेणें उजळ । चक्रवर्त्ती ॥ २०

वेद जेणें सुभास । सुख जेणें सोल्लास ।
हें असो रूपस । विश्व जेणें ॥ २१

तो सर्वोपकारी समर्थु । सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथु ।
राहाटतसे मजआंतु । रिगौनियां ॥ २२

आतां आइती गीता जगीं । मीं सांघें मऱ्हाटिया भंगीं ।
एथ कैचा विस्मयालागि । ठाउ असे ॥ २३

श्रीगुरुचेनि नावें माती । डोंगरीं जेयापासिं होंती ।
तेणें कोळिये त्रिजगती । एकावद केली ॥ २४

चंदनें वेधिलीं झाडें । जालिं चंदनाचेनि पाडें ।
वसिष्ठें मानिली कीं भांडे । भानुसीं पाठी ॥ २५

मा मी तंव चित्ताथिला । आणि श्रीगुरु ऐसा दादुला ।
जो दीठिवेनि आपुलां । बैसवी पदीं ॥ २६

आधीं चि देखणी दीठि । वरि सूर्यु पुरवी पाठि ।
तैं न दिसे ऐसी गोठि । कोठें असे ॥ २७

ह्मणौनि माझे नीच नवे । श्वास ही प्रबंध होआवे ।
गुरुकृपा काइ न्हवे । ज्ञानदेउ ह्मणे ॥ २८

या कारणें मियां । गीतार्थु मऱ्हाटिया ।
केला लोकालागि या । दीठिचा विखो ॥ २९

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3६५६८ वि: काव्य
क्रमांक १६१८ नों दि २५।१।६४.

नरेंद्र

## भीमकीवर्णन

ते रूपस भीमकी । अवस्वरी कन्हणीं एकी ।
सभे येताय कवतिकी । भीमसेनांजवळी ॥ १

सवें धाकुटियांचा थोवा । जैसिया पुतळिया साजिवां ।
कीं कुळदेवता लेपिवां । रती–मदनांचिया ॥ २

कीं चंद्र–सरोवरिंचिया यक्षिणीं । कीं अमृताचिया विनीं ।
कीं मूर्तीसि आलिया जिनी । डोळेयांचिया ॥ ३

कीं लावण्य–लोकिंचिया विद्याधरा । कीं सुख–स्वर्गिंचिया अप्सरा ।
ना वा ते अवयेव निगाले हाथियेरा । अनंगाचिया ॥ ४

दीमती मुखचंद्र गोरे । ते जैसे चंद्राचे भाउ सावधारे ।
लक्षिमिये–सवें धाडिले क्षीरसागरें । आंगवळेया ॥ ५

तिया आंगभारें चालती राजसा । हांसेनि उजळति दाहि दिसा ।
दाटेति डोळेयांचां वळसां । सभेचे लोक ॥ ६

कास्मिराचिये करंडिये जैसे । भीतरिल मूर्ति प्रकासे ।
पातळा लुगडेयांतुनि तैसे । आवएव दीसताती ॥ ७

आंगीं रत्नांचीं अलंकरणें । कळावियांसी माल्हाडी वाति कांकणें ।
झळकत ताडवनांचें लेणें । बिंबत कपोळीं ॥ ८

ऐसी धाकुटेयाची मांदी । ते चालत राजसा बिदीं ।
बोभातिया अंदुचिया नादीं । अस्थानी माजवीति ॥ ९

तयांमाजि रुक्मिणीचें रूप । जैसे सिद्धरसाचे लेप ।
कीं चंद्राचें पूडिव नीकोप । कांडारिलें ॥ १०

कीं ते सुखाची सैंभ । कीं परिमळाची अक्षोभ ।
कीं रूपासि आली भांभ । शृंघाराची ॥ ११

कीं ते भुवन–मढिंची अंबिका । कीं सौंदर्य–लोकिची तारका ।
ना तरि जन्म–पत्रिका । मन्मथाची ॥ १२

कीं ते सौभाग्याची निधी । कीं बरवेपणाची आवधी ।
कीं सावेव दिव्य औषधी । वस्यकरणांची ॥ १३

कीं ते कुळदेवता क्षिराब्धिची । कीं अधिष्ठात्री अमृताची ।
नां ते चंद्रकुळाचार्यांची । कुळेश्वरी ॥ १४

तया मुखाचें पांतां सारिखें । लाजा चंद्र हिंवांचा होउनि उपेखे ।
निलोत्पळें हिरेमाणकें न देखे । आपुलां ठाइं ॥ १५

पांतां दिठीचे अनियाळपण । कमळदळें होति साधारण ।
जे कां मन्मथाचे बाण । भरंवसेयाचे ॥ १६

आधींचि रूप गोरें सावळें ऐसें । वरि तारुण्यें आंग उटतसे ।
तणें सपिंवळ छाया येतसे । क्षिरोदकासी ॥ १७

आंगाचेनि उजळपणें । भांसळत ठिकांचें लेणें ।
म्हणौनि मोतियांचीं अळंकरणें । भीम–कुमरियेसी ॥ १८

हातकडगां—पुढां हातसर । गळां मोतियांचें लेणें सविकार ।
कानिचे झळुंबुके करीति भिरार । कृत्तिकांसीं ॥ १९

मुख–चंद्र ते मदन–संजिवनीं । शुक्रु मागों आला उसिनी ।
तैसें मोतीं मिरवें वदनीं । रुक्मिणीयेचां ॥ २०

मोतियांचा भांगु मनकरू । जैसा शृंघार–गंगेचा अवतारू ।
आला जीवउं अनंग–सागरू । वादें चंद्र–मौळीसीं ॥ २१

रूप सुपाणीं चोख कैसें । मागां वेणी रुळत दीसे ।
ते रोमावळीयेचेनि मिसें । पुढां दिसत ॥ २२

कैसें सुकुमार रूपडें । पांतां दीठि कुचुंबैल फुडे ।
हातउबा कोमाइले आवडें । अमृताचिया ॥ २३

कवणि आंगाची वरव । वरि तारुण्याची उवाव ।
मनातें मुसिति ते भाव । अव्येवांचे ॥ २४

तिया मदनांचा गोसावी लाचाविला । सावेउ अनंगु जिवविला ।
तेया रूपाचा उठावा पहिला । तो कैसा सांघों ? ॥ २५

*एकनाथ*

# दोन भारुडे

## *१. महार*

जोहार जिवाजीपंत ठाणेदार । तुमचे गांवची वस्ती खबरदार ।
पहावया वागणूक साचार । मज धन्यांनी रवाना केलें की जी मायबाप ॥ १

धन्यांनीं सांगितलें मला । जीवाजीस आपण गांव दिला ।
तेणें गांवांतील वसूल बुडविला । ऐसें हें बरे नव्हे की० ॥ २

गांवची आबादी तुम्ही करा । धन्याचा कऊल पुरा करा ।
जमीन वजवून भरा सारा । पीक पिकवा भक्तिचें की० ॥ ३

पीक पिकेल अपार । तेथे मागते येतील निर्धार ।
त्यांसी दयाशांतीचा विचार । करून दान द्या की० ॥ ४

या पिकाचीं पांखरें तोडा । कामक्रोध भूस झाडा ।
आशा–मनीषा–तृष्णांचा तिवडा । करूनि खळें शुद्ध करा की० ॥ ५

धन्याचें बाकी पुरतें द्यावें । बाकी फिटतां वजा आपण घ्यावें ।
हें मूळचें बोलणें आहे । धन्याचें की० ॥ ६

तुम्ही तो पीक पिकवून । केले नाही बाकीचें खंडन ।
बाकी धन्याची ठेवून । तसेंच बसला की० ॥ ७

ही वागणूक तुमची नाही बरी । धन्याची बाकी चुकवा सारी ।
एकाजनार्दनी निर्धारीं । पीक पिके निर्धारीं प्रेमाचें की० ॥ ८

## ९. सर्प

स्वरूपमंदिरीं होतें मी एकली । माया सांजवेळ अविद्येचे चिळीं ।
माझें तुझें चालतां पाऊली । मोहो भुजंगें धरिली करांगुळी ॥ १

लोभसर्प डंखला करूं काय । स्वार्थसंपत्तीने जड झाला पाय ।
आशालहरी तापला माझा देह । तृप्ति वारा घाली वो गुरुमाय ॥ २

विषयनिंब बहु गोडिये आला । भजनगूळ तो मज कडू झाला ।
वित्तहानिचा गळां झेंडू आला । असत्य अशुद्धाच्या येताती गुरुळा वो ॥ ३

कामिनीकामाचे डोळां आलें पित्त । रसस्तुति निंदा काळ झाले दांत ।
विकल्प वासनेच्या मुंग्या धांवत । स्त्रीपुत्रलोभें जीवा पडली भ्रांत ॥ ४

मी-तूं पणाची थोर आली भूली । मी येथे कोण, ओळखी मोडली ।
अहंविवेक काया जड झाली । सद्गुरु गारुडी बोलवा माउली ॥ ५

गुरुगारुडी आला धांवुनी । बोधवैराग्याचें पाजिलें पाणी ।
विवेकअंजन घातलें नयनीं । सोहंशब्द वाजवी नामध्वनि ॥ ६

मिथ्या भूतमय अवघी ब्रह्मस्थिति । अभयस्वरूपीं लाविली विभूति ।
उतरला सर्प निवारली भ्रांती । एकाजनार्दनी आलीसे प्रचीति ॥ ७

मुक्तेश्वर

# द्रौपदीचा धावा

वाम हस्त तो वेणिये । सव्य सुटला वस्त्रनिरिये ।
इतुक्यामाजी द्वारावतिये । मनोदूत धाडिला ॥ १

झाली सर्वांची निराशा । सांडली आप्तवर्गांची आशा ।
म्हणे सोयरिया द्वारकाधीशा । कृष्णा परेशा मज एक ॥ २

लाऊनियां नेत्रपातीं । हृदयीं चिंतिली कृष्णमूर्ती ।
म्हणे धांव धांव गा श्रीपति । ये आकांतीं स्वामिया ॥ ३

पडती बहुतांचीं कारणें । करितां बहुतांचें धांवणें ।
सर्व सांडोनि मजकारणें । ये आकांतीं पावावें ॥ ४ ॥

कृष्णा मी तंव तुझीच कुमरी । यथार्थ जन्मलें तुझेच उदरीं ।
स्नेहें सुभद्रेचिये सरी । बहिण म्हणे मी पाठींची ॥ ५

परी मज येवढें भाग्य कैचें । मी दासी किंकरी साचें ।
पादुकातळीं मृत्तिकेचे । कण लागले जरी म्हणूं ॥ ६

तेही दुर्लभ सनकादिकां । तेथे मी किती यदुनायका ।
मस्तक ओढवी पादोदका । शंकर आपण निजांगें ॥ ७

पक्षियातें तुझें नाम । टेऊनि कुंटिणी स्मरे राम ।
तिये लागीं वैकुंठधाम । वस्तीस तुवां दीधलें ॥ ८

पाय स्पर्शोनिया मुरारी । शिळा केली दिव्य नारी ।
तिये अहल्येचिये सरी । मज उद्धरीं श्रीरंगा ॥ ९

सहस्र व्याघ्रांमाजी गाय । सांपडतां जेवीं बोभाय ।
तेवीं तूतें मोकलिली धाय । कृष्णा धांवें म्हणवुनी ॥ १०

हरिसी भक्तांचीं संकटें । सांडिसी दासांची दुर्घटें ।
तो पुरुषार्थ आजी कोठें । आच्छादिला सांग पां ॥ ११

सर्वां सर्वत्र तूं अनंत । जाणसी जीवींचें मनोगत ।
माझा नकळेचि वृत्तांत । हें काय अज्ञान तुज आलें ॥ १२

कृष्णा तूंच जनक जननी । वित्तगोत चक्रपाणी ।
तुजवेगळा न दिसे कोणी । मज निर्वाणीं सोइरा ॥ १३

तूंचि गे माझी कुळस्वामिणी । मानस तुळजापुरवासिनी ।
कौरवमहिषासुरमर्दिनी । धांवें धांवें धांवणिया ॥ १४

कौरवसभापाणीथडी । नक्रदुःशासनें घातली आढी ।
काया करोनि कडोविकडी । ओढीताडीं पीडियेलें ॥ १५

तयालागीं तूं घालिसी उडी । फेडीं दीनाचीं सांकडीं ।
धांवें पावें गा तातडी । कृपाळुवा गोविंदा ॥ १६

दुःशासन शंख वहिला । स्मरतां संतोषवेद हारविला ।
कौरव सागरीं बुडविला । तो कवणातें न काढवे ॥ १७

मत्स्यरूपीया नारायणा । धांवें पावें मधुसूदना ।
विभांडूनि याचिया वचना । समाधान मज द्यावें ॥ १८

माझा स्वधर्ममंदरागिरी । कौरवसमुद्रीं पडिला फेरीं ।
तया बुडतया उद्धरीं । कांसव होई केशवा ॥ १९

कांसवदृष्टी विलोकावें । मातें पाठीसीं घालावें ।
पाय पोटीं न धरावे । धावें पावें ये काळीं ॥ २०

माझी लाज हे धरित्री । रसातळा नेतो वैरी ।
यज्ञवराहरूपिया हरी । दाढें धरीं प्रतापें ॥ २१

माझा भाव तो प्रल्हाद । निष्ठुरीं गांजितां पावला खेद ।
शत्रु अहंकार स्तंभभेद । करूनि प्रगटे नरहरी ॥ २२

कौरव अहंता महीतळीं । वामनरूपिया वनमाळी ।
दाटी त्रिपादपायांतळीं । बळीबंधना पावावें ॥ २३

माझा भाव आणि भक्ती । तेचि जमदग्नि रेणुकासती ।
कुशब्दशस्त्रीं कौरवदैत्यीं । संत्रासिली अवनिये ॥ २४

ते निवटूनि धराभारा । फेडीं भार्गवपरशुधरा ।
द्रौपदी सती वसुंधरा । पांडवद्विजा अर्पीं कां ॥ २५

लाज हरिली दुःशासनें । तेचि सीता या रावणें ।
हरिली ते तुवां रघुनंदनें । प्रतापरुद्रें रक्षावी ॥ २६

आतां कृष्णा आठविया । तूंच आमुच्या विसाविया ।
कौरव अहंकारकाळिया । पायातळीं रगडीं कां ॥ २७

बौद्धरूपिया जगदीशा । कौरवीं मांडिली माझी हिंसा ।
करुणाकरा कृष्णा परेशा । प्राणरक्षक मज होईं ॥ २८

सांडूनि निष्ठुरतेचें वसन । दिशा वेढीं काय करून ।
मातें न देखतां नग्न । वस्त्रप्रद मज होईं ॥ २९

वळंघोनि प्रतापाचा घोडा । परजीं सुदर्शन काळखंडा ।
कौरवम्लेंछ वधूनि होडा । निष्कलंक मज करीं ॥ ३०

कौरवदुरुक्ती शिळाधारीं । मेघवृष्टी होतसे भारी ।
अचळकृपेचा गोवर्धन गिरी । मजवर धरीं गिरिधरा ॥ ३१

माझें मानससरोवर । प्रेमकल्हारीं सुमनहार ।
राजहंस रुक्मिणीवर । सदा स्वानंदें क्रीडतु ॥ ३२

आजी गेलास कवणे ठाया । मुक्ताफळें चरावया ।
गोंविलासी म्हणोनि माया । माझी तुवां सांडिली ॥ ३३ ॥

वृंदावनींचे विहारिणी । कृष्णसखिये सांगातिणी ।
धांव पाव मायबहिणी । वेळ न लावी स्नेहाळे ॥ ३४

सगुणउपासकाचे पूजे । कीं योगियांचे समाधिशेजे ।
विश्रामलीस म्हणोनि माझें । स्मरण तूतें नव्हेचि ॥ ३५

तेवीं धांवा करितां तुझा । हृदयस्फोट झाला माझा ।
कंठ शोषला अधोक्षजा । तुज बाहतां आकांतीं ॥ ३६

तरी जागी नोव्हेसी माये । सांग आतां मी करूं काये ।
प्राण धाडूं द्वारावतीये । प्रेत ओपूं पापिया ॥ ३७

सर्वां सर्वत्र तुझे कान । सर्व देखणे तुझे नयन ।
आज नायकसी वचन । एवढें व्यसन न देखसी ॥ ३८

तुझें व्यापकत्व काय झालें । माझें हृदय कां सांडिलें ।
एवढें निर्वाण कां मांडिलें । अहो कृष्णे जननिये ॥ ३९

कृष्णा तूं स्नेहाळ माउली । तूंचि कृपेची साउली ।
तुवां उपेक्षा जरी केली । मग जिणें कायसें ॥ ४०

म्हणोनि अपराध पाप बहुत । तेणें झालीस दयारहित ।
तुझेनि नामें एकें त्वरित । पर्वत जळती पापाचे ॥ ४१

देखोनि सहस्रनामस्तोत्र । जिव्हा केली पुस्तकपत्र ।
यालागीं भक्तातुल्य पवित्र । भुवनत्रयीं असेना ॥ ४२

नाम घेतां तुझी मूर्ती । उभी ठाके स्मरे त्याप्रती ।
ते तुझी ब्रीदावली श्रीपती । गळोनि पडली केउती ॥ ४३

वस्त्रें हिरोनिया अवकळा । येथें झालिया गोपाळा ।
तुझें पाय याचि डोळां । कोण्या मुखें विलोकूं ॥ ४४

ऐसा द्रौपदीमुखयंत्रींचा । यंत्रगोळा उसळला साचा ।
करुणातेजें सुतेजाचा । बाळभानु ज्यापरी ॥ ४५

तो झगटोनि कृष्णश्रवणीं । आदळला हृदयभुवनीं ।
सुखनिद्रेचिये सदनीं । जागरोनीं खडतरला ॥ ४६

तुकाराम

# अभंगठेवा

१

माझें तो स्वभाव मज अनावर । तुज ही देतां भार कांहीं नव्हे ॥
ऐसें कळों आलें मज नारायणा । जागृति स्वपना ताळ नाहीं ॥
संपादितों तो हा अवघा बाह्य रंग । तुझा नाही संग अभ्यंतरीं ॥
तुका म्हणे सत्या नाहीं पाठी पोट । असतें निवोंट एकी जाती ॥

२

हरिनामवेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥
तेथे माझ्या मना होई पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या ॥
मुळींचिया बीजें दाखविली गोडी । लवकरचि जोडी जालियाची ॥
तुका म्हणे क्षणक्षणां जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥

३

प्रीतिभंग माझा केला पांडुरंगा । भक्तिरस सांगा कां जी तुम्ही ॥
म्हणऊनि कांहीं न ठेवीं चि उरी । आलों कर्मावरी एकाएकीं ॥
न देखोंचि कांही परती माघारी । उरली ते उरी नाहीं मुळीं ॥
तुका म्हणे आला अंतरासी खंड । तरी माझें तोंड खवळिलें ॥

४

जरी मी नव्हतों पतित । तरि तूं पावन कैंचा येथ ॥
म्हणोनि माझें नाम आधीं । मग तूं पावन कृपानिधी ॥

लोहो महिमान परिसा । नाहीं तरीं दगड जैसा ॥
तुका म्हणे याचकभावें । कल्पतरू मान पावे ॥

५

आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषी । साच भावें वर्ताव्या ॥
झाडूं संताचे मारग । आडरानें भरलें जग ।
उच्छिष्टाचा भाग, शेष उरलें तें सेवूं ॥
अर्थ लोपलीं पुराणें । नाश केला शब्दज्ञानें ।
विषयलोभी मन । साधनें बुडविलीं ॥
पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी धाक दरारा ।
तुका म्हणे करा । जयजयकार आनंदें ॥

६

न देखवे डोळां ऐसा हा आकांत । परपीडे चित्त दुःखी होतें ॥
काय तुम्ही येथें नसालसें जालें । आम्ही न देखिलें पाहिजे हें ॥
परचक्र कोठें हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया ॥
तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें ॥

७

मेलें घातलें रडाया । नाहीं असु नाहीं माया ॥
तैसा भक्तिवाद काय । रंग बेगडीचा न्याय ॥
वेठी धरिल्या दावी भाव । मागें पळायाचा पाव ॥
काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे न लगे वाती ॥

८

नाही काष्ठाचा गुमान । गोवी भ्रमरा सुमन ॥
प्रेम प्रीतीचें बांधलें । तें न सुटे कांहीं केलें ॥
पदरीं घाली पिळा । बाप निर्बळ साटी बाळा ॥
तुका म्हणे भावें । भेणें देवें आकारावें ॥

९

ओलें मूळ भेदी खडकाचें अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धि ॥
नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड । नाहीं कड्वाड तोंच वरि ॥
दोरें चिरा कापे पडिला कांचणी । अभ्यासें सेवनीं विष पडे ॥
तुका म्हणे कैचा बैसण्यासी ठाव । जठरीं बाळा वाव एकाएकीं ॥

१०

अनुभवावांचून सोंग संपादणें । नव्हे हें करणें स्वहिताचें ॥
तैसा नको भुलो बाहिरल्या रंगें । हित तेंचि वेगें करूनि घेईं ॥
बहुरूपी रूपें नटला नारायण । सोंग संपादून जैसा तैसा ॥
पाषाणाचें नांव ठेवियलें देव । आणिका तारी भाव परि तो तैसा ॥
कनक झाड म्हुण वंदियेलें माथां । परि तें अर्थां न मिळे माजी ॥
तुका म्हणे त्याचा भाव तारी त्यास । अहंभावी नास तो चि पावे ॥

रामदास

# म्हणौनि सद्गुरु वर्णवेना

आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप मज अज्ञाना । काय कळे ॥ १

नकळे नकळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुति ।
तेथें मज मूर्खाची मति । पवाडेल कोठें ॥ २

मज न कळे हा विचारू । दुरूनि माझा नमस्कारू ।
गुरुदेवा पैलपारू । पाववी मज ॥ ३

होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा ।
आतां असाल तैसें असा । सद्गुरु स्वामी ॥ ४

मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ।
माया जाली लज्जायमान । काय करूं ॥ ५

नातुडे मुख्य परमात्मा । म्हणौनि करावी लागे प्रतिमा ।
तैसा मायायोगें महिमा । वर्णीन सद्‌गुरूचा ॥ ६

आपुल्या भावासारिखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ।
तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ॥ ७

जय जयाजि सद्‌गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधू ॥ ८

तुझीयेन अभयंकरें । अनावर माया हे वोसरे ।
जैसें सूर्यप्रकाशें अंधारें । पळोन जाये ॥ ९

आदित्यें अंधकार निवारे । परंतु मागुतें ब्राह्मांड भरे ।
नीसी जालिया नंतरें । पुन्हां काळोखें ॥ १०

तैसा नव्हे स्वामीरावो । करी जन्ममृत्य वाव ।
समूळ अज्ञानाचा ठाव । पुसून टाकी ॥ ११

सुवर्णाचें लोहो कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
तैसा गुरुदास संदेहीं । पडोंचि नेणे सर्वथा ॥ १२

कां सरिता गंगेसी मिळाली । मिळणी होतां गंगा जाली ।
मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा ॥ १३

परी ते सरिता मिळणीमागें । वाहाळ मानिजेत जगें ।
तैसा नव्हे शिष्य वेगें । स्वामीच होय ॥ १४

परिस आपणा ऐसें करीना । सुवर्णें लोहो पालटेना ।
उपदेश करी बहुत जना । अंकित सद्‍गुरूचा ॥ १५

शिष्यास गुरुत्व प्राप्त होये । सुवर्णें सुवर्ण करितां नये ।
म्हणौनि उपमा न साहे । सद्‍गुरूसी परिसाची ॥ १६

उपमे द्यावा सागर । तरी तो अत्यंतची क्षार ।
अथवा म्हणों क्षीरसागर । तरी तो नासेल कल्पांतीं ॥ १७

उपमे द्यावा जरि मेरू । तरीं तो जड पाषाण कठोरू ।
तैसा नव्हे कीं सद्‍गुरु । कोमल दीनाचा ॥ १८

उपमे म्हणों गगन । तरी गगनापरीस तें निर्गुण ।
या कारणें दृष्टांत हीन । सद्‍गुरूस गगनाचा ॥ १९

धीरपणें उपमूं जगती । तरी हेही खचले कल्पांतीं ।
म्हणौन धीरत्वास दृष्टांतीं । हीन वसुंधरा ॥ २०

आतां उपमावा गभस्ती । तरी गभस्तीचा प्रकाश किती ।
शास्त्रें मर्यादा बोलती । सद्‍गुरु अमर्याद ॥ २१

म्हणौनि उपमे उणा दिनकर । सद्‍गुरुज्ञान प्रकाश थोर ।
आतां उपमावा फणिवर । तरी तोहि भारवाही ॥ २२

आतां उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ ।
सद्गुरुरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥ २३

सद्गुरूसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्यपंथ ।
सद्गुरुकृपा यथार्थ । अमर करी ॥ २४

सद्गुरूसी म्हणावें कल्पतरू । तरी हा कल्पनातीत विचारू ।
कल्पवृक्षाचा अंगिकारू । कोण करी ॥ २५

चिंतामात्र नाहीं मनीं । कोण पुसे चिंतामणी ।
कामधेनूची दुभणी । निःकामासी न लगती ॥ २६

सद्गुरु म्हणो लक्ष्मीवंत । तरी ते लक्ष्मी नाशिवंत ।
ज्याचें द्वारीं असे तिष्ठत । मोक्षलक्ष्मी ॥ २७

स्वर्गलोक इंद्रसंपती । हे काळांतरीं विटंबती ।
सद्गुरुकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ॥ २८

हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।
सर्वदा अविनाश येक । सद्गुरुपद ॥ २९

तयासी उपमा काय द्यावी । नाशिवंत सृष्टी आघवी ।
पंचभूतिक उठाठेवी । न चले तेथें ॥ ३०

म्हणौनि सद्गुरु वर्णवेना । हे गे हेचि माझी वर्णना ।
अंतरस्थितीचिया खुणा । अंतर्निष्ठ जाणती ॥ ३१

रघुनाथ पंडित

# नलदमयंतीसंवाद

"कोण तुम्ही कवणाचे कोठुनि येथे कां आला हो ।
काय निमित्तें दिधला मजला हा निजदर्शनलाहो ॥

अटक न केली तुम्हांसि येतां त्या सातांही बंकीं ।
हीं माझ्या नयनाचीं सुकृतें विशेष मी हें शंकीं ॥

संभवला कवणाचे वंशीं सांगा हो अकलंकी ।
उभे असां कां, भागतसां हो या बसा पर्यंकीं ॥

राजे असाल तरि धन्य वसुंधरा हे ।
शोभाल देव तरि नाक यथार्थ आहे ।
भोगी तुम्ही उपजलां जरि नागलोकीं ।
खालीं असोनि सकळांवरि होय तो कीं ॥

दुग्धपूर नसतां निजरूपीं क्षीरसिंधु तो जैसा ।
वसंत आला नाही तरि तो उद्यानभाग जैसा ॥

अमृतकराचा उदय न होतां रजनीसमय जैसा ।
तुमच्या विरहें आजि जाहला कवण देश तो ऐसा ॥

भूपाळ जो मम मनो-मुकुरीं उभासे ।
तो नैषधेंद्र तुमचा अनुबिंब भासे ।
रूपें तरीच दिसताति दिगंतराळीं ।
तीं हीं कशीं म्हणवतील तुम्हां निराळीं ॥

सरस-द्युति-पद फुल शिरसाचें मृदु फुललें स्वभावें ।
चालवाल किती दूर तयातें अदय हृदयभावें ।
कर्णयुगुल हें धन्य करावें सांगुनि निज नांवें" ।
स्तवन करी रघुनाथ तयाचें कवन आदरावें ॥

"आहेस कीं सुखवती कमनीय-लीळे ।
निश्चिंत कीं हृदय होय तुझें सु-शीळे ।
आतां नकोच अवलंब विलंबनाचा ।
हेजीब मी समज मुख्य सुराधिपाचा ॥

जो धरीं निज-करीं शत-कोटी ।
ज्याशि नम्र सुमनःशतकोटी ।
तो सुरेंद्रहि तुला नत याची ।
हा असो वर, तुला न तयाची ॥

तया इंद्रा करीं धरीं । अथवा तयाचे शेजारीं ।
नांदे जो तेजोनिधी भारी । तया वरीं राजसे ॥

तोही येईना जरी मना । तरी वरावें शमना ।
अथवा करुनि करुणा । त्या वरुणा वरीं कीं ॥

ऐसें बोलतां भूपाळ । काय बोले ते वेल्हाळ ।
"कां बोलतां पाल्हाळ । नाम कुळ सांगावें" ॥

बोले नृपाळ, "पुससी मज वंशनामें ।
याबीण सांग तटलीं तुझि काय कामें ॥
आलों सुधांशुमुखि जे घटना कराया ।
तीतें विचारुनि वरीं सुर-लोक-राया" ॥

बोले सुंदरी तयासी । "स्ववंशनाम न सांगसी ।
तरी आम्ही परपुरुषासीं । वदणें मर्यादा नोहे" ॥

तिचा पाहुनियां कोप । काय बोले नळभूप ।
"चंद्र-वंशाचें हें रोप । माझें जाण राजसे ॥

महाजनाचा आचार । निजनामाचा उच्चार ।
करूं नये हें साचार । शास्त्राधार आहे कीं" ॥

पुन्हा बोलते सुंदरी । "चंद्रवंशीं महीवरी ।
बहु आहेत ते परी । नामें घेतां जाणवे ॥

'मी वासुदेव' ऐसें स्व–नाम मुरहर वदे सकळ–वेदी ।
आधार तोचि मानुनि निजाभिधानासि कवण न निवेदी"

बोले नैषधेंद्र वाचा । "नाम हेजीब इंद्राचा ।
किती साक्षेप नामाचा । काय तेणें करिसी तूं ॥

केला काय अंगीकार । बोलूं इंद्रासी निर्धार" ।
तंव ते बोले सुकुमार । चंद्राकारवदनातें ॥

"ऐरावतावरि बसोनि विमानदेशीं ।
जो संचरे सुरपती सुख–संपदेशीं ।
मी भूमिकेवरि असोनि तयास कांही ।
मागावया तरि कशी मज लाज नाही ॥

नळावेगळा भ्रतार । नलगे स्वप्नीं हे साचार ।
ऐसा निश्चय विचार । तंव राजेंद्र बोलतो ॥

"टाकुनि इंद्राचा संभ्रम । धरिशी कां तूं नळभ्रम ।
जाईल विश्राम विभ्रम । नसतां श्रम होईल ॥

तुझें सौंदर्य पहावया । धरी सहस्राक्ष काया ।
तया वरीं देवराया । नळ-माया टाकुनी ॥

अथवा तुज जो मोहला । होऊं नेदी नैषधाला ।
यास्तव त्याच इंद्राला । माळ गळां घालावी" ॥

येणेंपरीच "अनळासि यमाधिपासी ।
पाशीसही तरि वरी" म्हणतां नृपासी ।
आधार लेश न वदे नव–सारसाक्षी ।
होते तयासि सुर–नायक गुप्तसाक्षी ॥

*मोरोपंत*

# गंगास्तव

महोदारे ! गंगे ! अगणित महा दोष हरिला;
दिला दीनोद्धारें बहुतचि तुवां तोष हरिला ।
न कोणीहि पापी जन म्हणुनि जागा ढकलिला ।
सदां बाधे त्रास भ्रमकर तुझा गाढ कलिला ॥ १

गळावा त्वत्तीरीं भगवति ! न हा देह सदनीं
पडो गंगे ! तूझें, मरणसमयीं, तोय वदनीं ।
विवेकीं यावें, जें धवलपण हेरंबरदनीं
भवीं हो त्वन्नेत्र, प्रभुनयन तें जेंवि मदनीं ॥ २

पहातां दीनातें, सकरुण खरा तो कळकळे
द्रवेना तत्प्रेमा भगवति ! मना पोकळ कळे ।
तव स्नेहा नाहीं जननि ! उपमा; तापलि कडे
मुला घे जी साची, ढकलि उपमाता पलिकडे ॥ ३

समर्था तूं, चित्तीं भवभय धरूं कां पतित मी
रवीच्या पार्श्वींचे, न, पडुनि कधीं, कांपति, तमीं ।
जगन्माते ! गंगे ! अभयवर तो दे वर्सावता
त्वदंकीं, हृत्पद्मा प्रति सुखद तो देव सविता ॥ ४

जगन्माते ! गंगे ! प्रवर वर दे; पाव; नत मी
निवासार्थी आहें, चिर तव तटीं पावनतमीं ।

न देणें भारी हें, वर बहुत देतीसचि, वसे
बक, व्याळ, व्याघ्र, प्रिय करुनि घेती, सचिवसे ॥ ५

सदाही संसारीं विषयरत जो मानव ढिला
तया देशी, द्यावा बहुतचि जसा मान वढिला ।
असें केलें गंगे ! चिर हरिपणें कीं हरपणें
विराजावें जीवें, कृपणपण जेणें हरपणें ॥ ६

सदा देऊं गंगे ! सदमृत तुझें शुद्धरुचितें
नुपेक्षू; पापी मी जरि, तरी मला उद्धरुचि तें ।
नकोचि स्वर्गीचें, सुगुरुवचनें; ज्या सपकसें
कळे, तो त्यासाठीं करिल गुणवेत्ता तप कसें ॥ ७

न कंटाळावें त्वां, सुरतटिनि ! हें होय रुचिर
स्वयें दीनोद्धारव्रत वरुनि पाळूनि सुचिर ।
जितें श्रीवाल्मीकिप्रमुख कवि गाती, तिस तरी
स्तवूं, कीं तूं माते ! खळभवनदीं होतिस तरी ॥ ८

तुवां मत्पत्राला जननि ! दिधला मान, कळलें
तुझें, कारुण्यार्द्रे !, मन मजकडे स्पष्ट वळलें ।
सुखें येणें झालें, सकळहि पथीं विघ्न टळलें
प्रसू प्रक्षाळील त्वरित न कशी बाळ मळलें ॥ ९

करी सुग्रीवार्थे प्रभुवर जसा वालिशमना
तसें दे, आधीतें मथुनि, सुख या बालिशमना ।
तुझ्या पायां झाला द्युनदि ! जरि हा पाप नत गे
समर्थातें जातां शरण, पळ ही ताप न तगे ॥ १०

न थोरांहीं कोणीं स्वपदनत मोहा निरविला
सदा योग्या होय द्युनदि ! न तमोहानि रविला ।
सुखें न्हाल्या प्याल्यावरि हि तुझिया भव्य सलिला
जनें भ्यावें, विष्णुप्रभुपदसुते, काय कलिला ॥ ११

सुखी केले रामें, मुनि सम चि, भागीरथि ! कपी
यशा या जो तो ही, तव अमृत जैसें, पथिक पी ।
तुझी ही श्रीगंगे ! नुरवि जनमोहा हि महिमा
सुकीर्ति ज्ञाल्यांला म्हणवि च नमो हा हि महिमा ॥ १२

यदुत्पन्ना तूं, त्या न च कृपणवाणी परिसवे
सवेग श्रीभर्ता सुखवि, करि पायापरि सवे ।
तशीच श्रीगंगे ! प्रकृति तव कीं नित्य रसदा
सदां देवर्षींच्या निवविसि, यशें शोभसि, सदा ॥ १३

नको दुग्धाब्धीचें, जरि महित आहे, सुतट तें
तुझें दे, याणें चि द्रुत उर अरींचें उतटतें ।
तया स्वीकारीना, त्यजुनि बरवें हा जवळिल
स्वयें या बाळाच्या विधि हि न मना आज वळिल ॥ १४

न यावा श्रीगंगे ! तव सुवदना बोल 'चिप' हा
रहाया त्वत्तीरीं जन सकळ ही लोलचि पहा ।
म्हणावें त्वां क्षिप्र, 'त्यजुनि, धरिला आळस, मज
प्रिये अर्थें, घेसी जरि बहु शिशो ! आळ, समज' ॥ १५

तुझ्या तीरीं नीरीं हृदय रमतें, दुःख शमतें
यशोगानें पानें कुमत गळतें, विघ्न टळतें ।
कळी भंगे गंगे !, षडरि झुरती, दोष नुरती
दिली रामें, नामें तशिच जगतीला निजगती ॥ १६

द्रवावें त्वां गंगे ! द्रवुनि भगवत्कीर्ति वळली
कृपा केली जी, ती बहु म्हणुनि सर्वत्र कळली ।
म्हणें प्रेमें सेवी प्रमुदित रहा मी नर मला
न कां द्यावें ? ओघीं तव मकर हा मीन रमला ॥ १७

यमाच्या, दृष्टीतें न हरिहर ही दे वहिवर
तपस्वी देतात, स्तवन करितां, देव हि, वर ।

न या ठावें, जाणे परम पटु जो तो कवि, हित
स्वयें माता पाहे, किमपि नुमजे तोक, विहित ॥ १८

नसे लोकीं अन्या अगति गति धन्या तुजविना
स्वजन्म त्वद्रोधीं कवण कृतबोधी उजविना
कृपा गंगे ! तोकीं कर, पसरितों कीं पदर हा
मयूरा या दीना, सकळ बळहीना, वद 'रहा' ॥ १९

*मध्वमुनीश्वर*

# उद्धवा, शांतवन कर जा

उद्धवा शांतवन कर जा । त्या गोकुळवासि जनांचें ॥ ध्रु०

बा नंद–यशोदामाता । मजसाठीं त्यजितिल प्राण ॥
सांडुनि प्रपंचा फिरती । मनिं उदास रानोरान
अन्नपाणि त्यजिलें रडती । अतिदु:खित झाले दीन ॥
जन्मलों तेंहुनी झटले
कटिखांदे वाहतां घटले
मजलागीं तिळतिळ तुटले
आटलें रक्त देहाचें । त्या गोकुळवासि जनांचें ॥ १

आईबाप त्यजुनी बाळें । मजसंगें खेळत होतीं ॥
गोडशा शिदोऱ्या अणुनी । आवडिनें मजला देती ॥
रात्रंदिस फिरले मागें । दधिगोरस चोरू येती ॥
मी तोडुन आलों तटका
तो जिवा लागला चटका
मजविण त्या युगसम घटका
आठवतें प्रेम तयांचें । त्या गोकुळवासि जनांचें ॥ २

पतिसुतादि गृहधन त्यजिलें । मजवरतीं धरूनी ममता ॥
मानिलें तुच्छ अपवर्गा । मजसंगे निश्चळ रमतां ॥
मद्दत्तचित्त त्या गोपी । नेत्रांतरिं लेवुनि समता ॥

तिळतुल्य नाहिं मनिं डगल्या
दृढनिश्चय धरुनी तगल्या
बहुधा त्या नसतिल जगल्या
भंगले मनोरथ ज्यांचे । त्या गोकुळवासि जनांचें ॥ २

हरि आहे सुखरुप म्हणुनी । भेटतांचि त्यां सांगावें ॥
सांग कीं समस्तां पुसिलें । प्रत्युत्तर त्या मानावें ॥
कथुनियां ज्ञान तयातें । सांग कीं शोक त्यजावे ॥
हें कार्य नव्हे तुजजोगें
मजसाठी जावें वेगें
हें मध्वमुनीश्वर सांगे
त्या न पवे ज्ञान जयाचें । त्या गोकुळवासि जनांचें ॥

*होनाजी बाळा*

# घनश्याम सुंदरा श्रीधरा

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु०

सायंकाळी एके मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं
अरुणोदय होतांच उडाले चरावया पक्षी ॥
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणदक्षी
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं
यमुनाजळासि जाति मुकुंदा दध्योदन भक्षी ॥
मुक्तता होऊं पाहे कमळिणिपासुनि भ्रमरा
पूर्वदिशें मुख धुतलें होतसे नाश तिमिरा
उठिं लौकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमरा
मुखप्रक्षाळण करी अंगिकारीं भाकरकाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥

घरोघरिं दीप अखंड त्याच्या सरसावुनि वाती
गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति जाति ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालुं पाहती
आनंदकंदा प्रभात झाली उठ सरली राती ॥
काढिं धार क्षिरपात्र घेउनी धेनू हंबरती
द्वारिं उभे गोपाळ हाक मारुनि तुज बाहती ॥

हे मुक्तहार कंठीं घालिं या रत्नमाळा
हातिं वेत्रयष्टि बरवी कांबळा घेइं काळा
ममात्मजा मधुसुदना हृषिकेशि जगत्पाळा
लक्षिताति वासुरें हरी धेनुस्तनपानाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥

प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकारें नटती
कुंकमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभिती ॥
प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळि गाती
अर्घ्यदान देउनियां द्विजगण देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णुपुजा समर्पिती
स्मार्त शिवार्चनसक्त शक्तितें शाक्तहि आराधिती ॥
ऋषिगण आश्रमवासी॰जे निरंजनीं धाले
अरुणोदयिं अपुलाले ध्यानीं निमग्न झाले
पंच पंच उषःकाली रविचक्र निघों आलें
एवढा वेळ निजलासि म्हणुनि समजेल नंदाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं
अध्यापन गुरु करिती शिष्यहि अध्ययना उदयीं ॥
याज्ञिकजन कुंडामधिं आहुति टाकितात पाहीं
रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे पाडसे सांवळे उठ कृष्णाबाई
सिद्ध सवें बळिराम घेउनि गोधनें वना जाई ॥
मुनिजनमानसहंसा श्रीमनःकमलभृंगा
मुरहर पंकजपाणी पद्मनाभ श्रीरंगा
शकटांतक सर्वेशा हे हरि प्रतापतुंगा
कोटि रवींहुनि तेज आगळें तुझिया वदनाला
होनाजि बाळा नित्य ध्यातसे हृदयिं नाममाळा ॥

*कृष्णशास्त्री चिपळूणकर*

# अन्योक्ति

## १. *कोकिळान्योक्ती*

येथे समस्त बहिरे वसताति लोक ।
कां भाषणें मधुर तूं करिसी अनेक ? ।
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक ।
वर्णावरून तुजला गणतील काक ॥ १

या माळावरि वृक्ष एकहि नसे बाळा खुळ्या कोकिळा ।
येथें मंजुळ शब्द काढुनि गळां कां शोषिसी आपुला ? ।
जेथें बोल अमोल वाटति तुझे तो देश बा वेगळा ।
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोहींकडे आगळा ॥ २

कां बा सुस्वर शब्द काढिशि पिका राहे उभा काळ हा ।
लोटे तों तरुकोटरीं लपुनियां कोठेंतरीही रहा ।
पानें तीव्र हिमें गळोनि दिसती झाडें जळाल्यापरी ।
गर्जे कर्कश शब्द थोर करुनी काकावली त्यावरी ॥ ३

वसंतसमयीं फुलें, परिमळें दिशा व्यापि जो ।
जयास अवलोकुनी सुरतरूहि चित्तीं थिजो ।
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती ।
परी पिकचि एकला मधुरवाणि लाधे कृती ॥ ४

ज्याचे पूर्वी वसंतीं परिमलबहलीं आम्रवृक्षीं सुखाचे ।
गेले गुंजारवातें दिवस परिसतां मत्त भृंगांगनांचे ।
कैसे त्या कोकिलातें अधम करिति हे कावळे चंचुघाता ।
कोठें थारा मिळेना, गरिब पळतसे वांकडा काळ येतां ॥ ५

## २. गजान्योक्ती

कर्णीं लोंबति चामरें चमकती माळा गळा साजिऱ्या ।
वेली रंगविल्याहि शोभति शिरीं सोंडेवरी गोजिऱ्या ।
ऐसा तो नटला तरी नृपकरी पायीं बिडी वागवी ।
कैसी त्यास मिळे स्वतंत्र वनिंच्या हत्तीपुढें थोरवी ॥ १

ज्याची स्पर्धा कराया इतर गज कधीं शक्त नाहींच झाले ।
सांगावें काय ! ज्याच्या मृगपतिहि भयें रान सोडून गेले ।
तो पंकामाजिं आजी गजवर फसला युक्ति नाहीं निघाया ।
अवहेरीती पहा हे कलकल करूनीं क्षुद्र कोल्हे तयाला ॥ २

पूर्वीं बाळपणीं वनीं मुनिजनीं प्रेमें जया पोशिलें ।
देवोनी धनधान्यमुष्टि जलही पाजून कुंभांतलें ।
झाला तो गज थोर आजि फिरती भुंगे तयाभोंवतीं ।
त्यातें पाहुनि ते मुनी दचकती संतोषही पावती ॥ ३

केशवसुत

# स्फूर्ती

कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या !
प्राशन करितां रंग जगाचे क्षणोक्षणीं ते बदलूं द्या !
अमुच्या भाळीं कटकट लिहिली सदैव वटवट करण्याची,
म्हणेल जग आम्हांस मद्यपी, पर्वा कसली मग याची !
जिव्हेचीं बंधनें तर ढिलीं करा तीव्र या पेयानें;
यदुष्णतेनें द्यावापृथ्वी द्रवुनी मिसळती वेगानें !
होउनियां मग दंग मनीं,
व्हावें तें आणा ध्यानीं,
गा मग सुचतिल तीं गाणीं;
परिसुनि त्यांचे शब्द, रूढिचे दास झणीं ते खवळूं द्या !
कांठोकाठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ! १

सोमाचा रस वेदकाळच्या ऋषिवर्यांनीं उकळीला,
शेष तयाचा द्या तर लवकर पिपासु जे त्या आम्हांला !
औचित्याच्या फोल विवेका ! जा निघ या दुरवस्थेनें
अम्हां घेरिलें म्हणुनी घेतों झिंगुनियां या पानानें !
कलशींची मग करुनी नौका व्योमसागरावरि जाऊं,
उडुरत्नें या गरिब धरेला तेथुनि फेंकुनियां देऊं !
अडवतील जर देव, तरी
झगडूं त्यांच्याशीं निकरीं
हार न खाऊं रतीभरी !

देवदानवां नरें निर्मिलें, हें मत लोकां कवळूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ! २

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे,
टेंकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुन या देऊं कसें !
बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे—
उडवुनि देउनि जुलमाचे या करूं पहा तुकडे तुकडे !
'महादेव ! हरहर !' समराचा गर्जत तो वाऱ्यावरती
येउनि घुमतो अमुच्या कर्णीं—"निजती ते ठारचि मरती !"
उठा उठा ! बांधा कमरा !
मारा किंवा लढत मरा !
सत्त्वाचा 'उदयोऽस्तु' करा !
छंद फंद उच्छृंखल अमुचे स्तिमित जगाला ढवळूं द्या !
कांठोकांठ भरूं द्या पेला, फेस भराभर उसळूं द्या ! ३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ..३६०८८... वि: ...काव्य...
क्रमांक ...१६१८... नों. दि. २५।८।६४.

*ना. वा. टिळक*

## वनवासी फूल

'फार कशाला ? तुझ्याच हातीं जरि मी येउन पडतें,
कोमुन जातां तरी तूं फेकून दिधलें असतें !
म्हणशिल नाहीं, देशिल वचनें, घेशिल शंभर आणा !
अनुभव परि हा आजवरी ये बहुधा सर्व फुलांना
विचार तैसा उच्चारांचा प्रवाह कोठे वाहे ?
उच्चारांसम आचारांची श्रेणी कोठे आहे ?
मनांत भलतें, जनांत भलतें, हा तुमचा व्यवहार
कापट्याचा सागर म्हणजे हा तुमचा हा संसार !
प्रफुल्ल अथवा म्लान सारखें प्रिय मी जगदात्म्याला,
येथे राहिन कसें तरी मी सेविन नित्य तयाला,

सुख सुख म्हणती परंतु नाही सुख मनुजां ठावें;
व्यर्थ मृगजळामागे तृपितीं त्यांनी नित्य फिरावें !
काय सुखाची व्याख्या करिशी सर्व जगा सामान्य ?
क्षार जला त्यजि मानव, त्यांतच मीन म्हणे मी धन्य !
वनांत मी हें तुला वाटतें मम मोठें दुर्दैव,
परंतु हें मम सुख, सार्थकता, हेंच मदीय अहेव !
व्यर्थ कल्पना कविराया ! तूं सोडून असल्या देईं;
वनांत अथवा जनांत दैवीं असेल तें तें होईं.'

हासुन बोले कवी 'तरी चल करील दैव हवें तें
उगाच चिंता भलत्या सलत्या कां तव चित्त करीतें !
अनुभव नाही तुला कशाचा, असंबद्ध तव वाणी.
खरें सांग तुज वैराग्याची दीक्षा दिधली कोणी !
जगांत आम्ही सदा रहातों अमुचीं वचनें खोटीं !
एकाकी तूं बाळ कालचें, ज्ञप्ति तुझी परि मोठी !
शुद्ध सुखाची आशा खोटी, नच तें जनिं वा विजनीं
फोल तुझे हे बोल ! जा पहा गुरुला अपुल्या पुसुनी !
तृषेवांचुनी पाणी नाही, क्षुधेवांचुनी अन्न
उष्म्यावांचुन चंदन नाही उपभोगार्ह ! कदा न !
ध्वान्तावांचुन सूर्याचाही प्रकाश विश्वीं नाही,
दुःखावांचुन नको सुखाची, व्यर्थ कल्पना पाही !'

क्षुधा, तृषा, शीतोष्ण उपाधी जनीं रहा, वा रानीं,
चुकले नाहित कधी कुणाला, दुःख सौख्य वा मानी !
अखंड निद्रित राहुन यांना चुकवावें ही मुक्ति,
म्हणोत कोणी; फुला ! मृती ही ! नोहे मुक्ति ! भुक्ति !
तुला सांगतों ज्यास संकटें म्हणती त्या वध ऊर्मि
भवसिंधूच्या,—पोहणार मी, मजला दिसती नामी !
विजयनाम जो दुर्ग तयाचा किंवा हा सोपान
मला आवडे चढावया हा, कुणी म्हणे सोपा न
मनोवृत्तिच्या पायावरती रचिलेला हा दुर्ग
याच्या शिखरीं विराजमाना हाकेवरती स्वर्ग !
चल मजसंगे ! जाऊं तेथे ! म्हणशिल मग "हें काय ?
उलटे हितकर, सुखकर, सुंदर दिसती सर्व अपाय !"
सुख येथे नच, सुख तेथे नच, सुखदुःखाचे कर्ते
आपण ! सुमना ! परमेशाच्या पूर्ण कृपेचे भोक्ते !'

'अनुरागाचा सुंदर तरुवर दुःखकर्दमीं रुजतो;
अश्रुजलाच्या सारणिमाजी फोफावत तो जातो !

परि तो कर्दम, किंवा जल तें, आणि पुष्पफलें तीं,
तया तरूची कोठें हरिती कल्पतरूची महती !
वनभूमीवर जगे न तरु हा, जनभूमीवर जगतो;
विभूतिने निज संसाराला सार जगाचें करितो !
छायेखालीं याच्या वसतां जग हें सुखमय सारें,
दुःखाचा लव न दिसे कोठें, सारे रम्य पसारे !
या वृक्षाच्या शाखेमध्ये तुला निवेशित करितों,
चल ये पाहूं !' म्हणून अपुले हात कवी पसरी तो.

चंद्रशेखर

# गोदागौरव

ब्रह्म किमपि जें अभंग, मंगल त्याचा तेजोनिधि नमुनी,
याज्ञवल्क्य, गुरु, पिताहि जो मम, नमुनि असा शिवराममुनी,
सु-मणिकर्णिका प्रणमुनि माता गातों गोदागौरव हा;
त्या गंगेमाधिं रंगुनि कविते ! गंगा होउनि तूंहि वहा. १

अभिमतगमने !—कल्पना तूं कल्पलता, मी तुज म्हणतों,
कीं उदरंभर दूर विदेशीं बहु दिन शिणतों वणवणतों;
यास्तव मज ह्या उष्ण, धुळीच्या गुजराथेंतुनि चटूसरशी
उचलुनि देवी ! ब्रम्हगिरीवरि गोदेसन्निध ठेव कशी ! २

काय नवल तरि ! जंव हें वदतों, बघतों, डोळे उघडुनि मी,
अमृतानंदप्रवाहिनीच्या उभा असें तंव मी उगमीं !
ब्रम्हगिरी हा शिखरकरें मज बाहुलियापरि उंच धरी,
येथुनि जाते जणों दिगंतीं दृष्टि किती ही दूरवरी ! ३

उगमापासुनि मुखावधीच्या गंगौघासह गंगथडी
आवरणांतुनि चित्रपटापरि केली येथ जणों उघडी;
दूर-निदर्शक यंत्रामधुनी स्वर्गंगा ती विशद जशी,
तशीच येथुनि गोचर होते स्वकल्पनेनें ही मजशी; ४

कोठवरी हा प्रसार ! सत्ता व्यापक ही काय किति दूरवरी
थोर किती हें वैभव हीचें ! उदारता ही काय तरी !

मजला हीच्या वत्सलतेचें–भूतदयेचे–गूढ पडे,
निमिषाचाहि न हिला विसांवा, संतत परहित कार्य घडे. ५

हे गोदावरि ! विश्रुत ऐशा ब्रह्मगिरीच्या प्रिय तनये !
जगदाऽनंदन रघुनंदन ज्या तुजला वंदन करि विनयें,
कैलासाच्या वृद्ध पतीनें वरिलें, त्रिजटेवरि धरिलें,
त्या तुज घालुनि 'लोटांगण' मी होईल का गे आदरिलें ? ६

आदिकवि श्रीवाल्मीकींची शुचि रुचिरा ती सरस्वती
तवगौरव—रव करोनि धांवे भूगोलावरि किर्तीमती,
सुरस कथा तव कथुनि पुराणें गाती गोदे बहु महती,
भवभूतीची प्रतिभा दावी तुझी विभूती मूर्तिमती. ७

ऐसे कोकिळ गाती जेथें, तेथें 'कौ'—रव काय करूं ?
खुलवुं कशाला पलाश तेथें, फुलले जेथें देवतरु ?
रसाल सेविति जनांपुढें त्या करवंदें मी काय धरूं ?
क्षीरोदधिच्या कांठीं वाहुनि मीठ मिठागर काय करूं ? ८

परि केवळ हा दोष न माझा, अंगुलि फिरते तुझ्याकडे !
जननि ! मला पय पाजुनि दिधले स्खलनाचेही तूंच धडे.
तया पयानें स्फूर्ति जहाली, तेच धडे मी बडबडतों,
मी वक्ता तूं श्रोता ! न मला भान कशाचें वरकड तों. ९

अंकावरिच्या अज्ञ शिशूचे प्रेमें स्वैरालाप जसे
परिसे माता, तसें न भारत, अठरा पर्वहि पर्वतसें !
अयि गोदे ! त्वत्प्रसाद व्हाया यत्न असे मम हा सगळा.
विशंक गातों, गोड नसेना, सद्गद आहे यास गळा ! १०

प्रगटुनि येथें मूर्तिमती तूं देशिल दर्शनलाभ जना
तोंवरि माते ! करीत राहिन एक लयानें तव भजना;
भजनांतहि मज बालवयींच्या सहजचि होतिल आठवणी;
हृदय विदारुनि दावुं कुणाला सुखासुखाच्या सांठवणी ? ११

## २

मजभवतीं जो अजगर ऐसा गाढ निजेला अचल दिसे,
ह्याला 'सह्य' असें जन म्हणती; पूर्वीं हाच असह्य असे,
कारण, ह्याच्या शृंगावरुनी होती शृंग-ध्वनि सहसा,
वीरश्रीनें पुलकित होई हा पंचानन काय जसा. १२

घनघोषासम 'हरहर' ऐसा हा जेव्हां रणघोष करी,
तेव्हां अंबर चरके वरती धरा थरारुनि कंप धरी;
ज्या काळीं त्या गरनाळींतुनि बालरवीसम लाल असे
गोळे सुटती फुटती तेव्हां ज्वालामुख हा सह्य नसे. १३

येथें, तेथें, खालीं, वरती खङ्ग विजासम चकचकले,
तेव्हां ह्यावरि कटाक्ष टेवुनि थकले चौकसही चकले;
शौर्य–जयश्रीयुत ह्यावरिचा दैव–दिवाकर नहि टळला,
केतुमुखीं तो आज म्हणावा गळला किंवा मावळला ? ! १४

ज्यावरि घडघड झडति नगारे, असे शताविधि गड पडले,
पडले नसतिल, असतिल कांहीं कालकरीं तरि सांपडले;
गोजिरवाणीं ठाणीं, वाडे, विशाल किल्ले गर्वभरें
टोंचिति गगना, सर्व विखुरलीं गंधर्वांचीं जणुं नगरें. १५

गतवैभव हा हताश होउनि पसरुनि कर पद जणु निजला;
हे सह्या ! घे झोंपचि आतां येते कींव तुझी मजला.
एकी रुसली, दुही धुमसली अवयव पोटासह ढळले,
सुविवेकाचें तुझें बिघडलें, सह्या ! म्हणुनि असें घडलें ! १६

घट यंत्रासम सकलांनांही येते चढती वा पडती,
कां चढतीने भृकुटि चढावी ? पडती व्हावी अवघड ती ?
कर्म जसें फल तसें, तयाचा भोक्ता ज्याचा तोच तरी.
कर्मापासुनि फलभोग तसा पश्चात्तापहि मुक्त करी. १७

गोविंदाग्रज

# ओसाड आडांतील एक फूल

१

होता एक जुनाट आड पडका, ओसाडसा जो असे,
कोठेसा, कधिचा, विशेष नव्हता कोणास तो माहित;
होतें काय तयांत हें नच कधी कोणी पहाया बसे,
नाही जात कधी तिथे कुणि जिथे नाही स्वतःचें हित!
होता आड खरोखरीच अगदी तैसा दिसायास तो,
जो जैसा दिसतो जगास दुरुनी, तैसाच तो भासतो;
घेतो कोण उगाच कष्ट इतकें लोकीं खऱ्याखातर!
'आहे भूत तयांत खास!' वदती ऐसेंहि कोणी तर!
बोले वाइट त्यास कोणि, नसती होती वदंता जरी,
खोटी सृष्टिहि त्याप्रती जरि तशा त्या आडमार्गावर
टाकीना नुसती जरी नजरही कोणी बिचाऱ्यावर,
देवानेहि दिलें असेंच नव्हतें टाकून त्याला तरी!
देवाला करणें–विचित्रच तरी आहे किती गोष्ट ही
होतें नाचत एक फूल तसल्या ओसाड आडांतही!

२

पानांची गरदी लता करिति त्या आडाचिया भोवतीं,
वाटे अंथरलें जणू दफन तें जीवंत तोंडावरी;
काळीभोर कभिन्न गर्द विलसे छाया मधे खोल ती,
आडांतील जलांतही मिसळुनी त्यालाहि काळें करी!

आडाच्या असल्या भकास उदरीं होतें तसें फूल तें;
प्रेमाचा मृत अश्रु जेविं गिळिला जीवन्मृताच्या मनीं;
केव्हाही नच लागला सुमनसा वाराहि बाहेरुनी,
काळोखांतील तेवढेंच जग तें होतें तयाभोवतीं,
पुष्पाचें वळलें असें मुख सदा पाण्याकडे खालती,
श्वासानें जणु त्यांचिया चिमुकल्या लाटा जलीं हालती,
केव्हा तन्मकरंदबिंदु पडतां जीं वर्तुळें चालतीं,
धालाया रमणीकरांत वधतां तेव्हांच मागाल तीं!
येई एक कसाबसा तरि सदा तेथे रवीचा कर,
पुष्पाचें प्रतिबिंब तो जलिं करी त्यालागि दृग्गोचर.

३

त्या चित्राप्रति भावबद्धनयनें आशादृशा पाहणें
हा नित्यक्रम भाबड्या सरळ त्या माझ्या फुलाचा असें;
त्याला सर्वहि वाहणें, विरुनियां त्याच्यामध्ये राहणें,
आशा एकच एवढी मनिं सदा वेड्या फुलाच्या वसें.
त्याचा वास असे मनोहर सदा, शंका नसें याविशीं,
या भावें परि गंध जो दरवळे न्यारीच त्याची मजा!
केव्हाहीं हलतांच फूल पवनें खेदास देतें रजा,
प्रेमाने डुलतां परि करितसें वृत्तीस वेडीपिशी!
हासे फूल जलांतल्या बघुनिया त्या स्वीय चित्राकडे.
हासे तेंहि तसेंच तो अधिक हें हासे तसें बापडें,
नाचे हें पवनांत, तेंहि तिकडे पाण्यामध्ये बापडें,
'माझा भाव तयाप्रती कळतसें' मानीत हें बापडें.
जोडीचा महिमा असा चहुकडे, धिक् सर्व जोडीविणें!
लाभे जोड तरी कुणास न रुचे शून्यांतलेही जिणें?

४

खाली तोंड करुन चंचल जलीं पाहून वेडयापरी
भावाचे अपुल्याच रंग वठवी त्या प्रेमचित्रावरी.

घेई यापरि बांधुनी उगिच तें जीवास आशागुणीं,
हासूं मात्र नका म्हणून कधिही माझ्या फुलाला कुणी!
त्या आशेंत रहस्य काय लपलें जाणावयाला जरा—
वाऱ्यानें करपून जातिल अशीं व्हावीं फुलांचीं मनें;
चित्रें चंचल जीं अदृश्य उघड्या डोळ्यांस भावाविणें
पाहायास तयांस नीट तुमचे डोळे फुलांचे करा!
भावाचे अपुल्याच रंग बघणें वाटेल तेथें मना,
त्या वेड्याबगड्या फुलांतच असे का तेवढ्या दोष हा?
मोठे पंडित काय लाविति दिवे, ते एकदांचे पहा,
कोणी काय कधीं कुठें बघितलें जें ये विकारांत ना?
जो तो या जगतावरी पसरतो छाया मनाची सदा
निश्वासें तुमच्याच सृष्टि करपे, तेव्हांच ती तापदा!

५

कांहीं काळ असाच फूल गमवी; आशा पुढें वाढली,
चुंबावें जलिंच्या फुलास म्हणुनी तें मान खालीं करी;
वाऱ्यानें मुख लागतांच उदका छाया विराली जलीं,
पाणी मात्र पडे मुखीं सहज तों तैसेंच आशेवरी!
त्या धक्क्यासरसेंच फूल मग जें कोमेजलें एकदां
नाहीं तें हसलें पुन्हां विकसलें नाहीं पुन्हां ते कदा!
आशेनें दुसऱ्या दिनीं फिरूनि तो आला रवीचा कर,
गेला खिन्न मनें, परी न चमके त्या प्रेतमात्रावर,
पाण्यामाजि पुढें गळून पडलें तें फूल वेडेंपिसें,
पाताळांत कुठें असेल दडलें वा प्रेमनिर्माल्य तें?
छेः छेः! प्रेममय स्वरूप धरुनी भूतापरी हिंडतें,
कोठें आड उजाड जे, अजुनही तेथें कधीं तें दिसे!
तें मेलें म्हणुनी उणें न ठरतें; मच्चित्त त्याला भुले!
मेलेल्या हृदया मदीय असलीं वाहीन मेलीं फुलें!

बालकवी

# फुलराणी

हिरवे हिरवे गार गालिचे—हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती—फुलराणी ही खेळत होती.
गोड निळया वातावरणांत—अव्याज मनें होती डोलत.
प्रणय चंचला त्या भ्रूलीला—अवगत नव्हत्या कुमारिकेला!
आईच्या मांडीवर बसुनी—झोंके घ्यावे, गावीं गाणीं;
याहुनि ठावें काय तियेला—साध्या भोळया फुलराणीला? १

पुरा विनोदी संध्यावात—डोलडोलवी हिरवें शेत.
तोंच एकदां हांसत आला—चुंबून म्हणे फुलराणीलाः–
"छानी माझी सोनुकुली ती—कुणाकडे ग पाहत होती?
कोण बरें त्या संध्येंतून—हळुंच पाहतें डोकावून?
तो रविकर का गोजिरवाणा—आवडला अमुच्या राणींना?"
लाजलाजली या वचनांनीं—साधी भोळी ती फुलराणी. २

आंदोळीं संध्येच्या बसुनी—झोंके झोंके घेते रजनी;
त्या रजनीचे नेत्र विलोल—नभीं चमकती ते ग्रहगोल!
जादूटोणा त्यांनीं केला—चैन पडेना फुलराणीला;
निजलीं शेतें निजलें रान—निजले प्राणी थोर लहान.
अजून जागी फुलराणी ही—आज कशी ताळ्यावर नाहीं?
लागेना डोळ्याशीं डोळा—काय जाहलें फुलराणीला! ३

या कुंजांतुन त्या कुंजांतुन—ज्वल्याशा या दिवट्या लावुन,
मध्यरात्रिच्या निवांत समयीं—खेळखेळते वनदेवी हीं,
त्या देवीला ओव्या सुंदर—निर्झर गातो; त्या तालावर.
झुलुनि राहिलें सगळें रान—स्वप्नसंगमीं दंग होऊन!
प्रणयाचिंतनीं विलीनवृत्ति—कुमारिकाही डोलत होती.
डुलतां डुलतां गुंग होउनी—स्वप्नें पाही मग फुलराणी:— ४

"कुणी कुणाला आकाशांत—प्रणयगायनें होतें गात
हळुंच मागुनी आलें कोण—कुणी कुणा दे चुंबनदान!"
प्रणय-खेळ हे पाहुनि चित्तीं—विरहार्ता फुलराणी होती!
तों व्योमींच्या प्रेमदेवता—वाऱ्यावरती फिरतां फिरतां—
हळूंच आल्या उतरून खालीं—फुलराणीसह करण्या केली,
परस्परांना खुणवुनि नयनीं—त्या वदल्या अमुची राणी! ५

स्वर्भूमीचा जुळवित हात—नाच नाचतो प्रभातवात;
खेळुनि दमल्या ह्या ग्रहमाला—हळुहळु लागति लपावयाला
आकाशींची गभीर शांती—मंद मंद ये अवनीवरती
विरूं लागलें संशयजाल—संपत ये विरहांचा काल
शुभ्र धुक्याचें वस्त्र लेवुनी—हर्षनिर्भरा नटली अवनी
स्वप्न संगमीं रंगत होती—तरीहि अजुनी फुलराणी ती! ६

तेजोमय नव मंडप केला—लख्ख पांढरा दहा दिशांला
जिकडे तिकडे उधळित मोतीं—दिव्य वऱ्हाडी गगनीं येती.
लाल सुवर्णी झगे घालुनी—हांसत हांसत आले कोणी;
कुणी बांधिला गुलाबि फेटा—झकमकणारा सुंदर मोठा!
आकाशीं चंडोल चालला—हा वाङ्‌निश्चय करावयाला!
हें थाटाचें लग्न कुणाचें—साध्या भोळ्या फुलराणीचें! ७

गाऊं लागले मंगलपाठ—सृष्टीचे गाणारे भाट,
वाजवि सनई मारुतराणा—कोकिळ घे तानांवर ताना!
नाचुं लागले भारद्वाज—वाजविती निर्झर पखवाज,

नवरदेव सोनेरी रविकर—नवरी ही फुलराणी सुंदर !
लग्न लागतें ! सावध सारे !—सावध पक्षी ! सावध वारे !
दंवमय हा अंतःपट फिटला—भेटे रविकर फुलराणीला ! ८

वधूवरांना दिव्य रवांनीं—कुणीं गाइलीं मंगल गाणीं;
त्यांत कुणीसें गुंफित होतें—परस्परांचें, प्रेम ! अहा तें !
आणिक तेथिल वनदेवीही—दिव्य आपुल्या उच्छ्वासांहीं
लिहीत होत्या वातावरणीं—फुलराणीची गोड कहाणी !
गुंगत गुंगत कवि त्या ठायीं—स्फूर्तीसह विहराया जाई
त्यानें तर अभिषेकच केला—नवगीतांनीं फुलराणीला। ९

‘बी’

# चाफा

चांफा बोलेना, चांफा चालेना
चांफा खंत करी कांहीं केल्या फुलेना. ॥ ध्रु० ॥

गेलें ‘आंब्याच्या’ बनीं
म्हटलीं मैनांसवें गाणीं
आम्हीं गळ्यांत गळे मिळवून.

गेलें केतकीच्या बनीं
गंध दर्वळला वनीं
नानासवें गळालें देहभान.

आलें माळ सारा हिंडुन
हुंबर पशूंसवें घालून
कोलाहलानें गलबलें रान.

कडा धिप्पाड वेढी
घाली उड्यांवर उडी
नदी गर्जुन करी विहरण.

मेघ धरूं धावे
वीज चटकन लवे
गडगडाट करी दारुण.

लागुन कलिकेच्या अंगा
वायु घाली धांगडधिंगा
विसरली जगाचें जगपण

सृष्टि सांगे खुणा
आम्हां मुखस्तंभ राणा
मुळीं आवडेना! रे आवडेना!!

चल ये रे ये रे गड्या!
नाचुं उडुं घालुं फुगड्या
खेळुं झिम्मा झिम्-पोरी झिम्-पोरी झिम्!

हें विश्वाचें आंगण
आम्हां दिलें आहे आंदण
उणें करूं आपण दोघेजण.

जन विषयाचे किडे
यांची धाव बाह्याकडे
आपण करूं शुद्ध रसपान.

'दिठीं दीठ जातां मिळुन
गात्रें गेलीं पांगळुन
अंगीं रोमांच आले थरथरून

चांफा फुलीं आला फुलुन
तेजीं दिशा गेल्या आटुन
कोण मी—चांफा? कोठें दोघे जण?

भा. रा. तांबे

# राजकन्या आणि तिची दासी

"प्रेम तयावर होतं तर मग तुमचं ना भारी?"
"छे छे! कसलं? लेक नृपाची मी, तो व्यापारी!"
"कुंवरजीस दावितां जवाहिर तो, तुम्हि त्यावरती
दृष्टि रोखिली स्नेहें वरचेवर हळु कां तर ती?"
"छे छे! भलतं! खुळे, तयावर का रत्नावर ग?"
"खुळीच मी, मज कशीं कळावीं मनांतील बिंगं?
बोलुं लागतां कान दिला जरि चपापलां स्वांतीं,
डोळयावरुनी गालीं कितिदा क्षणिं झळके कांती!"
"कळेच ना मज, तुझ्याच मनिंचे हे सारे चाळे!"
"खुळीस का मज, शक्य नृपाच्या लेकिस जें जाळें?
तुम्हांस दावावया जवाहिर येतां, कां त्याला
जा जा! वदलां मुखें, न नयनें? लालि खुले गालां?
कां ओशाळया झालां? लज्जित जणुं कवणा झालां?
का पाण्याला रत्नाच्या का डोळयांच्या बोला."
"कधि ग लाजलें? कधी पाहिलं मीं तेव्हा खाली?
नको जवाहिर म्हणुनि म्हणालें. जा! कसली लाली?"
"काय अतांशा झालं तर मग तुमच्या जीवाला?
कोमेजूं कां गाल लागले?—तो येथुनि गेला!
उगिच बसोनि कां वाऱ्याला कान कधी देतां?

उगिच कुणाचा भास होउनी किति फुगतां फुलतां ?
हात ठेवुनी दारावर किति वेळ उभ्या असतां ?
जणुं उघडिल कुणि दार ! गवाक्षीं कां डुंकित बसतां ?"
"कधि ग दिला कुणिं कान ? कुणाला कधि ग भास झाला ?"
"कळेल कैसं देउनि चुकतां हृदयचि दुसऱ्याला ?"
"घे घे सटवे, आळ घेशि तर भलता मजवरती !
जा म्हण, बसलं मन त्यांवर, चल, निघ येथुनि परती !"
"कंवराणीजी, कां रागवतां ? ही लोचट दासी—
क्षीण अवयवीं किति तरि खुलते छबि ही आताशी !
संचरलं तें वारं, स्मर कीं काय म्हणति ज्याला,
बहार उसळे किती चहुकडे शरीरवेलीला !
खैरपूरच्या गुणवयरूपें योग्य कुमाराला
राणाजी ते देतां म्हणतां 'ना' कां मग त्याला ?"
"खैरपूर किति धनाढ्य ! त्यांना योग्य अम्ही का ग ?"
"कंवराणीजी, किती लपवितां मन ? किती हीं सोंगं ?
किति भोळ्या तुम्हि ! खैरपुरेशचि ते, न व्यापारी,
वेष पालटुनि आले इकडिल बघण्या ही स्वारी."
"काय पुन्हा ते खैर–तेच–व्या–का–कुवरजी ते ?"
"मी खोटी, मी सटवी, लुच्ची ? उर कां धडधडतें ?"

*वि. दा. सावरकर*

## स्वतंत्रतेचे स्तोत्र

जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे ॥ ध्रु० ॥

राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवति ! श्रीमती राज्ञी तूं त्यांची

परवशतेच्या नभांत तूंची आकाशीं होशी
स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखशी

गालावरच्या कुसुमीं किंवा कुसुमांच्या गालीं
स्वतंत्रते भगवती ! तूंच जी विलसतसे लाली

तूं सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण नष्ट तेंची

मोक्ष मुक्ति हीं तुझींच रूपें तुलाच वेदांती
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती

जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होतें

हे अधम-रक्त-रंजिते। सुजन-पूजिते। श्रीस्वतंत्रते
तुजसाठिं मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण

भरतभूमिला दृढालिंगना कधिं देशिल वरदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे १

हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथें करण्याचा कां तुला वीट आला ?

होय आरसा अप्सरसांना सरसें करण्याला
सुधाधवल जान्हवीस्रोत तो कां गे त्वां त्यजिला ?

स्वतंत्रते ! या सुवर्णभूमिंत कमती काय तुला ?
कोहिनूरचें पुष्प रोज घे ताजें वेणीला

ही सकल–श्री–संयुता । आमुची माता । भारती असतां
कां तुवा ढकलुनी दिधली ?
पूर्वीची ममता सरली
परक्यांची दासी झाली

जीव तळमळे, कां तूं त्यजिलें उत्तर याचें दे ?
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे २

*माधव जूलियन*

# दग्धपक्ष पतंग.

अजूनही आशा वेडया, ठेविशी का पोटीं? ॥ध्रु०॥

भव्य गौरीची आरास,
चलज्ज्योतींचा विलास,
स्मितें अहा दिव्य भास!
चटकाच लावी जीवा मोहिनी ही मोठी. १

वासन्तिक नृत्याङ्गण
हिरण्मयींसाठी जाण,
निर्धनांना कैंचा सण?
कुठे पोत, हिऱ्यांची त्या कुठे उच्च कोटी? २

भाळून रे आगन्तुका,
आंत झुकलास फुका
जीव मीलनाचा भुका
दृष्टिसुखें धाईना, घे उडी उंच खोटी! ३

व्हावें ज्योतीशीं तन्मय
स्वर्गसुख तें अक्षय!
परी दैवीं हा निरय!
मूल्यहीन निर्धनाची या जगीं सचोटी! ४

पङ्ख मात्र दग्ध झाले,
हाय मरण न आलें
जीवीं तळमळ चाले,
जीवन्मृति हीच काय भक्तीची कसोटी ? ५

दीपोत्सव चोहीकडे,
कोण किडयासाठी रडे,
कां न शिरीं पाय पडे ?
कां न केरसुणी झणी दूर तरी लोटी ? ६

यशवंत

## सावध ! सावध ! !

मला बुडविलें ह्या कृपावन्तांनीं
आपुल्या औदार्यानें
काय मीं ह्यांचें मारिलें होतें न कळे घोडें
म्हणुन मला केला पांगळा !
श्रावणांमधील जलदांसारखी
ही ह्यांची खैरात
करी माझा घात.
झगडाया मज नुरली वासना
वासनेमागून जातसे त्राण.
होतो मी नादांत
माझिया कैफांत
कांहीं बरळत
उतरूं नये ती माझी धुंदी
म्हणून पुरवी हा मज चंदी
चंदीचा तो माज नव्हे परि कैफ.
कैफ तोच खरा रणझुंजाराचा
कैफ तोच खरा क्षुब्ध सागराच.
कैफ तोच खरा मत्त मयूराचा.
विश्व विसरल्या सन्त–नर्तकाचा.

एकदां नाचलों बेभानपणें
गवती तुरे, रानटी फुलें
लेवून नाचऱ्या झऱ्याच्या कांठीं.
तदा उदारधि रसिकवरानें
उद्यानामधील आपुल्या महालीं
आदरानें माझी स्थापना केली

आणि पाचु—हिरे—
मोतियांचे तुरे
खोवियेले भावें माझिया मन्दिलीं
अरेरे! बसलों तेव्हांपासून
नर्तनकलेस माझिया मुकून!

काय शार्दूलांचें पाहतां क्रीडित
लोखंडी गजांच्या उंच सांपळ्यांत?
भकाळ पोटाची रिकामी पोतडी
लोंबतां, पडते नेभळीच उडी!

चला डोंगराच्या गव्हरांत गर्द
तिथें शिलाखंडीं सुस्तावला जर्द
पञ्चानन जर आढळला कोणी
पाहा क्रीडेसाठीं तया डिवचोनी!

मर्दानी क्रीडांचा राया, तूं शौकीन!
झुंजार पाळिसी रतीब लावून
झुंज ते करती नकली दिखाऊ;
झुंज करतील काय ऐतखाऊ?

घेई रोमरोमीं अहंकार पेट
घेतात संग्रामीं ऐसे जेव्हां भेट
खुराक, वजन किंवा कृतज्ञता—

शुद्ध हिशेबाची असते कुणास ?
जीवितसर्वस्व लाविती पणास !
फिटतें तेधवां डोळ्यांचें पारणें;
पाहून होतात शौर्याचीं स्फुरणें

अगा कृपावन्ता, उदार रसिका,
भुलीनें करसी केव्हढ्या ह्या चुका !
शौर्य–भक्ति–नृत्य–स्फूर्ति
नव्हेत बाहुलीं हीं कळसूत्री
भावना मानिसी खेळणं सुन्दर ?
पूर्वनिश्चित कीं घड्याळ–गजर ?

अगा भागवता, सावध, सावध !
मठ आणि गादी
ना स्वीकारीं कधीं
वसाहती वेगें करिती गादींत
रुधिर–पिपासु ढेकूण पिसवा.
जमतो मठाच्या तेंवि ओवरींत
भोंदु नि आळशी बैराग्यांचा थवा.
देखत–देखतां मठ आणि पंथ
होतात—हा हन्त !—
मोक्ष–दलालांची उतार–पेठ !
अगा भागवता, सावध ! सावध !
स्वीकारूं नकोस ऐसा आत्मवध !

केशवकुमार

# चाफा

[सुप्रसिद्ध बी कवींच्या 'चांफा' या हृदयंगम कवितेच्या चालीची व पालुपदाची थोड्याशा बदलाने सदर कवितेंत उसनवारी केली असली तरी या पलीकडे त्या थोर कवितेची कोठल्याही तऱ्हेनें बदनामी करण्याचा प्रस्तुत कवितेंत प्रयत्न केलेला नाहीं हें आधींच सांगून ठेवलेलें बरें, नाहीं तर मागाहून कोणी म्हणेल—!]

चांफा बोलेना । चांफा चालेना
चांफा खंत करी । कोणी त्यासी पुसेना ।

गेला फुलांच्या ग बनीं । सारा शिणगार लेवुनी,
बसला डोकें उंचावुनी । कोणी त्यासी बघेना !

सुकुनी झालीं चोळामोळा । फुलें तीं करी बाजुचीं गोळा,
चुकवुनी इतरांचा मग डोळा । डकवी आपुल्या पानां !

बोले, 'पुष्पांचा मी राजा । आला बहार मजसी ताजा !
केला ऐसा गाजावाजा । परी कोणी बघेना !

म्हणे, 'मी वृक्ष थोर प्रेमळ । नम्रता रसाळ निर्मळ',
बोलला वाडेकोडें बोल । खरें कुणा वाटेना !

भुंगे पळती आल्या पायीं । पांखरें उडती घाई घाई,
केली खूप जरी चतुराई । कुणी तया भुलेना ?

भंवती गुलाब, बटमोगरा। सुगंधी किती फुलांच्या तऱ्हा
विचारी कोण तिथें धत्तुरा। जरिही केला वहाणा!

फांशी अंगीं चंदन–उटी। लावी हळदलेप ललाटीं!
आणि कांति पीत गोमटी। परी कोणी फसेना!

चोळिलें अत्तर अंगीं जरी। प्राशिली दोन शेर कस्तुरी।
गंध कां जातिवंत ये तरी? । असे मुळामध्येंं उणा!

लागे जरा उन्हाची झळ। झाला तोंच नूर पातळ,
सरलें सगळें उसनें बळ। पडे खालीं उताणा!!

खदखदां हंसूं लागलीं झाडें। फुलांचीं मिष्किल झालीं तोंडें!
डोळे झांकुनि चांफा रडे। हाय–तें सांगूं कुणां?

*[चाल नाहीं तरी सूर बदलून]*

चांफा बोलेना। चांफा चालेना
चांफा खंत करी। कोणी त्यासी पुसेना!

कुसुमाग्रज

# कोलंबसाचे गर्वगीत

हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीने त्या
समुद्रा, डळमळुं दे तारे!
विराट वादळ हेलकावुं दे पर्वत पाण्याचे
ढळूं दे दिशाकोन सारे!

ताम्रसुरा प्राशून मातुं दे दैत्य नभांतले
दडूं द्या पाताळीं सविता
आणि तयांची ही अधिराणी दुभंग धरणीला
कराया पाजळुं दे पलिता!

कीं स्वर्गातुन कोसळलेला—सूड–समाधन
मिळाया प्रमत्त सैतान
जमवुनि मेळा वेताळांचा या दर्यावरती
करी हें तांडव थैमान!

पदच्युता, तव भीषण नर्तन असेंच चालूं दे
फुटूं दे नभ माथ्यावरती
आणि तुटूं दे अखंड उल्का वर्षावत अग्नी.
नाविका ना भय वा भीती!

सहकाऱ्यांनो, कां ही खंती ? जन्म खलाशांचा
झुंजण्या अखंड संग्राम
नक्षत्रापरि असीम नीलामधे संचरावें
दिशांचें आम्हांला धाम !

काय सागरीं तारुं लोटलें परताया मागे ?
असे का हा अपुला बाणा ?
त्याहुन घेऊं जळीं समाधी सुखें, कशासाठी
जपावें पराभूत प्राणा !

कोट्यवधी जगतांत जिवाणूं जगती अन् मरती
अशीं तीं गवताचीं पातीं,
नाविक आम्ही परंतु फिरतों सात नभाखालीं
निर्मितों नव क्षितिजें पुढती !

मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन दारा
घराची वा वितभर कारा !
मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनी खंड खंड सारा !

चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरती
कथा या खुळ्या सागराला
"अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला !"

*अनिल*

## धडकी

दूर नाही पावसाळा आता
उत्कंठित मन झालें माझें
कसलीसी हुरहुरहि
लागून राहे
नाही 'अन्यथावृत्ति' ती
मेघालोकाची.
सुचवीत 'सावन के दिन आये'
धडधडत नाही हृदय माझें आज
साज कल्पून वर्षेच्या अभिसाराचा
चुकणार तर नाही ना येण्यास
ही चंचल वर्षा ?
शंका येऊन धडकी भरे !

आलीच नाही जर वर्षा ती
उधळीत हर्षाला
असेंच राहिलें हें निळें आकाश
खेळवीत सावकाश
जर पांढऱ्या ढगांना
तसाच राहिला वाहत जोराचा

गार गार वारा
पळवीत पार पार
आल्या आभाळास
रोहिणीवर आरोहण नच झालें
जलदांचें
मृग झाला वंचित जर
मृगजळाने
आर्द्रा करीत गेली
सार्द्र मात्र नयनांस
पुनर्वसु न वरसून
पुष्य हुश्श करून सुस्कारला
आश्लेषा कंठाश्लेषाचीं
निसटली देत आश्वासनेंच
मघा पुढे बघा म्हणाली
आणि पूर्वा दुर्वांहि
झाली वाळविती
उत्तरा निरुत्तर बसून
हस्त भलतीकडेच
मस्त होऊन उधळला
चित्रेने धरिलें वर
भयानक विचित्र रूप
स्वातीने वाती दिल्या हातीं
सत्ताविसांतून जाऊन नऊ
शून्यच राहिलें बाकी
तर—?
चिंता जडून
धडकी भरे !

हें व्ययनाम संवत्सर

हेमलंबी—विलंबी नाम
संवत्सरसंवर्तांचें
सार्थ नाम झालें अन्
ठरलें जर फसलें वर्षच
फसलीचें
फलज्योतिष्यें निष्फळ झालीं
राजा बुध, मंत्री शनी
अग्रधान्येश मंगळ
मेघेश शुक्र, रसेश गुरु
पश्चाद्धान्येश रवि
गडगडलें जर
संवत्सराधिपांचें
मंत्रिमंडळ हें
दुहीनें आपसांतल्या
किंवा सम्राट् निसर्गानें
निर्णय लावले फेटाळून त्यांचे
मेघानें द्रोण नांवाच्या
निवास करून वणिग्गृहांत
होऊन पंचमस्तंभी
नरेंद्र नाम नागास जर
करूं दिला विघ्नसंतोष
तर—?
हतबुद्ध होऊन
बावरून
धडकी भरे!

"काले वर्षतु पर्जन्यः
पृथिवी सस्यशालिनी
लोकोयं क्षोभरहितः

शांतिः शांतिः शांतिः
शांतिरस्तु पुष्टिरस्तु
तुष्टिरस्तु......"
प्रार्थना जर झाली ही
व्यर्थ निरर्थ आमची
तर—?
केविलवाणी कीव करून
कळवळून
धडकी भरे!

तर—?
तर काय
घोर अवर्षण
दुष्काळ विक्राळ!
कणन् कण धान्याचा
मिळवून, मोजून, खाऊन
राहून अर्ध–नाही–चतकोर पोटीं
आशा धरून एकेक क्षण
कंठणारे जीवन वाट पाहत
अग्रधान्याची
पुढील पिकाची
मरणार बिचारे भुकेने
तडफडून
लाखो लोक
आमचे
पाहणार आम्ही मरणारे ते
पाहावतहि नाही म्हणत
कण्हत, तणतणत
हळहळत

पण जेवत दोन्ही वेळ
बेशरमपणें जिवंत राहत
घृणा येऊन माझी मलाच
भीती वाटून
धडकी भरे!

करणार काय आम्ही
करून करून?
भीक मागून परदेशीं
धान्य आणून
इकडचें पाठवून तिकडे
काढून दडवलेलें
मतलब्यांना दंडून
असे तसे वांटून देत
प्राण वांचवूं कांहीं!
राहूं पण तसेच अवलंबून
देवावर, दैवावर
लहरीवर निसर्गाच्या
जुन्या जीवघेऊ,
राज्य नीतीवर
उधळपट्टी करीन
अफाट मानवशक्तींची
स्वार्थांत, भांडणांत
लढण्यांत, मारण्यांत, मोडण्यांत
छिनून घेण्यांत
धनधान्यांना
साठविण्यांत, सडविण्यांत
जाळण्यांत
पुन्हा आणीत दुष्काळ असा!

चीड येऊनी
भणभणून
धडकी भरे !

ही हलाखी
हालअपेष्टा ह्या
हे निष्फळ कष्ट
हीं दुःखें, हे रोग, साथी
ह्या लढाया
दुष्काळ हे, हीं मरणें
ही बरबादी
घालविणें आहे आमच्याच हातीं
मानवांत ती शक्ति
देवाचा, दैवाचा, निसर्गाचा
उपसर्ग ना पोचे जिथे
अशी
जगव्यवस्था
मानवा निर्मावया बुद्धि असे—
सामर्थ्य त्याचें जाणवून
नेणीव पाहून तळमळून
तडफडून
धडकी भरे !

खास उद्या उठतील
हे भुके कंगाल
आणि लोक सारे
जगनिष्ठावंत
विचारवंत नवे कलावंत

सोडून भ्रांति
करीत क्रांति
भविष्य दिसून
रोमांच स्फुरून
येत थरथरून
धडकी सरे !

वा. रा. कांत

## अग्निपंख नभिं फडफडुं दे

तव अग्निपंख नभिं फडफडुं दे
निजलेल्या चटका लव बसुं दे

तुफानवाता बेडी पडली
वीज ढगांतुनि स्वस्थ झोपली
गगन-घरेला जडता खिळली
त्या प्रलयघनांना कडकडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

आंत शांत जरि दिसतें जगतीं
युद्ध–वैर–लाव्हारस कढती
धाराकंपनिं आग फुटुनि ती
चल जुनाट जग हें तडतडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

माणुसकीहुनि आत्मे ढळले
देव देवळांतून भटकले
न्यायावर उकिरडे माजले
हे जाळ, अग्निगिरी धडधडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

क्रांतिदेवि, ये, विद्युच्चरणीं
तव नयनींची ठिणगी उडवुनि
असंतोष पेटवी जनमनीं
सग जुलुम कितिहि वर गडगडुं दे
तव अग्निपंख नभिं फडफडुं दे

बा. भ. बोरकर

# चित्रवीणा

निळ्या जळावर कमान काळी
        कुठें दुधावर आलीं शेतें
थंडाव्याचीं कारंजींशीं
        कुठें गर्द बांबूचीं बेटें

जिकडे तिकडे गवत बागडे
        कुठें भिंतीच्या चढे कडेवर
ती म्हातारी थरथर कांपे
        सुखासवें होउनी अनावर

तारांमधला पतंग कोठें
        भुलून गेला गगनमंडला
फणा डोलवित झोंवूं पाहे
        अस्तरवीच्या कवचकुंडला

उंचवटयावर म्हशी गोठल्या
        तसेंच कोठें कातळ काळें
वर्ख तृप्तिचा पानोपानीं
        बघून झालें ओलें ओलें

कोठें तुटल्या लाल कड्यावर
चपळ धीट बकरीचीं पोरें
एक त्यांतलें लुचे आइला
सटीन-कांती गोरें गोरें

फुलपांखरीं फूलथव्यावर
कुठें सांडलीं कुंकुम-टिंबें
आरसपानी पाण्यावरतीं
तरत्या बगळ्यांचीं प्रतिबिंबें

कुठें आवळीवरी कावळा
मावळतीचा शकून सांगे
पूर्वेला राउळ इंद्राचें
कोरिव संगमरवरीं रंगे

घाटामध्यें शिरली गाडी
अन् रात्रीचा पडला पडदा
पण चित्रांची विचित्र वीणा
अजून करिते दिडदा दिडदा

*बी. रघुनाथ*

# तें न तिनें कधिं ओळखलें

तें न तिनें कधिं ओळखिलें.

दिलें उशाला काळिज ठेउन
स्पंदनांत पण तें दुखलें.

हिरमुसलेली विहिरीकांठीं
विहिरिंत पडल्या पोहऱ्यासाठीं
भेट प्रथम ही; घटांतून मग
तिनें हिसळवित चालविलें.

पथांत शोधित तिचीं पाउलें
फिरत राहिलों देवदेवळें
माग घेत कधिं कधिं मार्गावर
पथदीपापरि मन जळलें.

आम्ल फळांस्तव आसुसलेली
तिची अडाणी वृत्ति न रुचली,
मधुर फळांचे भावधर्मरस
तिज दाखविले, चाखविले.

कधिं यात्रेच्या गर्दीमधुनि
तिची टाकिली वाट चुकवुनी,
बावरल्या हरणीस मनोगत
स्पर्शजलांतुनि कळवियलें !

सामसुमल्या अपरात्रींतुन
टिचकविलें हळु दार बाहिरुन;
होते जेव्हां परस्परांच्या
पिसांत पंछी शहारले.

आवड पाहुनि तिची फुलांची
फुलांत यौवन सजवायाची;
आज तिच्या वाटेवर अंतर
कांट्यावरती अंथरलें.

बा. सी. मर्ढेकर

## दवांत आलीस भल्या पहाटीं

दवांत आलिस भल्या पहाटीं
शुक्राच्या तोऱ्यांत एकदां;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
तरल पावलांमधली शोभा.

अडलिस आणिक पुढें जराशी
पुढें जराशी हसलिस;
—मागें
वळुनि पाहणें विसरलीस का?
विसरलीस का हिरवे धागे?

लक्ष्य कुठें अन् कुठें पिपासा,
सुंदरतेचा कसा इशारा;
डोळ्यांमधल्या डाळिंबांचा
सांग धरावा कैसा पारा!

अनोळख्यानें ओळख कैशी
गतजन्मींची द्यावी सांग;
कोमल ओल्या आठवणींची
एथल्याच जर बुजली रांग!

तळहाताच्या नाजुक रेषा
कुणि वाचाव्या, कुणी पुसाव्या;
        तांबुस निर्मल नखांवरी अन्
        शुभ्र चांदण्या कुणि गोंदाव्या !

द्रवांत आलिस भल्या पहाटीं
अभ्रांच्या शोभेंत एकदां;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या
मंद पावलांमधल्या गंधा.

इंदिरा संत

# उभी तुळस वेल्हाळ

कसें केव्हा कलंडतें
        माझ्या मनाचें आभाळ -
आणि चंद्र चांदण्यांचा
        दूर पोचतो ओघळ...

उरे तुडुंब तयांत
        काळोखाचें मृगजळ
रितेपणाच्या डोहाची
        आंत ओढी उचंबळ.

मंत्रविद्ध मध्यरात्र
        उभी झुकून काठाशीं
जन्मोजन्मीच्या दुःखाचा
        राळ धरून उराशीं.

ओढ घेऊन पाण्याची
        सूर मारते सरळ
एक गाठायाचा तळ
        आणि तळींचा अनळ

पेट घेई मध्यरात्र
        पेटे काळोखाचें जळ
दिवसाच्या राखेमध्ये
        उभी तुळस वेल्हाळ.

विंदा करंदीकर

# माझ्या मना बन दगड

हा रस्ता अटळ आहे.
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय,
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय,
कुडकुडणारे हे जीव
पाहूं नको ! डोळे शीव !
नको पाहूं जिणें भकास;
ऐन रात्रीं होतील भास;
छातीमध्ये अडेल श्वास.
विसर यांना ! दाब कढ.
माझ्या मना बन दगड !

हा रस्ता अटळ आहे.
ऐकूं नको हा आक्रोश;
तुझ्या गळ्याला पडेल शोष;
कानावरतीं हात धर;
त्यांतूनही येतील स्वर !
म्हणून म्हणतों ओत शिसें;
संभाळ, संभाळ, लागेल पिसें.
रडणाऱ्या ! रडशील किती ?

झुरणाऱ्या ! झुरशील किती ?
पिचणाऱ्या ! पिचशील किती ?
ऐकूं नको असला टाहो;
माझ्या मना दगड हो !

हा रस्ता अटळ आहे.
येथेंच असतात निशाचर
जागोजाग रस्त्यावर;
असतात नाचत काळोखांत,
हसतात विचकून काळे दांत;
आणि म्हणतात, "कर हिंमत;
आत्मा वीक; उचल किंमत !
माणूस मिथ्या; सोनें सत्य;
स्मरा त्याला, स्मरा नित्य !"
भिशील ऐकून असले वेद.
बन दगड; नको खेद.

बन दगड आजपासून;
काय अडेल तुझ्यावांचून ?
गालावरचें खारें पाणी
पिऊन काय जगेल कोणी ?
काय तुझे हे निश्वास
मरणाऱ्यांना देतील श्वास ?
आणिक दुःख छातीफोडें
देईल त्यांना सुख थोडें
आहे दुःख तेंच फार.
माझ्या मना कर विचार;
कर विचार; हस रगड;
माझ्या मना बन दगड !

हा रस्ता अटळ आहे;
अटळ आहे घाण सारी;
अटळ आहे ही शिसारी.
एक वेळ अशी येईल
घाणीचेंच खत होईल!
अन्यायाचीं सारीं शितें
उठतील पुन्हां होतील भुतें!
या सोन्याचे बनतील सूळ!
सुळीं जाईल सारें कूळ.
ऐक टापा! ऐक आवाज;
लाल धूळ दिसते आज;
याच्या मागून येईल स्वार;
या दगडावर लावील धार.
—इतकें यश तुला रगड;
माझ्या मना बन दगड!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३५५८५ वि: काव्य
क्रमांक १६९७ नों. दि. २५।८।६४

# कविदर्शन

## ज्ञानेश्वर

'अमृतातें पैंजेसिही जिंकणाऱ्या' भाषेत ज्ञानेश्वरीची रचना करून 'देशीकार लेणे' घडविणाऱ्या ज्ञानेश्वरांचे नाव माहीत नसणारा मराठी माणूस विरळाच! आपेगाव येथील विठ्ठलपंताच्या निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई या मुलांची संन्याशाची पोरे म्हणून तत्कालीन ब्राह्मण समाजाने हेटाळणी केली. परंतु ज्ञानेश्वरांनी आपल्या अलौकिक सामर्थ्याच्या बळावर ब्राह्मणांना विस्मित केले; त्यांच्याकडून मान्यता मिळविली. ज्ञानेश्वरांनी आपले वडील बंधू निवृत्तिनाथ यांच्याकडून उपदेश घेतला. निवृत्तिनाथ हे नाथपरंपरेतील गहिनीनाथाचे शिष्य गुरूच्या कृपाप्रसादाने नेवासे येथे शके १२१२ मध्ये मराठी भाषेतील अमोलिक लेणे ज्ञानेश्वरांनी घडविले. गीताग्रंथाची थोरवी काय वर्णावी ! गीता हा भारतीय संस्कृतीचा प्राण आहे. अनेक संस्कृत-मराठी भाष्यकारांनी गीतेवर भाष्ये रचली आहेत. मात्र ज्ञानेश्वरीचे स्वरूप या सर्व भाष्यांपेक्षा अगदी वेगळे आहे. गीतेतून ध्वनित होणारा भावार्थ त्यांनी सरस रीतीने प्रतिपादिला आहे. ज्ञानेश्वरांच्या काळी संस्कृत भाषेस व ब्राह्मणधर्मास फार मोठे महत्त्व होते. समाजात कर्मकांड बोकाळले होते. धर्माच्या नावाखाली अधर्माचे राज्य पसरत होते. ज्ञानेशांनी गीतेच्या आधारे फार मोठी सामाजिक कामगिरी बजावली आहे. भल्याभल्यांच्या मतांतील फोलकटपणा चव्हाट्यावर आणला व सर्वसामान्य जनतेला निष्काम कर्मयोगाची

शिकवण दिली. संस्कृत भाषेचा अधिक्षेप न करता 'माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके, अमृतातेंही पैजा जिंके' असे अभिमानाचे उद्गार काढले. म्हणून कविवर्य 'बी'नी 'त्या बड्या वेडवाल्यांत ज्ञानेश्वर मानें पहिला' असे म्हटले आहे. गीतेवरील भावार्थदीपिकेशिवाय ज्ञानेश्वरांनी 'अनुभवामृत' 'चांगदेव-पासष्टी' हे ग्रंथ व अभंगादिक रचना केली आहे. या सर्वातून त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व व प्रगाढ आत्मानुभूती प्रकर्षाने जाणवतात.

गीतेवर मराठी भाषेत भाष्य! अब्रह्मण्यम्!! असा तो काळ. ज्ञानेश्वरांना मराठी भाषेचे व आपल्या भाष्याचे महत्त्व पटवून द्यावे लागेल. लोकांची मने अनुकूल करून घेण्यासाठी ज्ञानेश्वरांनी कसे समर्पक दृष्टांत वापरले आहेत, हे पाहण्यासारखे आहे.

♡ ♡

## नरेंद्र

नरेंद्राच्या चरित्राविषयी पाहिजे तितकी सविस्तर माहिती उपलब्ध नाही. स्मृतिस्थळात दोन ठिकाणी नरेंद्राने महानुभावधर्म स्वीकारल्याचे, तसेच त्याने रुक्मिणीस्वयंवर या ग्रंथाची रचना केल्याचे उल्लेख आले आहेत. रामदेवराव यादवाच्या आज्ञेने नरेंद्राने रुक्मिणीस्वयंवर काव्य रचिले परंतु 'त्याचा अभगु मज द्यावा' असे राजाने म्हटल्यावर रातोरात तिघा भावांनी ग्रंथ नकलून काढला. आज नरेंद्राचे जे रुक्मिणी स्वयंवर उपलब्ध आहे ते अपूर्ण असून ८७९ ओव्यांचे आहे. याचे कारण एका रात्रीतून नरेंद्र फक्त ९०० ओव्याच नकलू शकला हे आहे. त्यानंतर नरेंद्र हा ग्रंथ घेऊन नागदेवाचार्यांपाशी आला. तेव्हापासून रुक्मिणीस्वयंवर या ग्रंथाचा समावेश 'साती ग्रंथांत' झाला. नरेंद्राने हे काव्य रचिताना कोण्या एका महानुभावीय पद्मपुराणाचा आधार घेतला असून त्यावरून किन्नराच्या उपाख्यानाचा समावेश ग्रंथात केला आहे. प्रस्तुत काव्य लिहीत असताना नरेंद्राची भूमिका केवळ कथा-कथन-काराची नसून महाकवीची आहे. 'साहित्याच्या कुंजात रसांचे पाट वाहत असतात आणि तेथे कविता-कामिनीबरोबर 'भाव' डुलत डुलत विहार करीत असतो' असे नरेंद्रानेच म्हटले आहे. या काव्यकल्पनेनुसार नरेंद्राने रुक्मिणी स्वयवराची रचना केलेली आहे. नरेंद्राच्या वर्णनचातुर्याची कल्पना रुक्मिणी-

किन्नर, श्रीकृष्ण याच्या शरीरसौंदर्याचे त्याने जे वर्णन केले आहे त्यावरून किंवा रुक्मिणीची विरहावस्था व त्यावरील उपचार याची वर्णने यावरून येते. नरेंद्राने केलेली निसर्ग वर्णने अप्रतिम आहेत. चंद्रोदयाचे वर्णन किंवा सायंकालीन शोभेचे वर्णन वाचले असता त्याचे प्रत्यंतर येते. 'नरेंद्राचे हे रुक्मिणी स्वयंवर म्हणजे भावमधुरतेने, रसोत्कटतेने, कल्पना-सौंदर्याने व अलंकार-प्रचुरतेने विनटलेले एक अतिशय सुंदर काव्य आहे. भाषाभ्यासकांना त्यांत शब्दांचे भांडार आढळेल, निसर्गप्रिय वाचकांना त्यांत सृष्टिसौंदर्याची रमणीय स्थळे सापडतील, काव्य-मर्मज्ञांना रसभावांची कारंजी उडत असलेली दिसतील आणि भाविकांना विप्रलंभ शृंगाराच्या रमणीय पार्श्वभूमीवर श्रीकृष्ण-भक्तीचे सुंदर चित्र चितारलेले पाहता येईल' असे या काव्याचे डॉ० कोलते यांनी वर्णन केले आहे. प्रस्तुत उतारा पाहून डॉ० कोलते यांच्या या प्रशस्तीची साक्ष पटते.

♡ ♡

## एकनाथ

प्रपंच आणि परमार्थ यांतील विरोध काढून टाकून त्यांचा समन्वय घडविणारे 'एकनाथ' यांचे प्राचीन मराठी कवींतील स्थान अनेक दृष्टींनी महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म शके १४५५ मध्ये झाला. भानुदासासारखे सत्पुरुष हे आजोबा व जनार्दनस्वामीसारखे गुरू. 'एका जनार्दनी' यावरून गुरु-शिष्याचे नाते किती सघन होते हे दिसून येते. ज्ञानेश्वरांनी ज्या भागवत धर्माच्या मंदिराचा पाया रचिला त्याच मंदिरावर नाथांनी आपली 'भागवत' ध्वजा फडकविली हे सर्वविश्रुत आहे. त्यांच्या काव्यरचनेचे ध्येय 'प्रतिपदीं प्रतिपादावें परब्रह्म' असे होते. एकनाथ हे प्रयोगवादी रचनाकार होते असे म्हणणे गैर ठरू नये. ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध करून प्रकाशात आणण्याचे श्रेय जाते ते एकनाथांकडेच. एकनाथ हे त्या दृष्टीने महाराष्ट्राचे पहिले संशोधक. महानुभाव कवी सोडल्यास आख्यानक कवितेचा प्रारंभ नाथांपासूनच होतो. नाथांचा ग्रंथप्रपंच विविध व विपुल आहे. 'भागवत' 'भावार्थ रामायण' रुक्मिणी स्वयंवर' यांच्या जोडीला अनेक छोटे छोटे ग्रंथ आहेत. एकनाथांची अभंगरचनाही वैविध्यपूर्ण आहे. त्यातही गौळणी व भारुडे ही त्यांच्या [illegible] ची वेगळी साक्ष होय.

'भारुड' हा प्रकार एकनाथांइतका कोणीच हाताळला नाही. भारुडातून एकनाथाचे सामाजिक जिवंत मन प्रगट झालेले दिसून येते. रूपकाच्या द्वारे जनसमूहाला जागृत करण्याचे कार्य नाथांनी उत्तम रीतीने केले यात शंका नाही. भारुडात मनोरंजनाबरोबर, बोध असतो. समाजातील निरनिराळ्या प्रकारच्या व्यावसायिकांवर, निसर्गसृष्टीतील पदार्थांवर रूपके साधून त्यांतून आध्यात्मिक निवेदन करण्याचा प्रयत्न असतो. ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादी संतांनी भारुडे लिहिली असली तरी भारूड म्हटले की नाथांचेच नाव डोळ्यापुढे उभे राहते. 'नाथांची भारुडे म्हणजे महाराष्ट्र शारदेचा अजब-खानाच होय' असे ल. रा. पांगारकर म्हणतात त्याचा अनुभव नाथांची भारुडे वाचून येतो.

♡ ♡

## मुक्तेश्वर

पंडितकवी मुक्तेश्वर हे संत एकनाथाचे नातू. मुक्तेश्वरांना कवित्वरचनेचा वारसा त्यांच्या आईचे वडील एकनाथ यापासून लाभला असे म्हणावयाला हरकत नाही. मुक्तेश्वरापूर्वी काव्यरचनेचा हेतू पारंपरिक असा पारमार्थिक होता, परंतु मुक्तेश्वराने कलात्मकता, काव्यानंद या हेतूने रचना केली. यामुळेच मुक्तेश्वरांना पहिले कला-कवि असे म्हणतात. मुक्तेश्वरांची रामायण, महा-भारत ह्या आर्षकाव्यावरील रचना व पुराणांतील मराठीत आणलेली आख्याने ह्यांत त्यांची रचनाकुशलता, अलंकार वैभव आणि व्यासंग हे गुण दिसून येतात. प्रतिभासंपन्नत्व व भाषाप्रभुत्व हे त्यांचे आणखी दोन पैलू होत. मुक्तेश्वरांनी संपूर्ण भारत मराठीत आणले किंवा नाही याविषयी मतभेद आहेत. कारण यांनी रचलेली आदी, सभा, वन विराट व सौप्तिक अशी पाचच पर्वे आज प्रकाशात आहेत. कथा निवेदन करताना कलात्मक दृष्टीचा वापर केल्यामुळे 'महाराष्ट्रकवीत कवी ही संज्ञा एका मुक्तेश्वरालाच मात्र बरोबर लागते' असे रसिक पंडित कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्यांनी म्हटले आहे. मुक्तेश्वरांचे भारत म्हणजे त्यांच्या परिणत प्रज्ञेचा विलास होय. प्राचीन मराठी कवींना भाषांतरे म्हणून हिणवणाऱ्यांनी मुक्तेश्वरांचे भारत वाचून प्राचीन मराठी कवितेचे मूल्य-मापन करावे. मुक्तेश्वरी भारत हे एक अत्यंत आकर्षक, रसाळ आणि स्वतंत्र

सजावटीचे आख्यान-काव्य आहे. 'वातावरण-निर्मिती, खटकेबाज संवाद, निसर्गवर्णने, राजसभा आणि राजमंदिरे यांची शब्दचित्रे, औत्सुक्य वाढविणे, स्वभावपरिपोष, रसनिर्मिती, सुंदर आणि अलंकारमंडित भाषाशैली हे आख्यान काव्याचे सर्व गुण त्यात आहेत' मुक्तेश्वराची रूपके सुंदर आहेत. भाषा ओजस्वी व डौलदार आहे. क्वचित स्थळी मुक्तेश्वरांच्या काव्यात उत्तान शृंगार, अश्लील वर्णने, कालविपर्यास इत्यादी दोष आढळतात. परंतु मुक्तेश्वरांची दोष त्यांच्या गुणांच्या अतिरेकामुळे निर्माण झाले आहेत. नाट्यपूर्ण प्रसंगाचे सरस वर्णन मुक्तेश्वरी भारतात अनेक ठिकाणी आले आहे. द्रौपदीवस्त्रहरणाचा प्रसंग हाच मुळात अतिशय नाट्यपूर्ण; त्यात तो प्रसंग मुक्तेश्वरांनी अत्यंत बहारीने वर्णन केला आहे. करुणगंभीर वातावरणातील द्रौपदीचा धावा हा सर्व अत्यंत रसपूर्ण उतरला आहे. द्रौपदीची स्वभावरेखा या प्रसंगातूनदेखील कवीने उत्कृष्ट रीतीने रेखाटली आहे.

♡ ♡

## तुकाराम

सुशिक्षितांपासून अशिक्षितांपर्यंत सर्वांना सारखाच आवडणारा कवी म्हणजे तुकाराम. तुकारामाच्या वडिलांचे नाव बोल्होबा. देहू येथे व्यापारउदीम. तुकारामाची दोन लग्ने झाली. सरळ, सात्त्विक स्वभावामुळे तुकारामाला व्यापारात झीज सोसावी लागली. त्यातच भयंकर दुष्काळ पडून त्याचा मोठा मुलगा व पहिली बायको ही कालवश झाली. घरी अन्नाचा कण नाही आणि बाजारात पत नाही. त्यामुळे तुकारामाचे मन संसारातून उठले. त्याने पंढरीच्या विठोबाकडे धाव घेतली. गीता—भागवत ग्रंथाचे पठन, ज्ञानेश्वरीचे वाचन यामुळे त्याच्या मनाला शांती लाभत होती. त्याने हरिनामसंकीर्तन सुरू केले. डोंगरावर जाऊन तो तेथे रात्रंदिवस बसू लागला. ही त्याची उदासीन वृत्ती त्याची दुसरी बायको जिजाबाई हीस पाहवत नव्हती. ती अत्यंत प्रेमळ असली तरी संसारी स्त्री होती. त्यामुळे तुकारामाच्या या साधनेला स्वतःच्या घरातून फार विरोध झाला. परिणामी तुकारामाचे लक्ष संसारातून पूर्णतया उठले! तुकारामास बाहेरच्या जगाचाही त्रास झालाच. तुकारामाच्या साधुत्वाची व कवित्वाची प्रसिद्धी तत्कालीन काही लोकांना न पाहवल्यामुळे त्यांनी तुकारामाचा छळ केला.

पण अखेरीस 'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती' या त्यांच्या उक्तीचा अनुभव त्यांना आला. तेरा दिवस पाण्यात बुडविलेल्या वह्या कोरड्या निघाल्यामुळे तुकारामाची प्रसिद्धी सर्वत्र झाली. प्रत्यक्ष शिवाजी तुकारामास भेटावयास आले होते. त्यांनी सोबत आणलेले जडजवाहीर तुकारामाने परत पाठविले.

तुकारामाचे जीवन अनुभवांनी समृद्ध आहे. या सर्व अनुभवांची छाया त्यांच्या अभंगांतून आपणास पाहावयास मिळते. तुकारामाचे अभंग म्हणजे अनुभवाचे बोल आहेत. तुकारामांच्या काव्यातून मुख्यतः आत्माविष्कार आहे. त्यांनी स्वतःचे अनुभव प्रामाणिकपणे व्यक्त केले आहेत. तुकारामाची अभंगरचना अनेक वैशिष्ट्यांनी नटलेली आहे. आशयघनता, सुभाषितवजा रचना, विचारगर्भता, बंडखोर विचारसरणी, मेणाहून मऊ व अमृताहून मधुर अशी भाषा, प्रसंगी तितकीच कठोर, समर्पक प्रतिमांचा वापर इत्यादी अनेक वैशिष्ट्ये अभ्यसनीय आहेत. "तुकारामाच्या सूत्ररूप वचनांनी मराठी भाषा श्रीमंत झाली असून वाणी आणि विचार किंवा वाक आणि अर्थ ही येथे परमरमणीय आहेत." हा संतवाङ्मयाचे रसिक अभ्यासक ल. रा. पांगारकर यांचा अभिप्राय सार्थ आहे यात शंका नाही.

♡ ♡

## रामदास

'आधी केले मग सांगितले' अशा आचरणाचा एक राष्ट्रपुरुष म्हणून समर्थ रामदासस्वामींची ख्याती आहे. जांब येथील सूर्याजीपंत व राणूबाई यांचे कनिष्ठ चिरंजीव नारायण हेच पुढे समर्थ रामदास या नावाने प्रसिद्धीस पावले. लहानपणापासून तत्त्वचिंतक. वयाच्या बाराव्या वर्षी लग्नमंडपातून पळून जाऊन बारा वर्षे पुरश्चरण. नंतर बारा वर्षे भारतवर्षभर भ्रमंती. या भ्रमंतीत त्यांनी समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. परधर्म, परदास्य यांच्या जुलमी मान्याखाली चिरडलेला हिंदुसमाज व हिंदुधर्म, त्यांचे दारिद्र्य यामुळे समर्थांच्या कार्याला निराळीच गती मिळाली. महाराष्ट्रात येऊन त्यांनी लोकजागृतीच्या महान कार्यास प्रारंभ केला. बलवंत अशा हनुमंतरायाची ठिकठिकाणी मंदिरे बांधून उपासना सुरू केली. रामदास हे इतर संतापेक्षा अगदीच वेगळे वाटतात; याचे कारण त्यांची शिकवण. 'घटासी उद्धट, खटासी खटनट

व्हावे' असा त्यांचा उपदेश आहे. शक्ती ही जीवनासाठी अत्यंत आवश्यक बाब आहे असे प्रतिपादिणारे ते पहिले संत होत. तसेच 'प्रयत्नवाद' हा त्यांच्या शिकवणीचा गाभा आहे. 'केल्याने होत आहे रे' अशी आशावादी शिकवण त्या काळच्या महाराष्ट्राला देऊन त्यांनी लोकांना कार्यान्वित केले. आळशी लोकांवर शब्दांचे प्रहार करून त्यांच्या मनात राष्ट्रप्रेम जागृत केले. त्यांना विवेकाचे धडे दिले. रामदासांची रचनाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वासारखी परखड आहे. दासबोध म्हणजे रामदासांचे जणू चरित्रच. लालित्यापेक्षा विचारवैभव हा त्यांच्या रचनेचा विशेष होय. प्रक्षोभकारी रचना दासबोधात ठिकठिकाणी दिसून येते. किंबहुना पद्यस्वरूपात लिहिलेला एक गद्यग्रंथ असेच त्याचे वर्णन करता येईल. मात्र त्यांचे मनाचे श्लोक, आत्मबोध, तुळजापूर-भवानीचे स्तोत्र, करुणाष्टके, ही त्यांची रचना अधिक भावयुक्त आहे. समर्थ रामदास यांनी तत्कालीन समाजात नव्या विचाराची बीजे पेरली.

दासबोधातही मधून मधून काव्याचा झरा दिसतो. याचे प्रत्यंतर आपणास त्यांच्या 'सद्गुरू' या प्रकरणात येते.

♡ ♡

## रघुनाथ पंडित

पंडित कवींमध्ये श्रेष्ठ कवी. याच्या स्थलकाळाविषयी विद्वानांमध्ये मतभेद आहेत. रघुनाथ पंडिताचा काळ सुमारे इ. स. १६५० ते १६२० हा असावा. 'दमयंती-स्वयंवर' खेरीज 'गजेंद्रमोक्ष' व 'रामदासवर्णन' ही त्याची रचना आहे. 'दमयंतीस्वराख्यान' हा ग्रंथ छोटा असला तरी रसिकांनी मात्र त्याला वरचे स्थान दिले आहे. प्राचीन मराठी कविता महाभारत, रामायण व भागवत या ग्रंथावरील तत्त्वज्ञानपर आख्यानांवर आधारलेली आहे. रघुनाथपंडिताने मात्र संस्कृतातील पंचमहाकाव्ये डोळ्यापुढे मराठी भाषेत त्या धर्तीवर रचना केली आहे. किंबहुना अशा तऱ्हेची करणारा हा पहिलाच कवी होय. श्रीहर्षकवीच्या 'नैषधीय-चरित' या प्रख्यात महाकाव्यावर 'दमयंतीस्वयंवर' हे काव्य आधारलेले आहे. 'दमयंतीस्वयंवर' हे काव्य अपूर्व असावे असा संशोधकांचा अंदाज आहे. कारण या काव्यात 'होय श्रृंगारा करुणरसा थारा' असे स्वतः कवीने म्हटले असले तरी

करुणरसाचा भाग या काव्यात समाविष्ट झाला नाही. रघुनाथपंडिताच्या रचनेविषयीही विद्वानांमध्ये मतभेद आहे. काहींच्या मते तो केवळ 'रचनाकार' 'भाषांतरकर्ता' कवी होता, तर काहींच्या मते तो एक उत्तम कवी होता. ही दोन्ही मते काहीशी एकांगी आहेत असेच म्हणावे लागेल. कारण त्या काळी तशी रचना करणे हे एक भूषण मानले जात असे. शिवाय रघुनाथपंडित हा केवळ भाषांतरकर्ता नाही हे 'नैषधीयचरित' व 'दमयंती-स्वयंवर' तुलनात्मक रीतीने वाचल्यास कळून येईल. काही स्थळे मुळापेक्षाही अधिक सरस आहेत असा अभिप्राय रसिकांनी व्यक्त केला आहे. अंतःकरणास हलवून सोडणारी रसवत्ता यात कमी प्रमाणात असली तरी अलंकारमंडित व कल्पनाचमत्कृतीपरिपूर्ण अशी रचना म्हणून या काव्याची प्रसिद्धी आहे. महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांच्या शब्दांत 'उत्तम पाणीदार हिऱ्याचे तेज यांच्या श्लोकांत आहे, पण ताज्या खुडलेल्या फुलांची किंवा फळांची बहार त्यांच्यांत नाही,' असे म्हणता येईल. प्रस्तुत ठिकाणी घेतलेला नलदमयंतीच्या संवादाचा भाग हा या काव्यातील उत्कृष्ट भाग होय. त्यातील कल्पनासौंदर्य व युक्तिवादकौशल्य मनोहारी आहे.

♡ ♡

## मोरोपंत

पंडितकवींमधला शेवटचा कवी. 'दिसामाजी कांही तरी लिहावे' व 'अखंडीत वाचीत जावे' ही त्यांच्या जीवनाची सूत्रे. मोरोपंताने केलेली रचना विपुल व विविध आहे. मोरोपंत पराडकरांचा जन्म शके १६५१ मध्ये झाला. बारामतीचे जहागिरदार बाबूजी नाईक यांनी पंतांची विद्वत्ता, कवित्व-शक्ती व साधुत्व हे गुण पाहून आपल्या पदरी प्रवचनकार म्हणून ठेवून घेतले. संस्कृत काव्यनाटकशास्त्रे यांचा सूक्ष्म अभ्यास त्यांनी केला होता. त्या अभ्यासाचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात आढळून येते. संपूर्ण महाभारत त्यांनी मराठीत आणले. याशिवाय १०८ रामायणे, कृष्णविजय, हरिवंश, मंत्र भागवत, सीतागीत, अनेक स्तोत्रे–आख्याने, श्लोक, केकावली व आर्याकेकावली इत्यादी काव्यरचना त्यांनी केली आहे. अलंकारखचित रचना, शुद्ध भाषा, विविध रस इत्यादी गुणांनी त्यांचे काव्य समृद्ध आहे. संस्कृताच्या अतिरेकी

परिणामामुळे त्यांचे काव्य काहीसे क्लीष्ट झाले आहे, हे खरे. तरी पण श्लोककेकावली, सुदामचरित, गंगास्तव ही रचना सोपी व प्रवाही आहे. भक्तिकाव्यात पंताचे खरे रूप पाहावयास मिळते; कारण भक्ती हा त्यांच्या जीवनाचा पिंड आहे. श्रद्धायुक्त मनाने त्यांनी गंगामातेस वाहिलेली भावपुष्पांजली वाचून रसिकाचे हृदय हेलावल्याखेरीज राहत नाही. पंतांची रचना गंगास्तवामध्ये अधिक प्रसादपूर्ण, साधी, व भक्तियुक्त वाटते. पंतांच्या आर्ततेचे दर्शन या काव्यात आपणास घडते. मराठी स्तोत्रवाङ्मयात पंताची ही रचना अतिशय श्रेष्ठ दर्जाची आहे. मराठी काव्यास 'सुसंस्कृत' अभिरुचिसंपन्न वळण लावण्याचे श्रेय पंतांकडे जाते हेही लक्षात ठेवले पाहिजे.

♡ ♡

## मध्वमुनीश्वर

मध्वमुनीश्वरांचे मूळचे नाव त्र्यंबक असून वडिलांचे नाव नारायणाचार्य व आईचे द्वारावती असे होते. त्र्यंबकास प्रत्यक्ष श्रीशुकाचार्यांनी गुरूपदेश दिला हे वैष्णवांना न खपून त्यांनी त्याला मध्वाचार्यांसमोर उभे केले. मध्वचार्यांनी त्र्यंबकाची योग्यता ओळखून त्याचा गौरव केला, व त्यास मध्वमुनीश्वर असे नाव दिले. नंतर मध्वमुनीश्वर औरंगाबादेस फिरतफिरत आले तेथून ते सेंदुरवाड्यावर गेले. तेथे ते बरीच वर्षे राहिले. त्यांची समाधी सेंदुरवाड्यास आहे. त्यांच्या काळात औरंगाबाद जिल्ह्यात निपटनिरंजन, मानपुरीबुवा, सुभानशहा, व शहानूर हमपी ही संतमंडळी होती. प्रसिद्ध अमृतराय हे मध्वमुनीश्वरांचे शिष्य होते. मध्वमुनीश्वरांनी स्फुट पदे, काही चरित्रे, आरत्या अशी रचना केली आहे, त्यांनी हिंदी व संस्कृत भाषेत देखील रचना केली आहे. त्यांची कविता हरदासी पद्धतीची आहे. त्यांची कित्येक पद्ये मधाच्या पोळ्याप्रमाणे मधुर रसाने थबथबलेली आहेत. तुकाराम–रामदासांची अंतर्भेदी वाणी स्तब्ध झाल्यावर मध्वमुनीश्वर, अमृतराय आदींनी भक्तिरसपूर्ण काव्यरचना केली. 'उद्धवा शांतवन कर जा' हे मध्वमुनीश्वराचे प्रसिद्ध पद आहे. कृष्णाविषयी गोकुळात असलेली प्रीती या पद्यात वर्णिलेली असून कृष्ण गोकुळवासियांचे सांत्वन करण्यास उद्धवास सांगत आहे. हा प्रसंग जितका हृदयंगम तितकाच रसपूर्ण आहे.

♡ ♡

## होनाजी बाळ

पेशवाईच्या काळात ज्या शाहिरांनी रचना करून लौकिक मिळविला त्यात होनाजीबाळाचे स्थान श्रेष्ठ आहे. याच्या घराण्यात कवित्व वंशपरंपरागत चालत आलेले होते. त्याचा आजोबा सातप्पा व चुलता बाळा हे त्या काळातील गाजलेले शाहीर होते. होनाजी हा नंदगवळी जातीचा असून त्याचे आडनाव शिलारखाने. स्वतःच्या घराण्यात चालत आलेले गवळ्याचा व तमाशाचा असे दोन्ही व्यवसाय होनाजीने पुढे चालविले. तो व त्याचा साथीदार बाळा कारंजकर या दोघांनी पुणे चांगलेच गाजविले. होनाजी आणि बाळ यांच्या संयुक्त नावाने त्यांनी रचना केली आहे त्यामुळे होनाजी बाळ असे संबोधण्याचा प्रघात पडला आहे. रंगाचा दरबार, खर्ड्याची लढाई या या प्रसंगावर होनाजीने पोवाडे रचले आहेत. त्याबरोबरच निरनिराळ्या रागदारीच्या चालीवर लावण्या रचून होनाजीने तमाशाला बैटकीच्या गाण्याचे स्वरूप आणून दिले. त्यामुळे तमाशाला एकप्रकारची प्रतिष्ठा मिळाली. कलावंतिणींनी चिजा म्हणण्याचे सोडून होनाजीच्या लावण्या म्हणण्यास आरंभ केला. होनाजीला दुसऱ्या बाजीरावाच्या काळात अमाप लोकप्रियता व धन मिळाले, परंतु पेशवाईच्या अस्तानंतर त्यालाही इतर शाहिराप्रमाणे पैशासाठी पुणे सोडावे लागले. होनाजीचा अंत मारेकऱ्यांच्या हातून अत्यंत शोकजनक झाला. होनाजीच्या लावण्यांत बेछूट शृंगार आढळत असला तरी त्याची रचना घोटीव व शब्दाची ठेवण अत्यंत आकर्षक असते. लावण्याचे नवे नवे छंद कानास गोड लागतात. मानवीस्वभावाचा सूक्ष्म अभ्यास असल्यामुळे होनाजीच्या कवनांतून स्त्रियांच्या सहजसुलभ भावनांचे दर्शन घडते. अलंकारांच्या साहाय्याने तो सारे स्त्रीसौंदर्य आपणापुढे साक्षात उभे करतो. त्याच्या रचनेतून तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन घडते. शृंगारिक लावण्यांच्या रचनेबरोबरच देवादिकावरील त्याच्या लावण्यादेखील मोहक आहेत. 'घनश्याम सुंदरा' ही भूपाळी रचून होनाजीने मराठी रसिकांची मने जिंकून कवी या नात्याने अमरपद मिळविले आहे. या भूपाळीत होनाजीच्या प्रतिभेचा मनोरम विलास पहावयास मिळतो.

♡ ♡

## कृष्णशास्त्री चिपळूणकर

अव्वल इंग्रजी अमदानीतील प्रसिद्ध पंडित. त्यांचा जन्म पुणे येथे झाला व त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य तेथेच घालविले. पुण्याच्या पाठशाळेत व ट्रेनिंगकॉलेजमध्ये ते काही वर्षे प्रिन्सिपॉल होते. त्यांची मते सुधारकी होती. संस्कृत तसेच मराठी भाषेवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. निबंधकार या नात्याने देखील त्यांची प्रसिद्धी आहे. रसिक आणि मर्मज्ञ टीकाकार. 'पद्यरत्नावली' या लहान काव्यग्रंथात मेघदूत, अन्योक्ती, विद्याप्रशंसा इत्यादी अनेक स्फुट कविता संगृहीत केल्या आहेत. कृष्णशास्त्रींची रचना संस्कृतप्रचुर असली तरी प्रासादिक असते. त्यांच्या कवितेमधील काही ओळींना म्हणींचे स्वरूप प्राप्त झाले आहे. संस्कृतांतील काव्याचे भाषांतर करताना मूळ काव्याची गोडी ते यत्किंचितही कमी होऊ देत नाहीत. अन्योक्तीमध्ये त्यांचे भाषाप्रभुत्व जसे दिसते तसेच त्यांच्या बुद्धीची चमकही दिसून येते. कोकिलान्योक्ती या कवितेत अरसिकांच्या मेळाव्यात कविता न गाण्याची प्रतिभावंत कवीला (कोकिळेला) विनंती केली आहे. खऱ्या कवीला प्रस्तुत काळात 'वाकडा काळ' आला असून हीन दर्जाचे कवी (काक) जिकडे तिकडे काव्यरचना करीत असताना दिसत आहेत. 'पूर्वी बाळपणी' या गजान्योक्तीत लहानपणी वाढविलेला हत्ती मोठा होऊन धुंद झाला व आपल्याला ओळखीत नाही, अशा स्थितीत मुनी भीत पण त्यांना संतोषही होई, ही गोष्ट सुंदर रीतीने सांगितली आहे.

♡ ♡

## केशवसुत (कृष्णाजी केशव दामले)

प्राचीन काव्यप्रथेला वळण लावून सौंदर्यवाद, सामाजिकता इत्यादी विशेष प्रथमतः कविवर्य केशवसुत ह्यांनी मराठी कवितेत आणले म्हणून त्यांना 'आधुनिक मराठी कवितेचे जनक' असे संबोधले जाते. त्यांच्या कवितांचा संग्रह १९१७ मध्ये हरी नारायण आपटे यांनी प्रथम प्रकाशित केला. केशवसुत हे इंग्रजी काव्याने प्रभावित झालेले पहिले आत्मपर कवी होत. मराठी कवितेतील आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या स्वरूपात जाणीवपूर्वक क्रांती केली.

कविता अशी असावी आणि तशी नसावी असे सांगणारे तुम्ही कोण असा प्रश्न केशवसुतांनीच प्रथम टीकाकारांना विचारला. केशवसुतांनी कवी, काव्य, प्रतिभा इत्यादींवर कविता लिहिल्या. त्याचें स्वरूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. निसर्गकविता, आत्मपर प्रेमकविता, गूढगुंजनात्मक कविता इत्यादी कविताप्रकार रूढ केले. केशवसुतांनी आपल्या कवितेतून सामाजिक सुधारणाविरुद्ध बंड पुकारले. 'समतेचा नवा ध्वज' उंच उभारला. जाती, धर्म, पंथ या कशाचेही बंधन नसलेला 'मी शूर शिपाई आहे' अशी घोषणा केली. त्याच्या कवितेचा सारा भर रूढीभंजनावर होता. त्यावेळी त्यांनी फुंकिलेल्या 'तुतारी'चे पडसाद इतर कवींच्या कवितांतही उमटले. 'तुतारी मंडळ' स्थापन झाले. केशवसुतांनी आपल्या कवितारूपी 'गोफणी'तून शब्दरूपी 'धोंड्यांची' हाणाहाण केली. अशा या बंडखोर कवीने कवितेच्या अंतरंगात आमूलाग्र बदल करून 'नवी कविता' सुरू केली. त्यांनी अनेक रचनाविषयक प्रयोगही केले. सुनीत हा नवा रचनाप्रकार सुरू केला. नवीन छंद दिले. केशवसुतांची भाषा ही ओबडधोबड व रांगडी वाटत असली तरी तीत ओज आहे. त्यांनी लिहिलेल्या गूढगुंजनात्मक कवितांमध्ये—चिंतनिकांमध्ये—रचनेची सफाई आढळते. झपूर्झा, हरपले श्रेय, भृंग, पुष्पाप्रत, म्हातारी इत्यादी कविता या दृष्टीने अभ्यासण्यासारख्या आहेत. तुतारी, स्फूर्ती या कवितांमध्ये असलेला ओज मराठी कवितेत इतरत्र क्वचितच आढळतो.

स्फूर्ती ही केशवसुतांच्या उत्कृष्ट कवितांपैकी एक आहे. माधवराव पटवर्धनांनी देखील या कवितेंतील असलेला बंडखोर उमेद असलेल्या उन्मत्त आत्मविश्वासाची वाखाणणी केली आहे. कवि, काव्य व प्रतिभाविषयक कवितांमध्ये जरी या कवितेची गणना करीत असले तरी येथे स्फूर्ती केवळ काव्यविषयक नाही. त्यांच्या सामाजिक कार्याची जाणीव क्रांतिकारक आहे. या कवितेची परिणामकारकता तिच्या रेखीव बांधणीमुळे वाढली आहे. ओजस्वी शब्दरचना कवितेमधील कणखर आणि जोरदार अर्थाला साजेशी आहे.

♡ ♡

## रे. नारायण वामन टिळक

केशवसुतांच्या 'तुतारी' या कवितेच्या नावाने स्थापन झालेल्या तुतारी

मंडळात रे० नारायण वामन टिळकांनी आपल नाव नोंदवलेले असले तरी त्यांच्यात नव्या जुन्याचे अपूर्व मिश्रण आढळते. त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता तरी सुद्धा मराठी परंपरा त्यांनी कसोशीने राखली. "धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे" असे ते नेहमी म्हणत. टिळकांना 'फुलामुलांचे कवि' म्हणतात. त्यांनी मुलासंबंधी कविता रचून उपदेश करण्याचा प्रयत्न जरी केला असला तरी त्यात वात्सल्य ओतप्रोत भरले आहे हे नाकारता येत नाही. 'वनवासी फूल,' रानात पडलेले एकटेच फूल, गुलाब, दोन फुले इत्यादी फुलांविषयी असलेल्या त्यांच्या कवितांबरोबरच त्यांनी इतर निसर्गविपयक कविता लिहिल्या असल्या तरी ते निसर्गाशी समरस होत नाहीत. घरचे प्रेम त्यांना निसर्गप्रेमापेक्षा अधिक महत्त्वाचे वाटते. 'माझी भार्या' ही टिळकांची प्रसिद्ध कविता त्याची साक्ष पटवून देते. 'रणशिंग' 'बोंबाबोंब' या समाजसुधारणाविषयक कविता टिळकांनी लिहून केशवसुतांच्या तुतारीला साद दिली. मात्र तुतारीचे हे पडसाद क्षीण आहेत. ख्रिस्तायन हे रामायणाच्या धर्तीवर लिहिलेले काव्य आणि अभंगाजली यांत सहजसुंदर भाषा, अंतःकरणातील उमाळा ही दिसून येतात. 'वनवासी फूल' या टेनिसनच्या 'two voice' च्या धर्तीवर रचलेल्या काव्यात प्रवृत्ति-निवृत्ती यांचा वाद आहे, त्यात निश्चित निर्णय नाही. परंतु टिळकांनी प्रवृत्तिमार्गावर भर दिलेला आहे असे दिसून येते. या कवितेत तत्त्वचर्चा असूनही काव्य मनोरम उतरले आहे.

♡ ♡

## 'चंद्रशेखर' शिवराम गोऱ्हे

मराठी कवितेत आमूलाग्र परिवर्तन ज्या काळांत होत होते त्या काळात जुनी पंडिती काव्याची परंपरा चालू ठेवणारे केशवसुतकालीन श्रेष्ठ कवी. चंद्रशेखर भूतकाळातच रमले. केशवसुतांच्या काळापासून रविकिरणमंडळाच्या काळापर्यंत सतत रचना करीत राहिले तरी त्यांची प्रतिभा आत्मपरतेच्या आहारी गेली नाहीं. स्वतःची सुखदुःखे कवितेमधून मांडणे म्हणजे नागवे फिरण्यासारखे होय असे त्यांचे मत होते. फक्त 'गोदागौरव' व 'कवितारति' या दोन कवितांत आत्मलेखनात्मक उल्लेख आहेत. त्यांच्या रचनेवर संस्कृत व जुन्या मराठी कवितेचा प्रभाव पडलेला दिसतो. त्यांची प्रतिभा भावगीतानुकूल

नव्हती. त्यांच्या एकंदर कवितेचे स्वरूप पाहता त्यांना स्वतंत्रपणे कविता स्फुरल्या नाहीत असे दिसते. त्यांची कविता वस्तुनिष्ठ असून तीत जीवनाचे पडसाद नाहीत किंवा मनोव्यापाराची गूढ प्रमेये नाहीत. तिचा आत्मा विचार हा आहे. चंद्रशेखर कवितादेवीचे निस्सीम उपासक होते. त्यांनी आजन्म शारीरिक व मानसिक श्रम सोसून भाषा कमावली होती. 'रंगराव हर्षे', 'चिंतोपंत उदास' इत्यादी रूपांतरित कविता भाषादृष्ट्या सुंदर आहेत! 'काय हो चमत्कार!' हे अभिजात कथाकाव्य त्यांच्या प्रतिभेची साक्ष पटविते. चंद्रशेखरांच्या कवितेतील सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या 'गोदागौरव' या उत्कृष्ट कवितेत दिसतात. या कवितेत गोदावरीविषयी त्यांचे प्रेम जसे दिसते तशीच त्यांची विरक्त तटस्थताही जाणवल्यावाचून राहात नाही. या कवितेचे स्वरूप जुन्या स्तोत्रासारखे आहे.

♡ ♡

## 'गोविंदाग्रज' (रामगणेश गडकरी)

आधुनिक मराठी कवींत गोविंदाग्रजाइतकी लोकप्रियता लाभलेला कवी विरळा. मराठी कविता साधारण वाचकांपर्यंत नेण्याचे कार्य त्यांनी केले. आधुनिक मराठी कवितेतील प्रेमगीतांचे पीठ त्यांनी आपल्या करुण आणि उत्कट भावनांनी समृद्ध केले. गोविंदाग्रज स्वतःला केशवसुतांचा 'सच्चा चेला' समजण्यात अभिमान मानतात. त्यांनी काव्याच्या प्रांतात अनेक बाबतीत केशवसुतांचे अनुकरण केलेले दिसते. गुरूला न लाभलेली कल्पकता या शिष्यास लाभली होती. त्यांचे भाषाप्रभुत्व देखील असाधारण होते. मात्र त्यांनी काव्याच्या बहिरंगाकडे अधिक लक्ष दिले. गोविंदाग्रजांनी विपुल प्रेमगीते लिहिली आहेत. त्यामुळे त्यांना 'प्रेमाचा शाहीर' म्हणतात. गोविंदाग्रजाचे प्रेम हे बुद्धीने आकलित नाही तर जिवंत भावनेची ती अभिव्यक्ती आहे, त्यांच्या प्रेमकवितेत दुःखाचे निःश्वास ऐकू येतात. त्यातून गडकऱ्यांच्या व्यथित मनाची, वेदनागर्भतेची जाणीव होते. त्यांनी इतर अनेक विषयाची थट्टा केली असली तरी प्रेमाची मात्र कुठेही थट्टा केली नाही. गोविंदाग्रजांच्या एकंदर लेखनात जी अवडंबरप्रियता आढळते तिचा प्रत्यय त्यांच्या कविता वाचून देखील येतो. वाङ्मयीन संयमाचा अभाव त्याच्या कवितेतील शब्दांची

आणि कल्पनांची उधळपट्टी पाहिल्यानंतर जाणवतो. हे सर्व जरी खरे असले तरी यामुळे त्यांचे कवी म्हणून जे अढळ स्थान आहे त्यास बाध येत नाही.

♡ ♡

## बालकवी (त्र्यंबक बापूजी ठोमरे)

'ठोमरे बालकवि होता; पण कवीपेक्षाही तो बाल अधिक होता' असे लक्ष्मीबाई टिळकांनी यांच्याविषयी सार्थ उद्गार काढले आहेत. त्यांची मनोवृत्ती एखाद्या निरागस बालकाप्रमाणेच होती. बालकवींना निसर्गात स्थैर्य, परिपूर्णता, सौंदर्य आणि आनंद ही दिसली. बालकवी निसर्गाचे निरपेक्ष व निरासक्त उपासक आहेत. 'सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावे' अशी त्यांची आकांक्षा आहे. विश्वात्मक सौंदर्याचा ध्यास त्यांना लागला होता. संवेदनशीलता, भावनावशता, हळवेपणा, कोमलपणा, स्वप्नाळू वृत्ती हे त्यांच्या कवितेचे विशेष आहेत. बालकवी निसर्गाशी तल्लीन होतात. अशा तल्लीन अवस्थेत निर्माण झालेल्या प्रतिमासृष्टीमुळे त्यांचे काव्य जिवंत होते. फुलराणी, बालविहग, निर्झरास, बाळे ती खेळत होती ह्या त्यांच्या उत्तम कविता आहेत. औदुंबर, परवा, खेड्यातील रात्र यांतील शब्दचित्रेही नितांतसुंदर आहेत. बालकवींनी शिशुगीतेही लिहिली. केशवसुतांच्या तुतारीच्या धर्तीवर 'धर्मवीर' ही कविता लिहिली. मात्र तुतारीतील आवेश व जोम तीत नाही. हिरव्या गवतावर डोलत असलेले एक लहान पांढरे फूल हीच त्यांची 'फुलराणी.' तिला पाहिल्यावर बालकवींनी एक सुंदर स्वप्नसृष्टी निर्माण केली. बालकवींच्या या कवितेला मराठी कवितेस तोड नाही, इतकी ती सर्व दृष्टींनी अप्रतीम अशी उतरली आहे.

♡ ♡

## 'बी' (नारायण मुरलीधर गुप्ते)

नारायण मुरलीधर गुप्ते उर्फ बी हे एक चिंतनशील कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची रचना थोडी असली तरी नितांतसुंदर आहे. त्यांनी रसिकांना वाहिलेली 'फुलांची ओंजळ' सुगंधाने बहरलेली आहे. त्यांची वृत्ती अंतर्मुख आहे. बींच्या कवितेत कल्पनाविलास आढळत नाही. भावना आणि विचार यांचा प्रभावी संयोग ही त्यांच्या काव्याची स्वाभाविक वृत्ती आहे.

भावानुभवापेक्षा त्याची कविता भावगर्भ विचारानुभवातूनच स्फुरलेली आहे. त्यानी आपल्या काव्यात आदर्श काव्याच्या स्वरूपाचा विचार केला. केशवसुतप्रमाणेच बी कवींनी केलेली काव्यचर्चा बहुमोल आहे. त्यांचा जीवनविषयक एक स्वतंत्र दृष्टिकोण आहे, बहुतेक कवितेंत संस्कृतप्रचुर भाषा, कृत्रिम रचना आढळत असली तरी कमळा हे काव्य त्यास अपवाद आहे. या कवितेत तत्त्वचिंतन नाही. या कवितेतील भावनाविलास मनाला मोहवून टाकणारा आहे.

♡ ♡

## भा. रा. तांबे

गोविंदाग्रज, बालकवी, टिळक इत्यादी कवींच्या नंतरच्या काळात झालेल्या कवीत तांबे यांचे स्थान श्रेष्ठ आहे. त्यांनी लिहिलेल्या सगळ्या कविता आज उपलब्ध नाहीत. कारण तारुण्यात त्यांनी केलेल्या अनेक शृंगारिक कविता त्यांनी स्वतःच नष्ट केल्या. तांबे हे प्राधान्याने भावगीत कवी होते. त्यांच्या कवितेवर टेनिसन, ब्रौनिंग इ. पाश्चात्य कवींचा चांगलाच प्रभाव पडलेला दिसतो. त्यांच्या कवितेत त्यांच्या जीवनाचे मनोरम प्रतिबिंब पडले आहे. 'माझ्या कवितेची वाढ माझ्या जीवनाच्या संगतीने झाली आहे. माझ्या कवितांचा आधार येथून तेथपावेतो समाजाच्या अंतर्बाह्य अवलोकनावर आहे.' असा स्वतःच्या काव्याविषयी तांबे यांनीच विस्तृत खुलासा केला आहे. त्यांच्या कवितेत विचारापेक्षा भावनेला स्थान आहे. त्यातही प्रणयभावना हा तांब्यांच्या कवितेचा मुख्य विषय आहे. तांब्यांच्या व्यक्तिगत जीवनातली मुख्य व प्रभावी भावना सफल प्रीतीची. त्यांच्या नितांतमधुर कवितांमधून त्यांच्या प्रेमविषयक समाधानातील उत्कटता प्रतीत होते. तांब्यांच्या कवितेतील भावनाभिव्यक्तीचे क्षेत्र केवळ स्वतःच्या जीवनापुरतेच मर्यादित नसून त्यांनी परभावचित्रण करणारी नाट्यगीते देखील लिहिली आहेत. या नाट्यगीतातून अन्यजीवांच्या सुखदुःखाविषयी त्यांच्या मनात असलेल्या सहानुभूतीचे दर्शन घडते. त्यांची प्रेमगीते प्रसन्न आणि मधुर असून त्यात विविधता आहे. बालापासून वृद्धापर्यंत सर्व व्यक्ती त्यात येतात. विधवा स्त्रीच्या मनातील प्रेमभावनेची विविध चित्रेही त्यांनी मोठ्या सहृदयतेने काढली आहेत. तांबे यांनी एक निराळीच रचनापद्धती निर्माण करून मराठी कवितेस एक निराळेच वळण लावले. तांब्यांच्या काव्याचा

आणि रचनापद्धतींचा परिणाम नंतरच्या कवींवर होऊन एक निराळाच संप्रदाय रूढ झाला. प्रेमगीतांबरोबरच तांबे यांनी भोंवतालच्या जीवनाने प्रभावित होऊन 'रुद्रास आव्हान', 'लोकमान्यास' इत्यादी प्रभावी कविताही लिहिल्या आहेत.

♡ ♡

## वि. दा. सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर हे त्यांच्या ज्वलंत राष्ट्रनिष्ठेसंबंधी प्रसिद्ध आहेत, तसेच ते एक श्रेष्ठ श्रेणीचे कवी, निबंधकार व नाटककार म्हणूनही ख्यात आहेत. हिंदुराष्ट्राचे पुनरुत्थापन हे त्यांचे ध्येय. आपल्या ध्येयावरील असीम निष्ठेसाठी त्यांनी प्राणाचीही पर्वा केली नाही. त्यांच्या लेखी ध्येय हाच देव! त्यांची वाङ्मयनिर्मितीही याच प्रेरणेतून झालेली आहे. ब्रिटिश राजसत्तेस आपल्या प्रक्षोभक विचारांनी व कृत्यांनी भांबावून सोडणाऱ्या या वीराची त्या सत्तेने चांगलीच दहशत घेतली होती. त्यामुळे स्वा. सावरकरांना अंदमान बेटातील तुरुंगवास भोगावा लागला. विलायतेला उच्च शिक्षणासाठी गेलेल्या ह्या महापुरुषाने तेथे निराळेच कारस्थान रचले! राष्ट्रीय परंपरेतील एक श्रेष्ठ वाङ्मयकार. हिंदुधर्म व हिंदुराष्ट्र यांच्या उन्नतीसाठी त्यांनी नाटके लिहिली, काव्ये रचिली व पोवाडे गायिले. 'कमला' 'गोमांतक' ही त्यांची अपूर्ण काव्ये. त्यांची स्फुट कविता 'सावरकरांची कविता' या संग्रहात समाविष्ट केली आहे. '१८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध' 'माझी जन्मठेप' 'काळे पाणी' हे त्यांचे लेखन मराठी वाचकाच्या नित्य स्मरणात राहील. तसेच 'संन्यस्तखड्ग' 'उत्तरक्रिया' इत्यादी नाटके त्यांतील विशिष्ट तत्त्वप्रतिपादनामुळे त्या काळी खूप गाजली होती. त्यांचे सर्व वाङ्मय स्वातंत्र्यप्रेमाने रसरसलेले, राष्ट्रनिष्ठेने प्रेरित झालेले व ध्येयवादाने पल्लवित झालेले आहे. असाधारण भाषाप्रभुत्व, उत्तम कवित्वशक्ती, व उत्कट देशभक्ती यांचा संयोग पावून त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व घडलेले असल्यामुळे ओजस्विता, भव्यता, उदात्तता हे गुण तेथे सहज पाहावयास मिळतात. महाकवित्वाला आवश्यक असणारी अभिजात प्रतिभा व तिचे नवनवोन्मेष सावरकरांच्या काव्यात आढळून येतात. महाकाव्य न लिहिणारे महाकवी असे त्यांचे सार्थ वर्णन केले जाते.

विज्ञाननिष्ठा व प्रखर बुद्धिवाद ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी महत्त्वाची वैशिष्ट्ये. तसेच जे जे उदात्त, उन्नत, उत्तम, ऊर्ज्वस्वल, उत्कट त्याचे ह्यांना वेड! कवी आणि विचारवंत म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरच!!

♡ ♡

## माधव जूलियन (माधव त्र्यंबक पटवर्धन)

माधव जूलियन हे कवि १९२० सालानंतर म्हणजे गोविंदाग्रज, टिळक, बालकवी यांच्या मृत्यूनंतर उदयास आलेल्या कवींपैकी अग्रगण्य कवी होत. रविकिरणमंडळातील प्रमुख कवी. बडोदे येथे जन्म व तेथेच वास्तव्य. नंतर फर्ग्युसन कॉलेजमध्ये व राजाराम कॉलेज आदी संस्थात अध्यापनाचा व्यवसाय. फार्शीभाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. त्याचबरोबर मायबोलीवर त्यांच्या ठिकाणी अथांग भक्ती होती. कवी आणि पंडित असा दुहेरी लौकिक संपादन केला. त्यांनी तांब्यांच्या कवितेचे संपादन केले. छंदोरचना नामक ग्रंथ अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिला. या ग्रंथामुळे त्यांना डी. लिट्. ही सर्वश्रेष्ठ पदवी मिळाली. चंद्रशेखरांना ते काव्यरचनेच्या बाबतीत आदर्श मानीत. भाषा-शुद्धीकरणाची चळवळ करून मराठी भाषेची थोर सेवा केली. त्यांचा स्वभाव 'मूडी' असून त्यांची वृत्ती आत्यंतिक स्वयंकेंद्रित होती. अन्यायाची चीड, उदंड परिश्रमशीलता इत्यादी त्यांच्या स्वभावाचे विशेष गुण होत. त्यांनी विपुल काव्यलेखन केले. विरहतरंग, सुधारक, उमरखय्यामच्या रुबाया (भाषांतरित) द्राक्षकन्या, गज्जलांजली, स्वप्नरंजन, तुटलेले दिवे, नकुलालंकार, मधुलहरी ही त्यांची काव्याची पुस्तके. 'विरहतरंग' यात एक प्रेमकहानी असून त्यात प्रियकराच्या स्मृती चितारल्या आहेत. या कवितेवर त्या काली अत्यंत प्रतिकूल टीका झाली. त्यातील वातावरण आधुनिक असून लेखनशैली प्रौढ व अलंकार-प्रचुर आहे. जोगांच्या मते हे काव्य कालिदासांच्या मेघदूताहूनही श्रेष्ठ आहे. 'तुटलेले दुवे' हा १०१ सुनीतांचा संग्रह असून त्यात शोकपर्यवसायी प्रेमकथा गुंफलेली आहे. 'सुधारका'त सामाजिक ढोंगावर कोरडे असून 'नकुलालंकारा'मध्ये वाङ्मयातील झब्बुशाहीवर अत्यंत प्रखर टीका केली आहे. त्यांनी रुबायांची केलेली भाषांतरे तसेच गज्जलांजली यावरून भाषेवरील प्रभुत्व तसेच नवीन रचनाप्रकार रूढ करण्याचा साक्षेप दिसून येतो. माधवजूलियनांची स्फुट कविता

स्वप्नरंजन, मधुलहरी यांत समाविष्ट केलेली आहे. त्यांचे काव्य म्हणजे त्यांच्या मानसिक प्रवासाची त्रुटित जंत्री आहे. भावनेची उत्कटता, उत्तानता त्यांच्या कवितेचे विशेष आहेत. त्यांची कविता त्यांच्या आंतर्जीवनाची स्पष्ट चित्रे आहेत असे म्हटल्यास चालेल. त्यांच्या काव्यात प्रेमनिराशेचे चित्र आहे. त्यांच्या कांही प्रेमगीतांत आत्माविष्कारामुळे गहनता आली आहे.

♡ ♡

## 'यशवंत' दिनकर पेंढरकर

रविकिरणमंडळातील एक श्रेष्ठ कवी. 'महाराष्ट्र कवी'. यशवंताची रचना विपुल विविध आहे. 'यशवंत', 'यशोधन', 'भावमंथन', 'यशोगंध', 'यशोगिरी', 'ओजस्विनी', 'पाणपोई', हे त्यांच्या स्फुट कवितांचे संग्रह असून 'जयमंगला' 'बंदीशाळा' व 'काव्यकिरीट' ही त्यांची खंडकाव्ये आहेत. काव्य ही एक उपासना आहे; ते एक व्रत आहे अशी त्यांची भूमिका आहे. ते स्वतःला 'दऱ्याखोऱ्यातला कवी' असे म्हणवितात. स्वयंकेंद्रित वृत्ती व आशयातील सामान्यता हे रविकिरणमंडळाच्या कवितेचे विशेष असले व हे विशेष यशवंतांच्या कवितेत दिसत असले तरी त्यांच्या जीवनातील विविध अनुभव उत्कटतेने व्यक्त झाले आहेत. त्यामुळेच त्यांची कविता रविकिरण-मंडळाच्या इतर सभासदांच्या कवितेपेक्षा अधिक जिवंत आहे. 'माझ्या कविता हा माझ्या सुखदुःखाचा परिपाक आहे' असे ते स्वतःच प्रतिपादितात. जीवनाच्या उमेदीच्या काळात यशवंताना अगदी प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले. त्यांच्या जीवनातील आशा-आकांक्षांच्या असफलतेमुळे त्यांनी बहुतेक कवितांतून विषण्णतेचा सूर आळविला आहे. निराशेने त्यांच्या जीवनाला शोष लागल्यासारखा होऊन त्यांची प्रतिभा आत्मपर बनली. या आत्मसमाधीनून त्यांची सारी भावकविता उत्स्फूर्त झाली आहे असे त्यांच्या कवितेविषयी ह्यांचे स्नेही श्री. माडखोलकर म्हणतात. या नैराश्याच्या सुरांतही झुंजारवृत्ती दिसते. त्यांची रचना सफाईदार असून जुन्या रूढ कल्पनांची परिणामकारक योजना करण्यात त्यांचे कौशल्य दिसून येते. यशवंतांची प्रतिभा भावगीतानुकूल आहे. ती आपल्या जीवनाशी, भावनेशी प्रामाणिक आहे. हेच तिच्या यशस्वितेचे गमक आहे. त्यांची अनेक भावगीते आणि नाट्यगीते

यशस्वी ठरली आहेत. त्यांची 'आई' ही एकच कविता त्यांच्या प्रतिभेचे सामर्थ्य दाखविते. यशवंतांनी बालगीते देखील गाइली आहेत.

♡ ♡

## केशवकुमार (प्रल्हाद केशव अत्रे)

प्रल्हाद केशव अत्रे यांनी मराठी वाङ्मयाच्या सर्व क्षेत्रात यश मिळविले आहे. नाटककार, विनोदी लेखक, चित्रपटकथाकार, पत्रकार या विविध भूमिकेने आचार्य अत्रे यांनी लेखन केले आहे. काव्याच्या क्षेत्रात त्यांनी बालकवी, गोविंदाग्रज या कवींच्या काव्याने प्रभावित होऊन प्रेमकविता लिहिल्या आहेत. प्रारंभीची त्यांची काव्यरचना 'गीतगंगा' या संग्रहात समाविष्ट आहे. आचार्य अत्रे यांची 'झेंडूची फुले' हा विडंबनात्मक कवितांचा संग्रह अधिक प्रसिद्ध आहे. रविकिरणमंडळातील कवीच्या काव्यातील दोषदर्शन घडवून आणणे हा जरी त्या कवितांच्या निर्मितीमागील हेतू असला तरी त्यांतील विनोद अभिजात आहे व त्यामुळेच 'झेंडूची फुले' अजूनही निर्माल्यवत झाली नाहीत. तत्कालीन कवितांच्या शाब्दिक दोषाबरोबरच कविताचे विषय आणि कवींचे स्वभाव हे देखील अत्र्यांच्या विडंबनाचे विषय झाले आहेत. काव्यरचनेच्या तंत्रावर त्यांचे प्रभुत्व आहे. काव्याच्या अंतरंगातल्या बारीकसारीक बाबींचे ज्ञान त्यांना आहे व म्हणूनच अत्रे यशस्वी विडंबनकार होऊ शकले. 'स्वतः निर्दोष काव्य जो लिहू शकतो तोच दुसऱ्याच्या काव्यामधल्या दोषांचे विडंबन करू शकेल किंवा त्यालाच तसे विडंबन करण्याचा अधिकार पोहोचतो' असे त्यानीच म्हटले आहे. विडंबनकारांची वाङ्मयीन अभिरुची फारच उच्च दर्जाची असते. सौंदर्यसमीक्षणाचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी असते. हे सामर्थ्य अत्र्यांच्या ठिकाणी आहे. विडंबन म्हणजे हास्यास्पद नक्कल नव्हे. तो एक विरोधी भक्तीचा प्रकार अशी त्यांची धारणा आहे. प्रस्तुत 'चाफा' या कवितेत बी कवीच्या कवितेची टर उडवण्याचा हेतू नाही असे आचार्य अत्रे यांनीच टीपेत नमूद केले आहे. बी कवीच्याबद्दल अत्र्यांच्या मनात अपरंपार आदर आहे. कविवर्य बींच्या कवितेतील उदात्त कल्पनेच्या विरुद्ध विषय घेऊन एक विनोदी चित्र प्रस्तुत कवितेत अत्रे यांनी रेखाटले आहे. समाजातील एका विशिष्ट प्रकारच्या वृत्तीचे विडंबन करण्यात केशवकुमारांना यश लाभले आहे.

## कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर)

कुसुमाग्रजांच्या कवितेची सजावट रविकिरणमंडळासारखी असली तरी त्याचा गाभा मात्र केशवसुतांच्या काव्यातील आशयाप्रमाणे तेजस्वी आहे. त्यांची कविता 'जीवनलहरी', विशाखा', 'किनारा', 'स्वगत' या काव्य–संग्रहात संगृहीत केलेली आहे. 'जीवनलहरी' या काव्यसंग्रहात जीवनाविषयी हळवेपणा, रम्याद्भुत स्वप्नाळूपणा दिसतो. मात्र नंतर १९३० ते १९४२ च्या दरम्यान राजकीय आणि सामाजिक जीवनात सुरू झालेल्या नव्या युगाचे पडसाद त्यांच्या कवितेवरही उमटले. त्यांच्या 'स्वप्नाची समाप्ती' होऊन समाजातील आर्थिक विषमता, अश्रू नष्ट करण्याकरिता त्यांनी क्रांतिदेवतेस आवाहन केले. त्यांचे आत्मकेंद्रित मन समाजाभिमुख झाले. कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून भीषण विषमतेचे दर्शन घडविले. त्याविषयी चीड, संताप व्यक्त केला. त्यांच्या कवितेत अग्नीची दाहकता आहे, म्हणूनच त्यांच्या कवितेला अग्निसंप्रदायी कविता म्हणतात. त्यांची वृत्ती मूर्तिभंजकाची असली तरी ते मानवतेचे उपासक आहेत. 'कुसुमाग्रजांची दृष्टी मानवतावादी आहे म्हणूनच क्रांतीवादी आहे.' केशवसुतांना नवसमाजरचनेचा ध्यास होता तर कुसुमाग्रजांना समाजवादाचा ध्यास आहे. केशवसुतांच्या कवितेतील ओज व गोविंदाग्रजाचे कल्पनावैभव या दोहोंचा मधुर संगम कुसुमाग्रजांच्या कवितेत आढळतो. उचित शब्दयोजना, संयम, समर्पक उत्प्रेक्षा, सूचना यामुळे त्यांची शैली डौलदार होऊन कविता परिणामकारक होते. कुसुमाग्रजांच्या कवितेत आढळणारा उद्दाम आशावाद 'कोलंबसाचे गर्वगीत' या कवितेतही दिसून येतो.

♡ ♡

## अनिल (आत्माराम रावजी देशपांडे)

रविकिरणमंडळानंतर मराठी कवितेला नवे समाजाभिमुख वळण ज्या कवींनी लावले आहे त्यात अनिल अग्रगण्य आहेत. त्यांची कविता फुलवात, भग्नमूर्ती, निर्वासित चिनी मुलास, पेर्ते व्हा, सांगाती या काव्यसंग्रहात संगृहित केली आहे. भग्नमूर्ती आणि निर्वासित चिनी मुलास ही खंडकाव्ये मुक्तछंदात लिहिलेली आहेत. यात अनिलांनी उपदेशकाची भूमिका घेतली आहे.

अनिलांनीच प्रथम मुक्तछंदाच्या रचनेची शास्त्रीय चर्चा करून रचनाविषयक नवीन प्रयोग केले. प्रथम त्यांनी प्रेमकविता लिहिल्या. ही प्रेमगीते आत्म-केंद्रिततेमुळे व त्यांच्या व्यक्तिगत स्वरूपामुळे प्रभावी उतरली आहेत. 'पेर्ते व्हा' हा अनिलांच्या कवितांचा संग्रह अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. यात महायुद्धाची कृष्णछाया पडलेल्या परिस्थितीतून स्फुरलेल्या दहा कविता आहेत. त्यांची क्रांतीवर श्रद्धा आहे, 'सुप्त ज्वालामुखी' 'बंड', 'धडकी' या कवितामधून 'समतेचे अधिराज्य स्थापायास' मानवतेच्या प्रक्षोभास आवाहन केले आहे. अनिल नव्या सामाजिक जाणिवांनी भारलेले आहेत. मानवतावादी कवी असा त्यांचा लौकिक आहे. अनिलांच्या कवितेत निराशा नाही. त्यांनी 'पेर्ते व्हा' या रूपकात्मक कवितेमधून नवनिर्मितीची बीजे पेरण्याविषयी संदेश दिला आहे. 'धडकी' या कवितेत निसर्गाच्या लहरीवर आमच्या जीवनाची गती अवलंबून असल्यामुळे केव्हा कसा प्रसंग येईल ते सांगता येत नाही याचे विवेचन केले. जर पाऊस पडला नाही तर आमचे, आमच्या भारतदेशाचे, काय होईल याचे कटू पण वास्तव चित्र अनिलांनी रेखाटले आहे. भ्रांतिरूप अवस्थेचे त्यांनी केलेले चित्रण खरोखरच धडकी भरविणारे आहे. मात्र अनि-लांचा आशावाद येथेही दृष्टोत्पत्तीस येतो. या भ्रांतीतून जागे होऊन नवीन विचा-रवंत काही क्रांती करून जगाला नवे वळण दाखवतील अशी त्यांची दृष्टी आहे.

♡ ♡

## वा. रा. कांत

१९३५ नंतर उदयास आलेल्या कवींमध्ये कांत यांचे स्थान बरेच वरचे आहे. मराठवाड्यातील या कवीच्या काव्यात उग्रता आणि दाहकता आहे. कल्पकतेचा यांचेवर वरदहस्त आहे मात्र कल्पकतेच्या आहारी कांत जात नाहीत. 'पहाटतारा,' 'फटत्कार,' 'रुद्रवीणा' आणि 'शततारका' हे यांचे प्रसिद्ध कवितासंग्रह. रुद्रवीणेत क्रांतीसाठी आवाहन केले असून रुद्राला तृतीयनेत्र उघडून तांडवनृत्य करण्यास सांगितले आहे. उग्रता हा त्यांच्या प्रतिभेचा एक स्वाभाविक धर्म आहे. प्रभावी क्रांतीगीतांबरोबरच कांतांनी मधुर आणि मदिर प्रीतीने भारलेली प्रेमगीतेदेखील लिहिली आहेत. 'अग्निपथ' आणि 'आशिया' ही दोन खंडकाव्ये देखील प्रसिद्ध आहेत. १९६० साली

नांदेड येथे भरलेल्या कविसंमेलनाचे कांत हे अध्यक्ष होते. 'अग्निपंख नभिं फडफडुं दे.' या कवितेसुद्धा कांतांच्या वाणीचा कडवेपणा दिसून येतो.

♡ ♡

## बा. भ. बोरकर

कविवर्य भा. रा. तांबे यांची परंपरा चालवून त्यात धन्यता मानणारे एक श्रेष्ठ कवी. साधुत्वाचे आणि सौंदर्याचे संस्कार यांच्यावर बालपणापासूनच झालेले आहेत. बोरकर हे मुख्यतः निसर्गसौंदर्याच्या आस्वादात रमणारे कवी आहेत. प्रतिभा, जीवनसंगीत, दुधसागर, आनंदभैरवी आणि चित्रवीणा या कवितासंग्रहात त्यांची कविता प्रसिद्ध झाली आहे. आरंभीच्या कवितेत शिष्टमान्य संकेतांचे बंधन असले तरी नंतर संकेतांचे कवच गळून पडले आहे. तांबे निसर्गाचा पार्श्वभूमी म्हणून उपयोग करितात. निसर्गाचे वर्णन त्यांच्या कवितेत येते. बालकवि निसर्गाशी समरस होऊन आपले स्वतंत्र कल्पनाविश्व साकार करतात. बा. भ. बोरकर निसर्गाशी त्यांच्या झालेल्या एकतानतेच्या अवस्थेला शब्दात पकडू पाहतात. म्हणून त्यांच्या कवितांमध्ये स्वतंत्र प्रतिसा-सृष्टी निर्माण होते. बोरकरांच्या प्रेमकवितेने शरीर नाकारलेले नाही. त्यांची कविता नादवती असते. त्यांनी सामाजिक आशय असलेल्या कविताही लिहिल्या आहेत परंतु ही त्यांची खरी प्रकृती नाही. निसर्ग हा त्यांच्या भावानुभावाचा अविभाज्य घटक असतो व भावानुभव उमलत असताना निसर्ग आपोआप चितारला जातो. हे निसर्गाचे चित्रण अत्यंत हृद्य होते. चित्रवीणा ही कविता त्यांच्या चित्रवीणा या कवीतासंग्रहातून घेतली आहे. या कवितेत त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये दिसून येतात.

♡ ♡

## बी. रघुनाथ (भगवान रघुनाथ कुळकर्णी)

जीवनात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सतत झगडत बी. रघुनाथांनी साहित्यसाधना केली. मराठवाड्यातील परभणी येथे संपूर्ण आयुष्य कारकुनी करीत घालविले. लेखन आणि वाचन यात मात्र त्यांनी खंड पडू दिला नाही. रूपककथेपासून बी. रघुनाथांनी लेखन सुरू केले. मराठवाड्यातील निरनिराळ्या

सामाजिक थरातील जीवन त्यांनी आपल्या कथांतून रेखाटले आहे. साकी, फकीराची कांबळी, छागल, काळीराधा, आकाश हे त्यांचे कथासंग्रह असून त्यांनी अनेक कादंबऱ्याही लिहिल्या आहेत. 'आलाप आणि विलाप' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. या काव्यासंग्रहामुळे रसिकांच्या त्यांच्याविषयीच्या अपेक्षा वाढल्या. मध्यंतरी काही काळ त्यांनी कवितालेखन बंद केले असले तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुन्हा त्यांच्या प्रतिभेस बहर आला. त्यांची सर्व कविता 'पुन्हा नभाच्या लाल कडा' या संग्रहांत एकत्र प्रसिद्ध झाली आहे. बी. रघुनाथांच्या प्रेमकवितेची लज्जत काही निराळीच आहे. मधुर रचनेप्रमाणेच भावपूर्णता हा त्यांच्या अशा कवितांचा विशेष सांगता येईल. 'ते न तिने कधि ओळखले' या कवितेत प्रेयसीने मनातील भाव न ओळखल्यामुळे वाटत असलेली खंत चितारली आहे.

♡ ♡

## बाळ सीताराम मर्ढेकर

मर्ढेकरांना 'दुसरे केशवसुत' असे म्हणण्यात येते. आधुनिक मराठी कवितेत एक नवा प्रवाह आणून रूढ संकेतांना जोराचा धक्का दिला, त्यामुळे त्यांची प्रारंभी कुचेष्टा झाली हे खरे; परंतु त्यांनी रसिकांना विचार करायला लावून युगप्रवर्तक कवी असे वदवून घेतले. शिशिरागम, काही कविता, आणखी काही कविता हे त्यांचे तीन कवितासंग्रह. शिशिरागमातील कवितेवर बालकवी आणि माधवजूलियन यांच्या कवितेची छाप स्पष्ट दिसते.—'कांही कविता' या काव्यसंग्रहाच्या मुखपृष्ठापासून तर त्यातील एकूण एक कवितेने मराठी कवितेच्या वाचकांना स्तिमित केले. लोकांनी अश्लीलता, दुर्बोधता, इत्यादी आरोपांचा भडिमार करून देखील मर्ढेकरांच्या कवितेने नंतरच्या कवींवर त्यांचा प्रभाव पाडला व नव कविता निर्माण होऊन मराठी कवितेला नवे वळण लागले. मराठी पेहरावातील त्यांच्या काही कविता परकीय वळणाच्या वाटल्या तरी त्यामागील अनुभूती अस्सल आहे. मर्ढेकरांची वृत्ती सौंदर्यलक्षी आहे. त्यांनी रेखाटलेली शब्दचित्रे, रेखीव, वेधक आणि प्रत्ययपूर्ण आहेत. मर्ढेकर म्हणजे अश्रद्ध, जंतुवादी, अशी सर्वसाधारण समजूत झालेली आहे. परंतु 'आणखी काही कविता' या संग्रहातील कविता वाचल्यावर हे आरोप निरा-

धार ठरतात. मर्ढेकरांनी यांत्रिक जीवनाचा निषेध केला आहे. यंत्रयुगाने हतबल झालेल्या माणसांच्या मनातील वैफल्य ते चितारतात. अर्थसघनतेमुळे त्यांची कविता क्लिष्ट वाटते. विफलतेचे चित्रण म्हणजे माणूसद्वेष नव्हे. आपल्या अनुभूतींचे चित्रण ते नव्या प्रतिमा, नवी प्रतीके वापरून करतात म्हणून त्यांच्या कवितेत दुर्बोधता येते. त्यांच्या साऱ्याच कविता दुर्बोध किंवा अश्रद्धपणा व्यक्त करणाऱ्या नाहीत. मर्ढेकर एखाद्या नाजुक तरल स्निग्ध भावाचे किती हळुवार आणि कुशल चित्रण करतात त्याची प्रचीती 'दवांत आलीस भल्या पहाटीं' ही कविता वाचून येते.

♡ ♡

## इंदिरा संत

वर्तमानकालीन काव्यामध्ये इंदिरा संतांच्या कवितेचे स्थान निराळेच आहे. सहवास या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात त्यांचे पती ना. मा. संत यांची कविता देखील समाविष्ट आहे. शेला, मेंदी, मृगजळ हे त्यांचे स्वतंत्र काव्यसंग्रह. इंदिराबाईंची कविता ही 'विशुद्ध भावकविता' आहे अशी प्रशस्ती प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी दिली आहे. पतिसहवास तसेच पतिविरह या अवस्थेतील त्यांचे भाव कवितेमधून प्रगट झाले आहेत. या भावात मात्र नाटकीपणाचा संपूर्ण अभाव आहे. या भावांच्या विविध छटा त्यांच्या कवितेतून त्यांनी चितारल्या आहेत. पतिविरहानंतरच्या त्यांच्या कवितेत एक विलक्षण कारुण्य आहे. इंदिरा संतांच्या या आत्मनिष्ठ भावविश्वात वात्सल्य, निसर्गप्रेम इत्यादी भावांनादेखील स्थान मिळाले आहे. त्यांच्या अभिव्यक्तीची पद्धती स्वतंत्र असून शिष्टपूर्ण आहे. स्वतःच्या मनातील विविध भाव व्यक्त करण्याकरिता निसर्गचित्रांचे साहाय्य त्यांनी घेतले आहे. निरनिराळ्या प्रतिमा त्यांच्या भावजीवनाशी एकरूप झाल्यामुळे त्या भावघन बनतात. रचना कौशल्याच्या दृष्टीने देखील इंदिरा संतांच्या कविता सुरेख आहेत. 'उभी तुळस वेल्हाळ' या कवितेत वर सांगितलेली सर्व वैशिष्ट्ये एकवटलेली आहेत.

♡ ♡

## विंदा करंदीकर (गो. वि. करंदीकर)

मर्ढेकरानंतर उदयास आलेल्या नवकवींमध्ये विंदा करंदीकरांचे स्थान वरचे आहे. स्वेदगंगा, मृद्गंध, ध्रुपद या त्यांच्या काव्यसंग्रहांतून त्यांच्या विकासशील प्रतिभेचे दर्शन घडते. ते जसे एक प्रभावी कवी आहेत तसेच लघुनिबंधकार आणि टीकाकारही आहेत. त्यांच्या सर्व लेखनातून त्यांचे विकसित व प्रभावी व्यक्तिमत्त्व प्रगट झाले आहे. जीवनातील विविध आणि सूक्ष्मातिसूक्ष्म अनुभवांना शब्दात साकार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे व त्यात त्यांना बरेच यश मिळाले आहे. सामाजिक विषमतेची चीड त्यांच्या कवितेमधून व्यक्त होते. त्यांनी रचलेली तालचित्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. करंदीकरांनी अनेक बालगीते लिहिण्यात यश मिळविले आहे. राष्ट्रीय कवितांमधून जुने संकेत आढळत असले तरी संकेतांचे कवच फोडून त्यांच्या जिवंत अनुभूतीने नवीन परिवेश धारण केलेला दिसतो. 'माझ्या मना बन दगड' या कवितेत आर्थिक विषमतेने पिचलेल्या जीवनाचे चित्रण असून एक दणकट आशावाद प्रगट झाला आहे.

ठा. स्थलप्रत
काव्य
अनुक्रमांक ३८७६५
क्रमांक १६७८ दि. २५।८।६४
REFBK-0014081
REFBK-0014081